कृषीवल
रायगड, शनिवार, दि. ४ ऑक्टोबर २०२५
किंमत ४ ₹

### १० डिसेंबरपासून सवाई गंधर्व भीमसेन महोत्सव

**पुणे :** महोत्सवांचा मुकूटमणी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सवाई गंधर्व भीमसेन महोत्सवाच्या यंदाच्या तारखांची घोषणा करण्यात आली आहे. आर्य संगीत प्रसारक मंडळातर्फे आयोजित हा महोत्सव यंदा १० ते १४ डिसेंबर या कालावधीत आयोजित करण्यात आला आहे.मंडळाचे कार्याध्यक्ष श्रीनिवास जोशी यांनी एका पत्रकाद्वारे ही माहिती दिली. अभिजात शास्त्रीय संगीताच्या क्षेत्रात जगभरात लौकिक असणारा हा महोत्सव यंदा ७१ व्या वर्षात पदार्पण करत आहे. पाच दिवसांचा हा महोत्सव मुकुंदनगर येथील महाराष्ट्रीय मंडळाच्या क्रीडा संकुलात होणार आहे.

सी साईट रिसॉर्ट नागाव
बिच येथे कामासाठी
अनुभवी मॅनेजर पाहिजे.
कॉम्प्युटर ज्ञान आवश्यक.
9422856336/9028143980

# नवी मुंबई विमानतळाला दिबांचेच नाव

## शेकापसह पनवेल संघर्ष समितीला यश; नागरिकांमध्ये आनंद

**। रायगड । जिल्हा प्रतिनिधी ।**

**नवी मुंबई विमानतळाच्या नावाबाबत मोठा निर्णय घेतला आहे. नवी मुंबई विमानतळाला काय नाव द्यायचे अखेर ठरले आहे. सरकारने केंद्राकडे नावाचा प्रस्ताव पाठवला होता. नवी मुंबई विमानतळाला दि.बा. पाटील विमानतळ असे नाव देण्याची मागणी केली जात होती. अखेर नवी मुंबई विमानतळाच्या उद्घाटनाआधी सरकारने नावाचा प्रश्न सोडवला असून दि. बा. पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले आहे.**




राज्य सरकारकडून एकच नाव केंद्राकडे पाठवण्यात आले होते. सरकारकडून नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील नाव देण्याच्या मागणीचा सरकारने सकारात्मक विचार केला आहे. यामुळे विमानतळ नामकरणाच्या संदर्भात सर्वपक्षीयांकडून काढण्यात येणारा मोर्चा तात्पुरता स्थगित केल्याची माहिती देण्यात आली.

नवी मुंबई विमानतळावरून आता विनाअडथळा उड्डाणे होऊ शकणार आहेत. या विमानतळाला नागरीउड्डाणमहासंचालनालयाकडून एरोड्रोम लायसन्स जारी करण्यात आले आहे. विमानतळाचे नियमित उड्डाण सुरू करण्यासाठी हा परवाना अत्यावश्यक आहे. त्यामुळे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या संचालनाचा मार्ग मोकळा झाला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी दोन दिवसांच्या मुंबई दौऱ्यावर येणार आहेत. ८ आणि ९ ऑक्टोबर असा मोदींचा दोन दिवसांचा मुंबई दौरा असणार आहे. ८ ऑक्टोबर रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी नवी मुंबई विमानतळ, मुंबई मेट्रो-३ आणि इतर काही विविध विकासकामांचा शुभारंभ करणार आहेत. तर, ९ ऑक्टोबरला पंतप्रधान नरेंद्र मोदी दरवर्षी पार पडणाऱ्या ग्लोबल फिनटेक फेस्टिव्हल २०२५ ला उपस्थित राहणार आहेत. ब्रिटनचे पंतप्रधान कीअर स्टार्मर हे देखील ग्लोबल फिनटेक फेस्टला उपस्थित असतील.

> **“दि. बा. पाटील यांचे राजकीय, सामाजिक क्षेत्रात मोलाचे योगदान राहिले आहे. स्थानिक भूमीपूत्रांसाठी अनेक लढे दिले आहेत.नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव अगोदर दिले असते, तर भूमीपुत्रांसह स्थानिकांना अधिक दिलासा मिळाला असता. दि. बा. पाटील यांच्या नावावर शिक्कामोर्तब सरकारने आता केला आहे. नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव दिल्याने खुपच आनंद झाला आहे.**
> **– जयंत पाटील, सरचिटणीस शेतकरी कामगार पक्ष”**

दि. बा. पाटील यांनी शेतकऱ्यांसह भूमीपुत्रांच्या न्याय हक्कासाठी लढा दिला. त्यामुळे नवी मुंबई येथील आंतरराष्ट्रीय विमानतळाला त्यांचे नाव देण्यात यावे, अशी मागणी शेतकरी कामगार पक्षासह पान २ वर

## नागरिकांना विमानतळ गाठणे होणार सुलभ

**। पनवेल । प्रतिनिधी ।**

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचे लोकार्पण ८ ऑक्टोबरला केले जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी देखील या विमानतळाच्या लोकार्पणास उपस्थित राहण्याची शक्यता आहे. विमानतळ तयार झाल्याने आता ठाणे, रायगड जिल्ह्यातील नागरिकांना विमानत गाठणे सुलभ होणार आहे.

नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ प्रकल्पाचा पहिला टप्पा २०२५ अखेर पर्यंत कार्यान्वित होणे अपेक्षित असून त्याद्वारे दरवर्षी सुमारे २० दशलक्ष प्रवाशांना सेवा देण्यात येणार आहे. तसेच प्रकल्प २०३८ मध्ये पूर्णपणे पान २ वर

### काय आहे प्रकल्प

२०१६ मध्ये नवी मुंबई विमानतळ विकसित करण्यासाठी सिडकोने जागतिक स्तरावर निविदा मागविली होती. या विमानतळाच्या विकासासाठीचा करार २५ ऑक्टोबर २०१७ रोजी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रायव्हेट लिमिटेड (एमआयएएल) यांना देण्यात आला. यानंतर एमआयएएल आणि सिडको यांनी एकत्र येऊन नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट प्रायव्हेट लिमिटेडची (एनएमआयएएल) स्थापना केली. या संस्थेमार्फत नवी मुंबईतील ग्रीनफिल्ड आंतरराष्ट्रीय पान २ वर

### वेधक

#### वंदे भारत ट्रेनने मुलांना चिरडले

**बिहार :** सध्या इंटरनेटवर रील्स बनवणाऱ्यांची संख्या प्रचंड वाढली आहे. सोशल मीडिया एफ्लुएन्सर्स व्हिडीओ-रीलसाठी अनेकदा स्वतःचा जीव देखील धोक्यात घालताना पाहायला मिळतात. पुन्हा एकदा असाच काहीसा प्रकार समोर आला आहे. बिहारच्या पूर्णिया येथे शुक्रवारी (दि.३) सकाळी जोगबनी-दानापूर वंदे भारत एक्सप्रेसने चार किशोरवयीन मुलांना चिरडल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. अधिकाऱ्यांनी दिलेल्या माहितीनुसार, पाच किशोरवयीन मुले रेल्वे ट्रॅकजवळ येणाऱ्या ट्रेनचे रील बनवत असताना ही धक्कादायक घटना घडली. या घटनेत चार मुलांचा मृत्यू झाला, तर या घटनेत एक मुलगा गंभीररित्या पान २ वर

#### शिक्षक पात्रता परीक्षेसाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ

**पुणे :** महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेतर्फे होणारी शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी -२०२५) रविवारी (दि.२३) नोव्हेंबर रोजी होणार आहे. सदर परीक्षेसाठी ऑनलाइन अर्ज भरण्याची अंतिम मुदतपूर्वी दि. ३ ऑक्टोबरपर्यंत होती. मात्र राज्यातील काही जिल्ह्यांत अतिवृष्टी व पूरस्थितीमुळे अनेक उमेदवारांना अडचणी आल्याने अर्ज भरण्यासाठी अतिरिक्त कालावधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. आता उमेदवारांना ऑनलाईन आवेदनपत्र भरण्यासाठी दि. ४ ऑक्टोबर ते दि. ९ ऑक्टोबर २०२५ रात्री ११.५९ वाजेपर्यंत मुदतवाढ मिळणार आहे. तसेच तांत्रिक कारणांमुळे पान २ वर

#### लेडीज बार वर छापा; २१ जण ताब्यात

**पनवेल :** अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाने तळोजा नावडा फाटा येथील कलम पंजाब या लेडीज बारवर छापा मारून १५ महिला वेटरसह बारमधील मॅनेजर, वेटर अशा एकूण २१ जणांना ताब्यात घेतले. याबाबत तळोजा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. हा बार ठरवून दिलेल्या वेळेपेक्षा अधिकवेळ सुरू असल्याचे तसेच बारमधील महिला वेटर या अश्लील हावभाव व अंगविक्षेप करून ग्राहकांना आकर्षित करताना आढळून आल्याने या बारवर कारवाई करण्यात आल्याचे पोलिसांनी सांगितले. या बार संदर्भातील माहिती अनैतिक मानवी वाहतूक प्रतिबंधक कक्षाला मिळाली होती. त्या आधारे कलम पंजाब बारवर छापा मारला.

## महाराष्ट्रावर एकाच वेळी तिहेरी संकट

### पावसाबाबत आयएमडीकडून धोक्याचा इशारा, १४ राज्यांना हाय अलर्ट

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

भारताच्या समुद्र क्षेत्रामध्ये पुन्हा एकदा कमी दबाचा पट्टा निर्माण झाला आहे. एक पश्चिमेकडे आणि दुसरा पूर्वेकडे असे दोन कमी दाबाचे पट्टे निर्माण झाले आहेत. या कमी दाबाच्या पट्ट्यांमुळे देशातील अनेक राज्यांमध्ये आता भारतीय हवामान विभागाकडून अतिमुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. या पार्श्वभूमीवर नागरिकांना सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे, महाराष्ट्रात देखील पुढील काही दिवस पुन्हा एकदा पावसाचा जोर वाढणार आहे.

हवामान विभागानं दिलेल्या माहितीनुसार पश्चिमेला कच्छच्या खाडीमध्येआणिउत्तर-पूर्वेलाअरबी समुद्रात कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे, हा कमी दाबाचा पट्टा पुढील काही तासांमध्ये आणखी तीव्र होण्याची शक्यता आहे. तर दुसरीकडे बंगालच्या उपसागरात देखील कमी दाबाचा पट्टा निर्माण झाला आहे. याचा परिणाम म्हणून अनेक राज्यांमध्ये वाऱ्याच्या प्रचंड वेगासह अतिमुसळधार पावसाची शक्यता आहे. या काळात वाऱ्याचा वेग ताशी ५५ ते ६० किमी इतका प्रचंड असणार आहे. पान २ वर



### कोणत्या राज्यात होणार पाऊस?

- कमी दाबाच्या पट्ट्यामुळे पश्चिम बंगाल, झारखंड, ओडिशा, आंध्र प्रदेश, तेलंगाना, छत्तीसगड, मध्य प्रदेश, महाराष्ट्र, गुजरात, राजस्थान, पंजाब, हरियाणा, दिल्ली आणि उत्तर प्रदेश या राज्यांमध्ये पुढील काही दिवस मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे. महाराष्ट्रात पुन्हा एकदा मुसळधार पावसाचा इशारा देण्यात आला वाढली आहे, नाशिकसह अनेक जिल्ह्यांना यलो अलर्ट दिला आहे.

## बाळासाहेबांचा मृतदेह दोन दिवस घरात

### ■ रामदास कदम यांच्या नव्या दाव्याने उडाली खळबळ

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

शिवसेनेचे नेते तथा माजी मंत्री रामदास कदम यांनी २ ऑक्टोबर रोजीच्या शिवसेनेच्या दसरा मेळाव्यात खळबळजनक विधान केले. उद्धव ठाकरे यांनी शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांचा मृतदेह दोन दिवस मातोश्रीवर ठेवला होता, असा खळबळजनक दावा कदम यांनी केला.

कदम यांच्या या दाव्यानंतर आता राज्याच्या राजकीय वर्तुळात वेगवेगळ्या चर्चांना उधाण आले आहे. कदम यांच्या या विधानाचे राजकीय पडसाद उमटत आहेत. असे असतानाच आता रामदास कदम यांनी शुक्रवारी (दि.३) पत्रकार परिषद घेऊन आणखी एक खळबळजनक दावा केला आहे. यावेळी त्यांनी खासदार शरद पवार यांचे नाव घेत मोठं विधान केलं आहे.

रामदास कदम यांनी पत्रकार परिषद घेऊन बाळासाहेब ठाकरे यांच्या निधनावर पुन्हा एकदा भाष्य केले. बाळासाहेब ठाकरे यांचे निधन कधी झाले होते, हे डॉक्टरांना विचारायला हवे. मी दसरा मेळाव्यात जबाबदारीने विधान केले आहे. मी माझ्या विधानावर ठाम आहे. मला प्रसिद्धी नको आहे. पण ही अतिशय गंभीर बाब आहे. आमच्या दैवताबाबत असं होत असेल तर आम्हाला दु:ख होणारच आहे, अशा भावना यावेळी रामदास कदम यांनी व्यक्त केल्या. तसेच बाळासाहेब ठाकरे यांना भेटायला शरद पवार आले होते. मात्र त्यांनादेखील वर पाठवले नव्हते. त्यावेळी शरद पवार यांनी एक विधान केले होते. अरे मिलिंद बाळासाहेब ठाकरे पान २ वर

> **आमदार भास्कर जाधव यांनी प्रसारमाध्यमांशी बोलताना मिंधे गटातील नेते रामदास कदम यांच्यावर जोरदार टीका केली. मिंधे गट स्थापन होऊन तीन वर्ष झाली. तीन वर्षात रामदास कदम यांना कधीच कुणी त्यांचे विचार मांडायला, भाषण द्यायला बोलावलं नाही. त्यामुळे अशा मेळाव्यामधून भुंकल्याशिवाय रामदास कदमांसारख्या श्वानांना कुणी किंमत देत नाही, अशी जोरदार टीका भास्कर जाधव यांनी रामदास कदम यांच्यावर केली.**

> **कदमांच कोकणातलं अस्तित्व नामशेष होत चाललय. कदमांच्या पोरानं कदमाची सर्व घालवली. आईच्या नावे डान्सबार सुरु केलाय. सतत टक्केवारीचं राजकारण, कोकणात मी सुद्धा आहे, हा आटापिटा करण्याच्या नादात कदमांच ते स्टेटमेंट आलं, असं सुषमा अंधारे म्हणाल्या. कदम यांना हे आधी कळत नव्हतं का? इतके दिवस ते का गप्प होते? मंत्रीपद का भोगली? कदम यांनी आपल्या पोराची तिकिट मागण्याची लाचारी का केली? कदम यांचा खरेपणा इतके दिवस कुठे गेला होता?. उदय सामंत यांच्यापेक्षा मी कसा जास्त वफादार आहे. हे त्यांना दाखवून द्यायचं होतं, अशी टीका सुषमा अंधारे यांनी केली.**

## पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांचे सर्वंकष मूल्यमापन

### ■ नवीन कार्यपद्धतीसाठी आदेश जारी

**। रायगड । प्रतिनिधी ।**

शालेय शिक्षण विभागाकडून आतापर्यंतपहिलीतेआठवीपर्यंतच्या विद्यार्थ्यांसाठी राबविण्यात येत असलेल्या सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धत आता नववी ते बारावीच्या विद्यार्थ्यांसाठीही राबवली जाणार आहे. यासाठी नवीन कार्यपद्धतीसाठी शालेय शिक्षण आयुक्तांनी आदेश जारी केले असून, यासाठी नववी ते बारावीच्या वर्गांतील विद्यार्थ्यांसाठी लागणाऱ्या प्रश्नपत्रिका तपासणीच्या निकषांमध्ये बदल करण्यात आले आहेत. तसेच राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेमार्फत एससीईआरटीकडून तपासल्या



जाणार असल्याने शिक्षणतज्ज्ञांनी आक्षेप घेतले आहेत.

नववी ते बारावीपर्यंतच्या विविध मूल्यमापन, परीक्षा आदींचा कारभार शालेय शिक्षण विभागाअंतर्गतयेणाऱ्याराज्यशिक्षण मंडळाच्या माध्यमातून चालतो. त्यात आतापर्यंत सुरू असलेल्या सर्वंकष मूल्यमापनासाठी नववी ते बारावीपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या प्रश्नपत्रिका या शाळास्तरावर तयार केल्या पान २ वर

## महाराष्ट्रात ई-बॉण्ड प्रणाली सुरू

**। मुंबई । प्रतिनिधी ।**

महाराष्ट्र सरकारने शक्रवारपासून (दि.३) राज्यात ई-बॉण्ड (इलेक्ट्रॉनिक बॉण्ड) प्रणाली सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे. हा निर्णय महाराष्ट्र शासनाच्या नोंदणी आणि मुद्रांक विभागाने घेतला आहे. सरकारच्या या निर्णयामुळे आयातदार आणि निर्यातदारांना दिलासा मिळणार आहे.

महाराष्ट्राच्या इतिहासांत पहिल्यांदाच नोंदणी आणि मुद्रांक विभाग ई-बॉण्ड सुरु करत आहे. ई प्रणालीच्या माध्यमातून तुम्हाला स्टॅम्प पेपर न घेता, म्हणजे स्टॅम्प पेपरची गरज नाही, ई-बॉण्डवर तुम्ही स्टॅम्प पेपर घेऊ शकता. राज्यातील हा सर्वात मोठा निर्णय आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वातील आमचं सरकार आता ई-बॉण्डवर आलेलं आहे. त्यामुळे या निर्णयाचा मोठ्या प्रमाणात फायदा होणार आहे.

मुद्रांक विभागाने आजपासून इलेक्ट्रॉनिक बॉण्डची सुरूवात केली आहे. या निर्णयाचा फायदा हा आयातदार व निर्यातदारांना व्यवहार करण्यासाठी होणार आहे. या निर्णयामुळे निर्यातदार असतील किंवा आयातदार यांना व्यवहार करताना कागदी बॉण्ड देण्याची गरज नाही. तसेच या इलेक्ट्रॉनिक बॉण्डची ऑनलाईनच पडताळणी कस्टम अधिकारी करणार आहेत. या निर्णयामुळे अधिक पारदर्शक येणार असून व्यवहाराची प्रक्रिया सोपी होईल. तसेच या प्रक्रियेमुळे कागदपत्रांसाठी जाणारा वेळ आता वाचणार आहे.

### इलेक्ट्रॉनिक बॉण्डचे फायदे

- ई-बॉण्ड प्रणालीच्या माध्यमातून आता मुद्रांक शुल्काचा भरणा ऑनलाईन पद्धतीने करता येणार आहे. तसेच आता ५०० रुपयांचे शुल्क ऑनलाईन जमा करता येणार आहेत. या बरोबरच आयातदार किंवा निर्यातदार आणि कस्टम अधिकाऱ्यांच्या यावर आता ई-स्वाक्षरी असणार आहे. त्यामुळे व्यवहारांना अधिक पारदर्शकता येणार आहे. एवढंच नाही तर या प्रणालीच्या माध्यमातून कस्टम अधिकाऱ्यांकडून तात्काळ पडताळणी देखील होणार आहे.

## अकरावीच्या प्रवेशासाठी अंतिम विशेष फेरी

**। पुणे । प्रतिनिधी ।**

इयत्ता अकरावीच्या प्रवेशासाठी विद्यार्थ्यांना शनिवार (दि.४) ते सोमवार (दि.६) दरम्यान शेवटची संधी मिळणार आहे. या कालावधीत प्रवेशास इच्छुक विद्यार्थ्यांना नवीन नोंदणी, प्राधान्यक्रम भरण्याची प्रक्रिया पूर्ण करता येणार आहे.

अर्ज भरताना विकल्प भरण्याची आणि नाव नोंदणीची सुविधा अंतिमत: देण्यात येईल. फेरीत विकल्प भरलेल्या प्राधान्यक्रमानुसार कनिष्ठ महाविद्यालय न मिळाल्यास केवळ अशा विद्यार्थ्यांना पुनश्च: रिक्त जागा दर्शवून रिक्त असलेल्या जागा विचारात घेऊन विकल्पात बदल करण्याची सुविधा दिली



जाणार आहे. या बदल केलेल्या विकल्पानुसार कनिष्ठ महाविद्यालय गुणानुक्रमे देण्यात येईल. विकल्प न नोंदविलेल्या विद्यार्थ्यांना त्या स्तरावरगुणानुक्रमेमहाविद्यालयाची अलॉटमेंट करण्यात येणार नाही. गुणानुक्रमे महाविद्यालय न मिळाल्यास विद्यार्थ्यांना विकल्प नोंदविण्याची सुविधा दिली जाणार आहे.विद्यार्थ्यांना मिळालेल्या महाविद्यालयात जाऊन आपला प्रवेश निश्चित करण्यासाठीचे वेळापत्रक मंगळवारी जाहीर करण्यात यणार आहे.

### ॲपचा प्रवाशांना घेता येणार लाभ | आपली एसटी ॲपद्वारे एसटीचा ठावठिकाणा कळणार

## आता एसटीची प्रतीक्षा संपणार

**। रायगड । प्रतिनिधी ।**

वाट पाहीन, पण एसटीनेच जाईन, असे म्हणणाऱ्या प्रवाशांना आता एसटीसाठी प्रतीक्षा करावी लागणार नाही. प्रत्येक थांब्यावरील एसटीचा अचूक ठावठिकाणा आपली एसटी ॲपद्वारे कळणार आहे. आपली एसटी या नावाच्या नवीन ॲपचे दसऱ्याच्या मुहूर्तावर लोकार्पण करण्यात आले असून, या ॲपचा प्रवाशांना लाभ होईल, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात येत आहे.

राज्य परिवहन (एसटी) महामंडळाच्या बस वेळेत येत नसल्याने प्रवाशांचा खोळंबा होता. परंतु, प्रवाशांचा एसटी महामंडळावर विश्वास असल्याने कितीही वेळ झाला तरीही ते एसटीची वाट पाहतात. प्रवाशांना एसटीची प्रतीक्षा करावी लागू नये साठी एसटी महामंडळाने कम्प्यूटर ॲप नव्या रुपात सादर केले आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी या ॲपचे आपली एसटी असे नामकरण केले आहे. या ॲपमुळे सर्वसामान्य प्रवाशांचा प्रवास अधिक सुलभ, सोयीस्कर आणि पारदर्शक होईल, असा विश्वास एसटी महामंडळाने व्यक्त केला.




### तांत्रिक त्रुटी दूर करणार

एसटी महामंडळातील १२ हजारपेक्षा जास्त बस व राज्यभरातील एक लाखापेक्षा जास्त मार्गाची माहिती ॲपमध्ये समाविष्ट करण्यात आली आहे. या ॲपचा लाखो प्रवासी वापर करणार असल्यामुळे सुरुवातीच्या टप्प्यामध्ये काही तांत्रिक त्रुटी निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. प्रवाशांनी तांत्रिक त्रुटींबाबत सूचित करावे, असे आवाहन सरनाईक यांनी केले.

### ॲपमध्ये तिकीट आरक्षण सेवा

प्रवाशांच्या सुरक्षेच्या दृष्टीने ॲपमध्ये आपत्कालीन क्रमांकांची यादी उपलब्ध करण्यात आली असून, कोणत्याही आपत्कालीन क्रमांकावर संपर्क साधणे शक्य आहे. लवकरच एसटीच्या सध्या असलेल्या तिकीट आरक्षण ॲपमध्येही बसची थेट माहिती समाविष्ट केली जाईल. ज्यामुळे आगाऊ तिकीट आरक्षण करणाऱ्या प्रवाशांनाही मोठी सुविधा मिळेल.

‘रोजमाल्टा ऑटोटेक लि.’ या कंपनीच्या साहाय्याने विकसित केलेल्या आपली पान २ वर

### ॲपमध्ये अनेक सुविधा

अँड्रॉइड आणि ॲपल वापरकर्त्यांसाठी अनेक उपयुक्त सुविधा यात उपलब्ध आहेत. प्रवाशांना जवळच्या बस थांब्याचा शोध घेणे, दोन थांब्यांदरम्यान धावणाऱ्या बसच्या वेळापत्रकाची माहिती मिळवणे, आरक्षण केलेल्या तिकिटातील बस क्रमांक अथवा सेवा क्रमांक नमूद करून बसचा थेट मागोवा घेणे आदी सुविधांचा त्यात समावेश आहे. सध्या हे ॲप एमएसआरटीसी कम्प्यूटर ॲप या नावाने प्ले स्टोअरमधून प्रवाशांना डाऊनलोड करता येईल. लवकरच आपली एसटी हे नाव प्ले स्टोअरमध्ये दिसेल.

## एसटी चालकाचा प्रताप

### ■ दारु पिऊन प्रवाशांनी भरलेली एसटी चालविली
### ■ प्रवासी वर्गाकडून संताप, निश्चितस्थळी पोहचण्यास विलंब

**। रायगड जिल्हा । प्रतिनिधी ।**

एसटीचा प्रवास सुखाचा प्रवास असे कायमच बोलले जाते. मात्र अलिबाग एसटी बस आगारातील चालकाच्या निष्काळजीपणामुळे हाच प्रवास जीवघेणा ठरला असता. दसऱ्याच्या पूर्वसंध्येला प्रवाशांनी भरलेली एसटी बस चालक दारु पिऊन चालवित होता. चुकीच्या मार्गाने वाहन चालवित असल्याचा प्रकार उघड झाल्यावर चालकाचा प्रताप समोर आला. प्रवाशांनी संताप व्यक्त केल्यावर चालक बसमधून उतरून गायब झाला. त्यामुळे बुधवारी रात्री प्रवाशांना त्यांच्या निश्चितस्थळी पोहचण्यास विलंब झाला. या घटनेने एसटीतील प्रवाशांची सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे.

अलिबाग स्थानकातून बुधवारी रात्री साडेआठ वाजण्याच्या सुमारास महाजनेकडे एसटी बस निघाली. या एसटीमध्ये ५० हून अधिक प्रवासी बसले होते. स्थानकातून एसटी बाहेर निघतानाच चालकाचा गाडीवरील ताबा सुटत होता.जकात नाका येथे आल्यावर रोहा मार्गावर गाडी वळविण्याऐवजी चालकाने बस पेण मार्गाकडे वळवली. त्यावेळी प्रवाशांनी गोंगाट केला. चालकाची प्रकृती बरी नाही, असे वाहकाने सांगत वेळकाढूपणा करण्याचा प्रयत्न केला.अखेर एसटी रेवदंडा बायपास रस्त्याकडे वळवण्यात आली. त्यानंतर रोहा मार्गाकडे बस निघाली. परंतू चालकाचा त्याच्या स्टेअरिंगवरील ताबा सतत सुटत होता. कोपऱ्यातून गाडी चालवित होता. त्यामुळे रस्त्याच्या दुर्तफा असलेल्या गवत झुडपाला घासत गाडीला पुढे चालक घेऊन जात होता. अखेर बेलकडेजवळ गाडी आल्यावर प्रवाशांनी चालकाच्या या कारभाराबाबत संताप व्यक्त केला. एका प्रवाशाने चालकाकडे जाऊन विचारून केली असता, दारु घेतल्याचा वास येऊ लागला. प्रवाशांचा संताप अनावर झाला. अखेर मद्यधुंद पान २ वर

# झेनिथच्या कामगारांना मिळणार दिलासा

## ● थकीत रक्कम देण्याचे न्यायालयाचे आदेश;कामगारांनी प्रवेशद्वारासमोर केला जल्लोष



**। खोपोली । प्रतिनिधी ।**

एकेकाळी सोन्याचे धूर काढणारी खोपोली शहराला वैभव प्राप्त करून देणारी झेनिथ बिर्ला पोलाद उत्पादन करणारी कंपनी १२ डिसेंबर २०१३ रोजी बेकायदेशीररित्या मालकाने बंद केल्याने कायमस्वरूपी कामगारांसह स्टाफ तसेच कंत्राटी कामगारांवर उपासमारीची वेळ आली आहे.

आपल्या विविध मागण्यांसाठी कामगारांनी अनेकदा आंदोलन करून मालक व व्यवस्थापनाकडे आपल्या न्याय हक्काचे मागणी पत्र देवून चर्चा करीत असताना या मागणीला दाद न देता कामगारांच्या घरादारावर नांगर फिरवण्याचे षड्यंत्र रचल्याने कामगारांनी मुंबई येथील आझाद मैदानावर हिंद कामगार संघटना अध्यक्ष कैलास कदम यांच्या नेतृत्वाखाली ३ वर्ष साखळी उपोषण केले. त्यानंतर न्यायालयीन लढा सुरू ठेवल्याने अखेर ९ वर्षाच्या प्रतीक्षेनंतर कंपनी व्यवस्थापणे बेकायदेशीर कंपनी बंद केली होती असा निकाल देऊन कामगारांची थकीत देणी देण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे कामगारांच्या लढ्याला यश आल्याने येथील कामगारांनी झेनिथ प्रवेशद्वारासमोर जमून आनंद व्यक्त केले आहे.

खोपोली शहरात सन १९६०-६२ च्या दरम्यान बिर्ला समूहाचा झेनिथ स्टील हा पाईप उत्पादन करणारा कारखाना उभारला गेल्याने अनेकांना रोजगार उपलब्ध झाला. उत्पादनात कायम प्रगतीपथावर असणारा कारखाना डिसेंबर २०१३ मध्ये मालक व व्यवस्थापनाने बेकायदेशीररित्या बंद केल्याने असंख्य कामगारांवर उपासमारीची वेळ आली. तर या टाळेबंदीच्या कटकारस्थानात व्यवस्थापनातील हितचिंतकच असल्याचा आरोप कामगारांनी प्रसिध्द केलेल्या पत्रकात केला होता.

अनेकदा मंत्री व संबंधीत कारखान्याशी निगडीत असलेल्या जबाबदार अधिकाऱ्यांबरोबर बैठका झाल्या. त्यावर तोडगा न काढता अधिक आडमुठे धोरण स्वीकारत कामगारांना वेठीस धरण्याचा प्रकार सुरू असल्याने कामगारांनी आरपारची लढाई सुरू केली होती.

> कंपनीची कामगारांना वास्तव्यासाठी कॉलनी होती, यामध्ये अनेक कामगारांचे कुटुंब वास्तव्यात होते. मात्र कंपनीने बंदची भूमिका घेतल्यानंतर लाईट पाणी बंद केले त्यामुळे कामगारांनी खूप अडचणींवर मात्र करीत लढा सुरूच ठेवला. मात्र पिण्याचे पाणी देण्यासाठी खोपोलीतील सामजिक कार्यकर्ते मंगेश काळोखे व न्यायालयीन लढाई साठी पाठबळ देण्यासाठी खोपोल तील नवीनदादा घाटवळ, सुधीर गोरडे यांनी सहकार्य केले. आज न्यायालयाने जो कामगारांच्या बाजूने निकाल दिला आहे त्यात कैलास भाऊ कदम यांचे श्रेय आहे.
> –ज्ञानेश्वर पवार, अन्यायग्रस्त कामगार

> झेनिथ बिर्ला कारखान्यात जवळपास ३५० हुन अधिक कायमस्वरूपी कामगार व कंत्राटी कामगार तसेच कर्मचारी असे हजार ते बाराशे कामगार व्यवस्थापनाने आडमुठे धोरण अवलंबून कंपनी बंद केल्याने या कामगारांच्या कुटुंबावर बेकारीची कुऱ्हाड कोसळली. मात्र धीर न सोडता या विरोधात उपोषण धरणे आंदोलन सुरू ठेवले तर हिंद किसान कामगार संघटनेचे कैलास कदम यांच्या मार्गदर्शनाखाली न्यायालयीन लढाही सुरू ठेवल्याने न्यायालयाने कामगारांच्या बाजूने निर्णय देऊन हिशोब देण्याचे आदेश कंपनी व्यवस्थापनाला काढले आहेत
> – राजेंद्र मोहिते, कामगार प्रतिनिधी, झेनिथ बिर्ला कंपनी

## नशामुक्ती जनजागृती रॅली



। उरण । प्रतिनिधी ।

उरण पोलीस ठाणे व मोरा सागरी पोलीस ठाणे यांचे संयुक्त विदयमाने उरण पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनीफ मुलानी यांच्यामार्गदर्शनाखाली उरण शहरामध्ये नशा मुक्ती जनजागृती रॅली काढण्यात आली होती.

रॅलीत उरण एज्युकेशन सोसायटीशाळा, एन.आय. हायस्कुल व सिटीझन हायस्कुलचे विद्यार्थी तसेच हद्दीतील प्रतिष्ठित नागरीक व पोलीस पाटील सहभागी झाले होते. सदरची रॅली ही पेन्शन पार्क, (वैष्णवी हॉटेल) उरण येथून सुरू होवून स्वामी विवेकानंद चौक, गांधी पुतळा मार्गाने, गणपती चौक, राजपाल नाका तेथून पालवी हॉस्पीटल मार्गाने कामठा रोडने एन.आय. हायस्कुल येथे सांगता समारोप करण्यात आला.उपस्थित विद्यार्थी व प्रतिष्ठित व्यक्तींना नशा मुक्ती संदर्भात मार्गदर्शन करण्यात आले.

सदर जनजागृती रॅलीमध्ये शाळेचे ०८ शिक्षक, ३०० विदयार्थी ३० ते ३५ प्रतिष्ठित नागरीक व १५ पोलीस पाटील यांचेसह उरण पोलीस ठाण्याचे, ०३ अधिकारी व ३५ पोलीस अंमलदार तसेच मोरा सागरी पोलीस ठाण्याचे ०१ अधिकारी व १० पोलीस अंमलदार आदी सहभागी झाले होते . सदर नशा मुक्ती रॅली शांततेत पार पडली.

# बेस्टमध्ये नोकरी लावतो सांगून फसवणूक

**नवीन पनवेल :** बेस्ट मध्ये मेंटेनन्स विभागात नोकरी लावून देतो असे आमिष दाखवून एक लाख ७० हजार रुपये घेऊन नोकरी न लावता आणि पैसे परत न करता फसवणूक केल्याप्रकरणी सुजय सदानंद राणे यांच्या विरोधात खांदेश्वर पोलीस ठाण्यात २८ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

अक्षय कांबळे हा विचुंबे गाव येथे राहत असून त्यांच्या वडिलांच्या ओळखीचा सुजय राणे याचे त्यांच्या घरी येणे जाणे होते. त्यांनी बेस्ट मुंबई येथील साहेब ओळखीचे असून नोकरी लावण्याचे काम करून देतात असे सांगितले. यावेळी दोन लाखात नोकरी लावतो असे सांगितले.

त्यानुसार कांबळे यांनी एक लाख ७० हजार रुपये त्याला दिले. नोकरीबद्दल चौकशी केली असता वेगवेगळे कारणे देऊन उडवाउडवीची उत्तरे देत होता.

जूनपासून फोन उचलणे देखील बंद केले. यावेळी म ोबाईलवर मेसेज द्वारे पैसे परत करण्याबाबत कळवले असता वैयक्तिक अडचणी सांगून पैसे देण्यास टाळाटाळ केली. भेट देखील झाली नाही.

## हेअर ट्रीटमेंटच्या बाटल्यांची चोरी

**नवीन पनवेल :** हेअर ट्रीटमेंटच्या ९१ हजार रुपयांच्या बाटल्यांची चोरी केल्याप्रकरणी सलूनमध्ये हाउसकीपिंगचे काम करणारा काफील जमीर अहमद यांच्या विरोधात खारघर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. काजल पटेल ह्या ऐरोली येथे राहत असून त्यांचा खारघर सेक्टर ७ येथे नमस्ते सलून नावाचे सलून आहे. त्यांच्याकडे काफील अहमद हाउसकीपिंगचे काम करतो. सलूनमध्ये हेअर ट्रीटमेंटच्या बाटल्या ठेवण्यात आल्या होत्या. त्यांनी स्टॉकमध्ये ठेवलेल्या दोन बाटल्या दिसून आल्या नाहीत.

# नाडसूर येथे नेत्र चिकित्सा शिबीर उत्साहात संपन्न

**। पाली/वाघोशी । प्रतिनिधी।**

तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे अध्यक्ष श्री. संदेश परशुराम शेवाळे यांच्या पुढाकाराने लक्ष्मी चॅरीटेबल ट्रस्ट, पनवेल यांच्या वतीने नेत्र चिकित्सा शिबीराचे आयोजन करण्यात आले होते. हे शिबीर शुक्रवारी (दि. ३) नाडसूर येथील जागृती हायस्कुल येथे सकाळी १० ते दुपारी २ या वेळेत पार पडले.

शिबिरामध्ये शेकडो नागरिकांनी नेत्र तपासणी करून घेतली. मोतिबिंदू रुग्णांची तपासणी तसेच पुढील उपचारासाठी आवश्यक कागदपत्रांची नोंदणी करण्यात आली. उपस्थित रुग्णांना रेशनकार्ड व आधारकार्ड झेरॉक्सच्या आधारे मोफत उपचाराची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली. या शिबीराचे संयोजक दत्तात्रय ठाकूर (मो. ८०८७७७६५०७ / ९५९४९८६८२८) होते.

सुधागड तालुक्यातील ग्रामीण भागात आरोग्यसेवेचा लाभ पोहचविण्याच्या दृष्टीने संदेश शेवाळे यांचा पुढाकार कौतुकास्पद ठरला असून स्थानिक नागरिकांनी त्यांचे आभार मानले आहेत.

# अनुदान प्रमाणपत्र विद्यार्थ्यांना सुपूर्द

**। खोपोली । प्रतिनिधी ।**

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत सेवा पंधरवडा साजरा करणे बाबत शासन निर्णय पारित झाला असता त्या अनुषंगाने जिल्हाधिकारी रायगड अलिबाग यांनी सदर अभियानातील टप्पा क्रमांक ३ मध्ये दिनांक २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत नाविन्यपूर्ण उपक्रमांतर्गत संजय गांधी निराधार अनुदान योजनेअंतर्गत खालापूर तालुक्यातील रायगड जिल्हा परिषद शाळेतील एकूण ११ विद्यार्थ्यांना दरमहा १५०० रुपये अर्थसहाय्य लाभ मंजूर करणे आदेश वाटप कार्यक्रम ३ ऑक्टोबर रोजी



तहसीलदार कार्यालयात दुपारी ३ वाजता पार पडला.

सदर कार्यक्रमात तहसीलदार खालापूर अभय चव्हाण व नायब तहसीलदार संगायो मिलिंद तिरेकर यांच्या हस्ते प्रथमेश नरेश मोगरे, अपर्णा जगन केवारी, रितेश जगन केवारी, ईश्वर वासुदेव शिरवले, योगेश नंदू जाधव, प्रीतम अंकुश पवार, श्रेयश संतोष धाकतोडे, दर्शना सुनील वाघमारे, नागेश रघुनाथ रुठे, रोशन दिलीप वाघे, कुमार विजय गजानन पवार या ११ विद्यार्थी लाभार्थ्यांना अनुदान वाटपाचे आदेश देण्यात आल्यानंतर विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर वेगळाच आनंद पाहायला.

यावेळी वयोवृद्ध महिला मीना वाघमारे यांनी तहसीलदार अभय चव्हाण यांचे आभार मानले.

# ‘काँग्रेस सत्तेत येणाऱ्या पक्षासोबत आघाडी करणार’

**। नेरळ । प्रतिनिधी ।**

रायगड जिल्ह्यात काँग्रेस पक्ष पुन्हा उभारी घेण्याचा प्रयत्न करीत आहे. आमची ताकद पूर्वीसारखी राहिली नसेल पण आम्ही सत्तेत येणाऱ्या पक्षासोबत आघाडी करण्यासाठी प्रयत्न करीत आहोत.

फक्त भाजप सोबत आमची कधीही कोणत्याही निवडणुकीसाठी आघाडी होणार नाही असे काँग्रेस पक्षाचे वरिष्ठ उपाध्यक्ष मिलिंद पाडगावकर यांनी स्पष्ट केले.

कर्जत तालुका काँग्रेस कमिटीची बैठक नेरळ येथील साने हॉल मध्ये आयोजित करण्यात आली होती.त्यावेळी पक्षाकडून



नियुक्त करण्यात आलेले निरीक्षक लोणावळा येथील नारायण आंबेकर, फिशरमॅन सेलचे प्रदेश अध्यक्ष मार्तंड नाखवा, युवकचे जिल्हा अध्यक्ष निखिल डवले, तालुका अध्यक्ष संजय गवळी,डॉक्टर सेलचे जिल्हा अध्यक्ष डॉ. संतोष सदावर्ते आदी उपस्थित होते.

यावेळी माजी जिल्हा उपाध्यक्ष दिनानाथ देशमुख,म हिला माजी तालुका अध्यक्ष आशा कदम, माथेरान शहर अध्यक्ष विजय कदम, ज्येष्ठ कार्यकर्ते सुभाष मदन, नेरळ शहर अध्यक्ष आनंद मोडक, युवक कार्यकर्ते सुरज पंडित, आसिफ अत्तार, सीताराम बदे, जॅकी नजे,विठ्ठल बदे, युवक कार्यकर्ते मंगेश कदम आदी उपस्थित होते.

## ११ लाख ८१ हजार रुपयांच्या दागिन्यांची चोरी

**। नवीन पनवेल । प्रतिनिधी।**

राहत्या घरातून अकरा लाख ८१ हजार रुपये किमतीच्या दागिन्यांची चोरी केल्याप्रकरणी अनोळखी इसमाविरोधात कामोठे पोलीस ठाण्यात २७ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला. सविता म्हस्कर या सेक्टर ३५, कामोठे येथे राहत असून त्यांनी त्यांच्या शेजारी राहणाऱ्या महिलेला घरातील बेडरूम मधील सोने काढून दाखवले होते.

यावेळी अन्य एक महिला त्या ठिकाणी उपस्थित होती. त्यांनी सोन्याचे डिझाईन दाखवून परत ते बॉक्सम ध्ये भरून बेडमध्ये ठेवले. त्यांच्या सोसायटीमध्ये देवीची स्थापना केलेली असल्याने त्या ठिकाणी गरब्या करिता घरचा दरवाजा लोटून त्या जात होत्या. त्यांना सकाळी दागिन्यांची आवश्यकता असल्याने त्यांनी बेडमधील सोने घेण्यासाठी गेले बॉक्स काढला असता त्यात दागिने आढळून आले नाहीत.

# परतीच्या पावसाच्या भीतीने शेतकरी हवालदिल

। खोपोली । प्रतिनिधी ।

परतीच्या पावसाच्या भीतीने शेतकऱ्यावर मोठे संकट निर्माण झाल्याने आलेले पिक नष्ट होण्याच्या मार्गावर असून शेतकऱ्यामध्ये चिंतेचे वातावरण पसरले आहे. मागील काही दिवसापासून परतीच्या पावसाने शेतकऱ्यांचा अंदाज चुकवला आहे. वारा, वीज, पाऊस हे मोठ्या प्रमाणात येत असल्यामुळे शेतकऱ्यांचे शेतीचे नुकसान होत आहे.

तर काही ठिकाणी भात शेतीला पूर्ण पिक आले असून भाताच्या लोंब्यामध्ये दाना निर्माण होत असताना, त्याच्या वजनाने भातशेती पडत असल्याचे दृश्य तालुक्याच्या ठिकाणी पहावयास मिळत आहे. यामुळे बळीराजा चांगलाच धास्तावला आहे. भातशेती उत्तम



पिक आल्याने शेतकऱ्याच्या तोंडाशी आलेला घास वाया जाण्याच्या भीतीने शेतकरी चिंतादायक झाला आहे. वर्षभर पावसाची चातकाप्रमाणे वाट पहावी आणि आणि पाऊस पडल्याने भातशेती लावावी. त्यासाठी लागणारे खत, बियाणे, मजूर इत्यादी खर्चाने शेतकऱ्यांची कंबर मोडून जाते. शेवटच्या क्षणाला शेकऱ्यांचे शेतीचे नुकसान ही परस्थिती दरवर्षी पहावयास मिळते.

> यावर्षी पावसाने धुमाकूळ घातला असतानाही दुबार पेरणी करत वडिलोपार्जित भातशेती टिकवली. असे असतानाही आता परतीच्या पावसानेही धुमाकूळ घातल्याने हाताशी आलेला घास पुन्हा पाऊस हिसकावून घेऊ शकतो, त्यामुळे वरुण राजाने आमच्यावर कृपादृष्टी ठेवावी.
> दत्तात्रय दिसले, शेतकरी केळवली

पान १ वरून

## नागरिकांना विमानतळ गाठणे होणार सुलभ

कार्यान्वित झाल्यानंतर दरवर्षी सुमारे ९० दशलक्ष प्रवाशांना सेवा देण्याचे सरकारचे नियोजन आहे. विमानतळ प्रकल्पाचे महत्व विचारात घेता विमानतळाच्या आजूबाजूच्या क्षेत्रातील स्थानिक क्षेत्रातील विकासाचे आणि पायाभूत सुविधांचे धोरणात्मक नियोजन केले जाणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ कार्यान्वित झाल्यास रायगड, ठाणे, कल्याण, भिवंडी, डोंबिवली इत्यादी भागातील प्रवाशांना त्याचा मोठा दिलासा मिळणार आहे. त्यासाठी महानगर प्रदेश क्षेत्रातील विविध भागांना नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाशी जोडले जाणार आहे.

**विमानतळ गाठण्यासाठीचे मार्ग**

पूर्व द्रुतगती महामार्गावरून ठाण्यातून नवी मुंबई विमानतळ गाठण्यासाठी पूर्व द्रुतगती महामार्ग उत्तम पर्याय आहे. पूर्व द्रुतगती महामार्गावरून मुलुंड एरोली मार्गे अथवा ठाणे-कळवा-विटावा, दिघा मार्गाने, पुढे ठाणे-बेलापूर मार्गे, बेलापूर उलवे रस्त्याने विमानतळ गाठता येऊ शकते.

पश्चिम द्रुतगती महामार्गावरून मुंबई पश्चिम द्रुतगती महामार्गाने जेव्हीएलआर, पूर्व द्रुतगती महामार्ग, वाशी खाडी पूल मार्गे पुढे उलवे मार्गे विमानतळ गाठता येईल. दक्षिण मुंबई येथून अटल सेतू, उलवे बेलापूर मार्गे विमानतळ गाठता येईल. वसई, पालघर, मिरा रोड या भागातील नागरिक फाऊंटन, गायमुख, घोडबंदर-ठाणे मार्गे, पूर्व द्रुतगती महामार्ग, ठाणे बेलापूर रोड येथून विमानतळावर पोहचू शकतात.

नवी मुंबई येथून एरोल, दिघा भागातील रहिवासी पाम बीच रोडने नेरुळ-बेलापूर-उलवे मार्गे किंवा ठाणे बेलापूर रोडने बेलापूर- उलवे मार्गे जाऊ शकतील. खारघर, पनवेल भागातील रहिवासी शीव पनवेल मार्गे कळंबोली चौक, पनवेल उरण मार्गे विमानतळ गाठतील.

कल्याण, डोंबिवली ते अंबरनाथ, बदलापूर येथील रहिवासी शिळफाटा मार्गे शीव पनवेल महामार्ग, उलवे बेलापूर रोडने विमानतळ गाठू शकतात.

काही दिवसांपूर्वीच राज्य सरकाने ठाणे ते नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ उन्नत मार्ग यासाठी या अंदाजित ६ हजार ३६३ कोटी खर्चाच्या प्रकल्पाला मान्यता दिली आहे. काही मेट्रो मार्गिका देखील विमानतळापासून काही मीटर अंतरावर धावणार आहे. तसेच मुंबईत ते नवी मुंबई विमानतळ जलवाहतुकीचा पर्यायदेखील भविष्यात उपलब्ध होण्याची शक्यता आहे.

### काय आहे प्रकल्प

विमानतळ प्रकल्पाचे विकास, बांधकाम, संचालन आणि देखभाल यांची जबाबदारी सांभाळली जाणार आहे. हा प्रकल्प सार्वजनिक-खासगी भागीदारी (पीपीपी) पद्धतीने, डिझाईन, बिल्ड, फायनान्स, ऑपरेट अँड ट्रान्स्फर या तत्त्वावर राबविण्यात येत आहे. एनएमआयएएलमधील ७४ टक्के भांडवल एमआयएएलकडे असून उर्वरित २६ टक्के भांडवल सिडकोकडे आहे. एप्रिल २०२१ मध्ये अदानी एअरपोर्ट होल्डिंग्स लिमिटेडने नवी मुंबई इंटरनॅशनल एअरपोर्ट लिमिटेडचे व्यवस्थापन आपल्या ताब्यात घेतले.

## बाळासाहेबांचा मृतदेह दोन दिवस घरात

यांच्या देहाला उद्धव का त्रास देत आहेत, असे त्यावेळी शरद पवार म्हणाले होते. शरद पवारांचे हे शब्द होते. मला अजूनही आठवत आहे. त्यावेळी मी मातोश्रीमध्येच होतो, असा खळबळजनक दावाही कदम यांनी यावेळी केला.

**...तर मी सोडणार नाही**

उद्धव ठाकरे यांनी हे पाप केले आहे. उशिरा का होईना पण महाराष्ट्रातील जनतेला उद्धव ठारे यांचे हे धंदे कळायला हवेत. माझ्याकडे अनेक गोष्टी आहेत. मी त्या बोलणार नाही. पण वेळ पडली तर मी सोडणार पण नाही. उद्धव ठाकरे यांच्याबाबत बाळासाहेब ठाकरे काय-काय बोललेले आहेत, ते माझ्या मनात आहे. मला ते सगळं बोलायला लावू नका, असा इशाराही रामदास कदम यांनी दिला.

**बाळासाहेब ठाकरे यांच्या हतांचे ठसे घेतले**

पुढे बोलताना कदम म्हणाले कि, मेळाव्यात जे अनावधानाने बोललो ती चूक नाही. माझे ते विधान वास्तव आहे. बाळासाहेब ठाकरे यांचे निधन झाल्यानंतर डॉक्टरांनी पत्रकार परिषद घेऊन का सांगितले नाही. उद्धव ठाकरे यांनी बाळासाहेब ठाकरे यांच्या हतांचे ठसे घेतले आहेत. उद्धव ठाकरे यांनी त्यांचा बछडू आदित्य ठाकरे यांच्या डोक्यावर हात ठेवून सांगावे बाळासाहेब ठाकरे यांचे ठसे घेतले होते की नाही ते, असे थेट आव्हान रामदास कदम यांनी दिले.

**एकदा होऊनच जाऊदे**

मी भगव्या झेंड्याचा शिपाई आहे. मी बाळासाहेब ठाकरे यांचा सच्चा शिपाई आहे. उद्धव ठाकरे काय आहेत, ते हळूहळू महाराष्ट्राला समजेल. उद्धव ठाकरे यांनी समोर येऊन बोलावे. मग मीदेखील बोलतो. एकदा होऊनच जाऊदे, असे म्हणत रामदास कदम यांनी दंड थोपटले आहेत.

## एसटी चालकाचा प्रताप

चालकाने बस मधून उतरून पळ काढला. त्यामुळे प्रवासी बेलकडे येथे ताटकळत राहिले. अखेर अर्धा तासाने दुसरा चालक आल्यावर प्रवासी त्यांच्या मार्गस्थ निघाले.

अलिबाग एसटी बस आगारातील चालकाच्या या मनमानी व निष्काळजीपणामुळे प्रवाशांच्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण झाला आहे. अलिबाग एसटी बस आगारातील गलथान कारभार या घटनेनंतर अधिक उघड झाला आहे.अलिबाग एसटी बस स्थानकात असलेले खड्डे, अपुरे कर्मचारी, बसची समस्या कायमच भेडसावत असताना याकडे मात्र आगार व्यवस्थापकांचे दुर्लक्ष होत असल्याचे बोलले जात आहे.

## नवी मुंबई विमानतळाला दिबांचेच नाव

भूमीपुत्रांकडून करण्यात आली. अखेर या मागणीची दखल सरकाने घेंतली असून लोकनेते दि. बा. पाटील यांचे नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाला नाव दिले जाणार आहे. बुधवारी होणाऱ्या विमानतळाच्या उद्घाटन सोहळ्यापासून दि.बा.पाटील यांच्या नावाने नवी मुंबई विमानतळाला ओळखले जाणार आहे.

दिनकर बाळू पाटील तथा दि. बा. पाटील हे त्या काळात पनवेल-उरण भागातून शेतकरी कामगार पक्षाचे आमदार होते. शेतकऱ्यांच्या प्रश्नांसाठी विधानसभेचे सभागृह दाणाणून सोडणारे नेते अशी त्यांची ख्याती त्यावेळी होती. कवडीमोल भावाने जमिनी घेणाऱ्या सिडकोसह सरकारला धारेवर धरत साडेबारा टक्के विकसीत भूखंड देण्याची मागणी त्यांनी त्यावेळी केली. अखेर सरकारला त्यांच्या मागणीपुढे नमते घ्यावे लागले. त्यामुळे जमीनी जाऊनदेखील येथील भूमीपूत्र त्याच ठिकाणी टीकून राहिला. दि. बा. पाटील यांच्यामुळे भूमीपूत्र टिकला. त्यांचे राजकीय, सामाजिक अशा अनेक क्षेत्रात मोलाचे योगदान राहिले आहे. स्थानिकांच्या न्याय हक्कासाठी त्यांनी लढा दिला आहे. कष्टकऱ्यांचा असामान्य योध्दा म्हणून ते आजही भूमीपूत्रांच्या ह्रदयात आहेत.

नवी मुंबई येथील परिसरातील हजारो एकर जमीन संपादीत करून आंतरराष्ट्रीय विमानतळ उभारण्याच्या मागील काही वर्षापूर्वी हालचाल सुरु झाली. या विमानतळाला शेतकरी, कष्टकरी, भूमीपुत्रांचे नेते स्व. दि. बा. पाटील यांचे नाव द्यावे, अशी आग्रही मागणी शेतकरी कामगार पक्षाकडून कायमच करण्यात आली. त्यांच्या या मागणीला सर्व पक्षीय दुजोरा देण्यात आला. विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी भूमीपुत्रांनी अनेक वेळा आंदोलने, मोर्चे काढले. अखेर सरकारने भूमीपुत्रांच्या मागणीला दुजोरा देत दि. बा. पाटील यांचे नाव नवी मुंबई विमानतळाला देण्याचा निर्णय घेतला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली पार पडलेल्या बैठकीत याबाबत निर्णय घेतल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे आता नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव दिले जाणार आहे. नवी मुंबई विमानतळाला दि.बा. पाटील यांचे नाव देण्यासाठी अनेक वर्षापासून मागणी जोर धरत होती. अखेर मागणीची दखल घेण्यात आली असून याबाबत निर्णय घेण्यात आला आहे.राज्याने सुचविलेल्या नावावर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देखील शिक्कामोर्तब केला आहे.त्यामुळे आता नवी मुंबई विमानतळाला दि.बा पाटील यांचे नाव दिले जाणार आहे. नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचा उद्घाटन सोहळा बुधवारी (दि.८) होणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या प्रमुख उपस्थितीत हा कार्यक्रम पार पडणार आहे.या विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव दिले जाणार आहे. त्यामूळे पनवेलसह नवी मुंबई परिसरातील भूमीपुत्रांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## महाराष्ट्रावर एकाच वेळी तिहेरी संकट

हा कमी दबाचा पट्टा पुढील काही तासांमध्ये अधिक तीव्र होण्याची शक्यता देखील हवामान विभागाकडून वर्तवण्यात आली आहे, त्यामुळे पुन्हा एकदा धोका वाढला आहे.

अरबी समुद्र, कच्छची खाडी आणि बंगालच्या उपसागरात एकाच वेळी निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्यामुळे देशात दहा ऑक्टोबरपर्यंत पावसाचा जोर कायम असणार आहे, असं हवामान विभागाकडून सांगण्यात आलं आहे. वादळी वाऱ्यासह जोरदार पावसाचा इशारा हवामान विभागाकडून देण्यात आला आहे.

## पहिली ते बारावीच्या विद्यार्थ्यांचे सर्वंकष मूल्यमापन

जात होत्या.

आता त्या विशिष्ट तज्ज्ञांकडून तयार करून त्या पुन्हा एससीईआरटीकडून त्या तपासल्या जाणार असल्याने यातून शिक्षक आणि शाळांचे कामकाज वाढणार असल्याची अशी भीती तज्ज्ञांकडून व्यक्त करण्यात येत आहे. तसेच या प्रश्नपत्रिकांसाठी यापूर्वी सर्वंकष मूल्यमापनासाठी असलेल्या नियमांचे उल्लंघन विभागाकडूनच केले जात असल्याचे तज्ज्ञांचे म्हणणे आहे.

सातत्यपूर्ण सर्वंकष मूल्यमापन पद्धतींचा अवलंब करूनच प्रत्येक विद्यार्थ्याने त्या त्या इयत्तेच्या निर्धारित केलेल्या अध्ययन क्षमतांचे अध्ययन करून त्या अध्ययन क्षमतांना आत्मसात केले आहे, याची खात्री करता येते. याच पार्श्वभूमीवर राज्यात पालकांना शाळेतील शैक्षणिक प्रक्रियेमध्ये समाविष्ट विद्यार्थ्यांची शैक्षणिक प्रगती अधिक वेगाने होईल, याची सर्वांनी खात्री करणे अपेक्षित आहे.

## आता एसटीची प्रतीक्षा संपणार

एसटी ॲपमुळे प्रवासी जवळच्या बसस्थानकाची माहिती मिळवू शकतील. प्रवासी माहिती केंद्राद्वारे बस कुठून सुटणार आणि ती बस थांब्यावर केव्हा पोहोचणार याची अचूक माहितीही मिळेल. त्यामुळे प्रवाशांना एसटीची वाट पाहात थांब्यावर तासंतास थांबण्याची गरज नाही. थेट बस उपलब्धतेनुसार ते थांब्यावर पोहोचू शकतील.

## वंदे भारत ट्रेनने मुलांना चिरडले

जखमी झाला आहे.नॉर्दर्न फ्रंटियर रेल्वेजचे चीफ पब्लिक रिलेशन ऑफिसर (सीपीआरओ) यांनी चार मुलांच्या मृत्यूची पुष्टी केली आहे. पहाटे ४.५४ वाजता ही घटना घडली. घटना घडली तेव्हा ते रुळावर सोशल मिडिया रील्स बनवत होते असा संशय व्यक्त केला जात आहे. स्थानिक चौकीदार मोहम्मद हबीबुद्दीन यांनी सांगितले की, रुग्णालयात नेत असताना मृत्यू झाल्याने तीन मृतदेह शवविच्छेदनासाठी नेण्यात आले. इतर दोन मुलांना तातडीने रुग्णालयात दाखल करण्यात आले, पण त्यापैकी एकाचा पोहोचल्यानंतर थोड्याच वेळात मृत्यू झाला. दरम्यान मृतांची ओळख पटवण्याचे काम सुरू आहे, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

## शिक्षक पात्रता परीक्षेसाठी अर्ज भरण्यास मुदतवाढ

परीक्षा शुल्क भरता न आलेल्या उमेदवारांनादेखील नेट बँकिंग, डेबिट कार्ड किंवा क्रेडिट कार्डच्या माध्यमातून दि. ९ ऑक्टोबर २०२५ पर्यंत शुल्क भरण्याची संधी दिली आहे. यानंतर कोणत्याही परिस्थितीत अतिरिक्त मुदतवाढ मिळणार नाही. त्यामुळे उमेदवारांनी वेळेत अर्ज भरून शुल्क भरावे, असे आवाहन परीक्षा परिषदेचे आयुक्त अनुराधा ओक यांनी केले.

# निवडक

## वरदच्या चित्रांची प्रदर्शनात निवड

**उरण :** तालुक्यातील पिरकोन गावातील वरद खुशाली विलास या युवा चित्रकाराने वयाच्या तेराव्या वर्षी ५० स्वातंत्र्य सैनिकांची व चिरनेर जंगल सत्याग्रहातील हुतात्म्यांची व्यक्तीचित्रे कॅनव्हासवर चितारली आहेत.



तसेच इयत्ता दहावीमध्ये असताना 'वरद कलारंग-रंग आनंदाचे' हे पहिले व्यक्तिगत चित्र प्रदर्शन भरविले. दरम्यान, कर्नाटक चित्रकला परिषदेत शायनी कलर्स यांनी भरवलेल्या स्पर्धा आणि प्रदर्शनात सुप्रसिद्ध चित्रकार परीक्षकांनी निवडलेल्या चित्रात वरद याने काढलेल्या एका सुंदर व्यक्ती चित्राची निवड करण्यात आली. हे चित्र ९ ते ११ ऑक्टोंबर या कालावधीत बांगिया कला केंद्राच्या माध्यमातून भरविण्यात आलेल्या 'पुणे आर्ट फेस्टा' या प्रदर्शनात बालगंधर्व आर्ट गॅलरीत पाहण्याची संधी प्राप्त होणार आहे.



## माथेरानमध्ये घोड्यांची मिरवणूक

**नेरळ :** विजयादशमी निमित्त माथेरानमध्ये अश्वपालक आणि अश्वचालक यांच्याकडून घोड्यांची मिरवणूक काढली जाते. हा सण साजरा करण्यासाठी गुरूवारी (दि.२) माथेरान शहरातील सर्व घोडे सजवून रस्त्यावर आले होते. दरम्यान, या घोड्यांनी अनेक प्रकारचे संचालन करून सर्वांची वाहवा मिळवली. कर्जत-माथेरानमधील पर्यटनाचे प्रमुख आकर्षण असलेल्या घोड्यांच्या रॅलीने येथे आलेल्या पर्यटकांची मने जिंकली. स्थानिक अश्वपाल संघटनेची १९७२ मध्ये स्थापना झाली, तेव्हापासून या दसऱ्याच्या सणाला अश्वपाल उत्सव म्हणून साजरा करतात. पूर्वीच्या काळी पावसाळ्यात चार महिने घोडे हे पर्यटकांसाठी बंद असत. जोरदार पाऊस पडत असल्याने घोडे हे तबेल्यातच असायचे आणि दसऱ्याच्या दिवशी घोड्यांना अंघोळ घालून, त्यांना सजवून मिरवणूक काढण्यात आली. दसऱ्याच्या दिवशी घोड्यांना सजवून विधिवत पूजा करून घोड्यांना रॅलीमध्ये आणण्यात आले. दसरा हा सण अश्वपालकांनी प्रतिवर्षाप्रमाणे 'उत्सव अश्वांचा' म्हणून साजरा केला. परंपरागत चालत आलेल्या उत्सवात सर्व अश्वपालक मोठ्या भक्तिभावाने रमले. यामध्ये घोड्याच्या तबेल्याचीसुद्धा पूजा करण्यात आली. दसऱ्याचा सण हा महत्त्वाचा सण मानून या दिवसापासून आपल्या नवीन वर्षाच्या रोजगाराला सुरुवात करण्यात आली.



## रसायनीत महाश्रमदान मोहीम संपन्न

**रसायनी :** रसायनी-पाताळगंगा परिसरातील वडगाव अंतर्गत बोरीवली गावामध्ये वडगाव ग्रामपंचायत, रिलायन्स इंडस्ट्रीज प्रायव्हेट लिमिटेड, महिला बचत गट व ग्रामस्थ यांच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि.३) महा श्रमदान मोहिम आयोजित करण्यात आली होती. या अभियानाला गावातील मंदिर, शाळा व आसपासच्या परिसरात स्वच्छता करण्यात आली. मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान अंतर्गत ग्रुप ग्रामपंचायत वडगांव यांनी महाश्रमदान मोहीम यशस्वीरित्या राबविली आहे. विशेष म्हणजे माझी वसुंधरा अभियान ४.० व ५.० मध्ये कोकण विभागात प्रथम येऊन राज्य स्थरावर पारितोषिक प्राप्त केले आहे. हे सातत्य कायम ठेवण्यासाठी ग्रुप ग्रामपंचायत वडगांव सर्व स्तरातून प्रयत्न करताना दिसत आहे. या स्वच्छता अभियानात सार्वजनिक ठिकाणे, ग्राम पंचायत हद्दीतील पर्यटन स्थळे, अध्यात्मिक स्थळे, नदी किनारे, संस्थात्मक इमारती, कार्यालये, वारसा स्थळे, उद्याने यांची स्वच्छता करण्यात आली. या अभियानात ग्रामपंचायत कर्मचारी, रिलायन्स कर्मचारी, महिला बचत गट व ग्रामस्थ उपस्थित होते.




## शिक्षक पतसंस्थेतून ९.५० टक्के लाभांश

**नेरळ :** जिल्हा परिषद शाळेत शिक्षण देणाऱ्या शिक्षकांच्या पतसंस्थेकडून सदस्यांना ९.५० टक्के लाभांश देण्याचा निर्णय अध्यक्ष मोहन पाटील यांनी जाहीर केला आहे. कर्जत येथे रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेची वार्षिक सर्वसाधारण सभा झाली, त्यावेळी ही घोषणा करण्यात आली. कर्जत येथील साईकृपा मंगल कार्यालयात रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक पतसंस्था पेण यांची सर्वसाधारण वार्षिक सभा आयोजित करण्यात आली होती. या सभेला पतसंस्थेचे अध्यक्ष मोहन पाटील, उपाध्यक्ष सुमित्रा खेडेकर, संचालक सचिव विनोद जोशी, संचालक सोपान चांदे आदी मान्यवर उपस्थित होते. या वार्षिक सर्वसाधारण सभेत पेण प्राथमिक शिक्षक सहकारी पतपेढी लि. पेण संस्थेचे मानद सचिव नितिन वर्तक यांनी लेखाजोखा मांडला. त्यांनतर रायगड जिल्हा प्राथमिक शिक्षक पतसंस्थेचे अध्यक्ष मोहन पाटील यांनी पतसंस्थेच्या कारभाराची माहिती देताना आपली संस्था शंभरहून अधिक वर्षे कार्यरत असून या संस्थेचा डोलारा आपण सर्वांनी पुढे न्यायचा आहे, असे आवाहन केले. त्यावेळी मोहन पाटील यांनी पतसंस्थेच्यावतीने सर्व सभासदांना लांभाश ९.५० टक्के दराने देण्यात येईल, असे जाहीर केले.

## माजगांव स्मशानभूमीत वृक्ष लागवड

**पाताळगंगा :** लायन्स क्लबने एक पाउल पुढे टाकत, मानवी मृत्यूचे चिरस्थांन असलेल्या माजगांव येथील स्मशानभूमित विविध प्रकारच्या वृक्षांची लागवड केली. त्याचबरोबर गुरुकुल आध्यत्मिक संस्था महड येथे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप कले. यावेळी लायन्स क्लबचे पदाधिकारी उपस्थित होते. वृक्ष लागवड ही काळाची गरज आहे. हे समिकरण ओळखून माजगाव येथीलल स्मशानभूमित हा कार्यक्रम हाती घेण्यात आला. या ठिकाणी अंत्ययात्रेला आलेल्या प्रत्येकाला सावळी मिळावी, शिवाय पशुंसाठी निवारा निर्माण व्हावा, त्यांच्या अन्नाची सोय व्हावी, पाऊस नियमित पडावा, जमिनीची धूप कमी व्हावी, यासाठी वृक्ष लागवड करण्यात आली.

# तंबाखूमुक्त शाळा फक्त कागदावरच

## कर्मचारीच खातात तंबाखूजन्य पदार्थ; शाळेच्या परिसरात खुलेआमपणे विक्री

**| प्रमोद जाधव |**
**| रायगड |**

तंबाखूजन्य पदार्थांच्या सेवनाचे दुष्परिणाम शालेय स्तरापासून विद्यार्थ्यांना कळावे, यासाठी शाळांमध्ये तंबाखूमुक्त शाळा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. मोठा गाजावाजा करीत तंबाखूमुक्त शाळा म्हणून फलक लावले जातात. परंतु, हा सर्व खर्च पाण्यात जात असल्याचे चित्र आहे. तंबाखू मुक्त शाळेतील काही कर्मचारीच गुटखा व अन्य तंबाखूजन्य पदार्थ खात असल्याचे समोर येत आहे. तसेच, शाळेच्या शंभर मीटर परिसरात किराणा, पान टपरी दुकानांत तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ खुले आमपणे विकले जातात. त्याकडे मात्र शाळेतील समितीचे दुर्लक्ष असल्याचे बोलले जात आहे.



संबंधितांविरोधात कोणतीही कारवाई केली जात नाही, ही मोठी चिंतेची बाब आहे.

तंबाखूच्या सेवनाने कर्करोगासह अनेक आजार उद्भवण्याची शक्यता आहे. गुटखा व अन्य तंबाखूजन्य पदार्थाच्या आहारी तरुण वर्ग जात आहे. त्यामुळे त्यांच्या आरोग्यावर मोठा परिणाम होण्याची चिंता व्यक्त केली जात आहे. जिल्ह्यातील तंबाखू व गोवा, गुटखा, विमल सारखे तंबाखूजन्य पदार्थ विक्रीला बंदी घालण्यात आली आहे. मात्र, आजही जिल्ह्यातील काही भागांमध्ये ३५ ते ४० रुपयांनी विमल, गुटखा या तंबाखूजन्य पदार्थांची विक्री छुप्या पद्धतीने केली जात आहे. त्यामुळे तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थाच्या आहारी तरुणाई जाण्याची भिती निर्माण झाली आहे. काही शाळा, महाविद्यालयातील मुले फॅशन म्हणून तंबाखूजन्य पदार्थ खाण्यावर भर देतात. त्यामुळे हे संकट दूर करण्यासाठी जिल्ह्यात तंबाखू नियंत्रण कार्यक्रम ही स्वतंत्र यंत्रणा उभी करण्यात आली आहे.

शाळा महाविद्यालयात जाऊन या यंत्रणेच्या मदतीने जनजागृती केली जाते. सरकारी कार्यालांमध्येदेखील याबाबत प्रचार व प्रसार करून तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ खाऊ नका, असे आवाहन केले जाते. जिल्ह्यात आतापर्यंत ४०१ शाळा तंबाखू मुक्त झाल्या आहेत. ७६ शाळा तंबाखू मुक्त शाळेच्या प्रगती पथावर आहे. तंबाखू मुक्त शाळांच्या परिसरात तंबाखू व तंबाखूजन्य पदार्थ विक्रीस बंदी असून शाळांमधील कर्मचाऱ्यांनी देखील अशा पदार्थांचे सेवन न करणे, अशा सुचना देण्यात आल्या आहेत. तसेच, शाळेच्या आवारात तंबाखूमुक्त शाळेचा फलक लावण्यात आला आहे. परंतु, नव्याचे नऊ दिवस या उक्तीप्रमाणे कारभार चालला जातो. त्यानंतर जैसे थे अशी अवस्था पहावयास मिळत आहे. मोठा गाजावाजा करीत तंबाखूमुक्त शाळेचा दिखावा केला जात असल्याचे चित्र काही शाळांमध्ये समोर आले आहे. त्यामुळे तंबाखूमुक्त शाळेची नोंद फक्त कागदावर असल्याचे बोलले जात आहे. तंबाखू मुक्त शाळेचा उपक्रम कौतूकास्पद आहे. मात्र, त्यामध्ये सातत्य राखण्यास काही शाळा उदासीन ठरत आहे.

### बैठकीला शिक्षणाधिकाऱ्यांची गैरहजेरी

**जिल्हा तंबाखू सहनियंत्रण समिती अध्यक्ष जिल्हाधिकारी आहेत. दर तीन महिन्यांनी बैठक घेतली जाते. या समितीमध्ये १५ हून अधिक सदस्य आहेत. त्यात पोलीस यंत्रणेसह शिक्षणाधिकारी, विक्रीकर अधिकारी, अन्न व औषध प्रशासनचे अधिकारी आहेत. आतापर्यंत चार बैठका झाल्या. परंतु, माध्यमिक शाळेतील शिक्षणाधिकारी चारही बैठकीला उपस्थित राहिले नसल्याची माहिती उपलब्ध झाली आहे.**




## उरण पोलिसांची नशामुक्ती रॅली

**| उरण | प्रतिनिधी |**

उरण व मोरा सागरी पोलीस ठाण्याच्या संयुक्त विद्यमाने शुक्रवारी (दि.३) उरण शहरात नशामुक्ती जनजागृती रॅली काढण्यात आली. या रॅलीत उरण एज्युकेशन सोसायटी, एन.आय. हायस्कुल आणि सिटीझन हायस्कुलचे विद्यार्थी, नागरिक, पोलीस पाटील, शिक्षक आणि सामाजिक कार्यकर्ते सहभागी झाले होते. ही रॅली पेन्शन पार्कपासून सुरू होऊन स्वामी विवेकानंद चौक, गांधी पुतळा, गणपती चौक, राजपाल नाका, पालवी हॉस्पिटल मार्गे कामठा रोडवरून एन.आय. हायस्कुल येथे संपन्न झाली. या रॅलीत ३०० विद्यार्थी, ८ शिक्षक, ३०३५ नागरिक, १५ पोलीस पाटील, ३ वरिष्ठ पोलीस अधिकारी, ३५ पोलीस अंमलदार, मोरा सागरी पोलीस ठाण्याचे १ अधिकारी व १० पोलीस अंमलदार सहभागी झाले होते.

## अनधिकृत बांधकामाला नोटीस

**| श्रीवर्धन | प्रतिनिधी |**

बोर्लीपंचतन येथील मुख्य रस्त्याच्या बाजूला असलेल्या गटारावर एका स्थानिक नागरिकाने पक्के बांधकाम सुरू केले आहे. त्याला अंतिम नोटीसीची बजावणी केली असून ही नोटीस मिळाल्यापासून आठ दिवसांच्या आत बांधकाम तोडून घ्यावे, अन्यथा सार्वजनिक बांधकाम विभागाकडून तोडक कारवाई करून खर्च वसूल केला जाईल, अशा प्रकारे नोटीस बजावण्यात आली आहे. शोएब मोहम्मद शौकत अली पांगारकर असे बांधकाम करणाऱ्याचे नाव आहे.



बैलगाडा शर्यतीसाठी सरावाचा मुहूर्त दसऱ्याच्या निमित्ताने साधण्यात आला. अलिबाग-रोहा मार्गावर बैलांना फुलांनी सजवून बैलगाडा शर्यतीचा सराव करण्यात आला.

(छायाचित्र : प्रमोद जाधव)

## अलिबाग-चौल रस्त्याची साईडपट्टी हरवली

**| रेवदंडा | प्रतिनिधी |**

गेल्या काही दिवसांपासून पडत असलेल्या पावसात अलिबाग-चौल रस्त्यावरील मुखरी गणपती नजीकचा साईडपट्टी हरवली आहे. त्यामुळे हा रस्ता वाहनांसाठी अपघाताला निमत्रंण ठरत आहे.

गेल्या काही दिवसांपासून पावसाने जिल्ह्यात थैमान घातले आहे. त्यामुळे जिल्ह्यातील रस्त्यांची दयनिय अवस्था झालेली आहे. चालकांसह प्रवासी वर्गाला देखील आपला जीव मुठीत घेऊन प्रवास करावा लागत आहेत. त्यातच अलिबाग-चौल रस्त्यावरील मुखरी गणपती नजीकच्या रस्त्यावरील साईडपट्टीच हरवली आहे. त्या रस्त्याच्या बाजूला पाण्याच्या निचरा होण्यासाठी बांधलेल्या गटाराच्या बाजूकडील माती वाहून गेल्याने रस्त्याचा साईडपट्टी वाहून गेली आहे. साईडपट्टी निघून गेल्याने हा रस्ता अरूंद झाला आहे. तसेच, त्या ठिकाणी खोलगट भाग असल्याने मोठी दोन अवजड वाहने पास करताना चालकांना तारेवरची कसरत करावी लागत आहे. त्यामुळे अपघात होण्याची दाट शक्यता वर्तविली जात आहे. संबधीत खात्याने तात्काळ या रस्त्याच्या साईडपट्ट्याचे काम करावे व तेथील गटार सुद्धा नव्याने बांधावेत. तसेच, हा रस्ता धोकादायक असल्याने येथून ये-जा करत असलेल्या वाहनांच्या सावधानतेसाठी फलक लावणे गरजेचे आहे, अशी मागणी प्रवासीवर्ग, वाहन चालक व स्थानिक ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.



## दांपत्याची ६९ लाखांची फसवणूक

**| पनवेल | प्रतिनिधी |**

सुकापूर येथील पुनम म्हात्रे यांच्या पतीला टेलिग्रामच्या एका ग्रुपमध्ये समाविष्ट करण्यात आले. त्यात ट्रेडिंगमध्ये पाच टक्क्यांपर्यंत परतावा मिळेल, असे सांगण्यात आले. त्यांना ग्रुपमध्ये एक लिंक पाठविण्यात आली. त्यावेळी त्यांनी लिंकवरून ॲप्लीकेशन डाउनलोड केले आणि त्यात नोंदणी केली. त्यावेळी त्यांना बनावट प्रमाणपत्र पाठवण्यात आले. त्यांनी एकूण ६९ लाख ६९ हजार रुपये भरले. जुलैमध्ये त्यांनी त्यातील काही रक्कम काढून पाहिली असता ती रक्कम बँक खात्यावर जमा झाल्याने त्यांचा विश्वास बसला. त्यानंतर १ सप्टेंबर रोजी त्यांच्या ट्रेडिंग अकाउंटला नफ्यासह १ कोटी ८८ लाख ७३ हजार इतकी रक्कम दिसत होती. ती रक्कम काढण्याकरता संबंधितांना संपर्क केला असता ६ लाख ७० हजार रुपये व्हेरिफिकेशन डिपॉझिट भरावे लागेल, असे सांगण्यात आले. मात्र, त्यांच्याकडे पैसे नसल्याने त्यांनी विनंती करूनही कोणतीही रक्कम परत केली नाही. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याचे लक्षात आल्याने म्हात्रे यांनी सायबर पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली.

## कर्जत-मुरबाड रस्त्यावर अपघात

**| नेरळ | प्रतिनिधी |**

कर्जत-मुरबाड या राष्ट्रीय महामार्गावरील अपघातांची मालिका थांबण्याचे नाव घेत नाही. गुरूवारी (दि.२) सकाळी वारे ग्रामपंचायत हद्दीतील खैरपाडा ते पोही दरम्यानच्या अवघड अपघाती वळणावर पुन्हा एक गंभीर अपघात घडला आहे. लोखंडाचे भंगार भरून जाणारा भरधाव ट्रक समोरून येणाऱ्या टाटा पंच गाडीवर धडकला आणि रस्त्याच्या कडेला पलटी झाला. सुदैवाने या धडकेत मोठी जीवितहानी टळली. मात्र, गाडीत असलेल्या एका लहान मुलाच्या डोळ्याला मार लागला आहे.

समृद्धी महामार्गावरून लोणावळाकडे येणाऱ्या वाहनांसाठी मुरबाड-कर्जत हा राष्ट्रीय महामार्ग बनविण्यात आला आहे. ग्रामस्थांच्या मते, या ठिकाणी रस्त्याच्या कडेला वाढलेले गवत व धोकादायक वळणामुळे समोरून येणारी वाहने दिसत नाहीत. त्यातच या रस्त्यावर सूचना फलकांचा पूर्ण अभाव असल्याने बाहेरून येणारे वाहनचालक या धोकादायक वळणाचा अंदाज घेऊ शकत नाहीत. परिणामी वारंवार अशा प्रकारच्या धडकांच्या घटना घडत आहेत. नागरिकांनी मागणी केली आहे की, या वळणावर तातडीने मोठे चेतावणी फलक उभारावेत, रस्त्याच्या कडेला वाढलेले गवत वेळोवेळी कापावे आणि महाम र्गाचे काम तातडीने पूर्ण करावे. अन्यथा भविष्यात मोठी दुर्घटना होऊन जीवितहानी होण्याची शक्यता वर्तविली जात आहे.



## 'आधी तोरण गडाला, मग घराला'

**| खांब | प्रतिनिधी |**

दुर्गवीर प्रतिष्ठान गेले अठरा वर्षे अध्यक्ष संतोष हासुरकर यांच्या मार्गदर्शनाखाली संपूर्ण महाराष्ट्रात अपरिचित असलेल्या अनेक गडांवर गडसंवर्धन करण्याचे कार्यक्रम राबवत आहेत. त्यामुळे आपण संवर्धन करत असलेल्या गडाचे पुजन होणे गरजेचे आहे. या उद्देशाने दसरा निमित्ताने रोहा तालुक्यातील खांब पंचक्रोशीतील वैजनाथ घेरासुरगड गावाजवळ असलेल्या सुरगड गडावर दसरा गडपुजन करण्याचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी आलेल्या सर्वांनी 'आधी तोरण गडाला, मग आपल्या घराला' ही संकल्पना पार पाडली. यावेळी किशोर सावरकर, किरण गायकर, भुषण पाटील, महेंद्र पारठे आदी उपस्थित होते.




## मुलांसाठी किल्ले बनवण्याचे प्रशिक्षण

**| पाताळगंगा | प्रतिनिधी |**

दिवाळी सुट्टीत शाळकरी मुलांना किल्ले बनविण्याचे वेध लागतात. परंतु, त्यांना अनुभव अथवा प्रशिक्षण नसल्यामुळे हवे तसा किल्ला बनविता येत नाही. त्यामुळे गुरुकृपा प्रतिष्ठान आयोजित 'मराठी अमुची मायबोली' स्पर्धेच्या माध्यमातून मुलांसाठी किल्ले बनवण्याचे प्राशिक्षण कर्जतच्या शिवमल्हार गटाच्या माध्यमातून राजिप शाळा माजगाव येथे देण्यात आले. यावेळी बहुसंख्येने शाळकरी मुले उपस्थित होती. ही स्पर्धा ग्रुप ग्रामपंचायत माजगाव या परिसरातील मुलांसाठी असल्याचे संदेश पाटील, मनोज पाटील, किरण ढवाळकर, कौस्तुभ ढवाळकर, प्रतिक काठावले, सुशांत काठावले, तेजस ढवाळकर, आदित्य पाटील, राज काठावले, विवेक ढवाळकर, जीवन काठावले, साहिल जाधव आदिंनी बोलतांना सांगितले. या किल्ल्यांचे परिक्षण नेताजी पालकर मंडळ चौक यांच्या माध्यमातून करण्यात येणार आहे.

## विवाह मिलन पोर्टलचा शुभारंभ

**| अलिबाग | प्रतिनिधी |**

आगरी समाज संस्था अलिबाग यांनी आधुनिकतेकडे वाटचाल सुरू ठेवत आता विवाह व्यवस्थेत नवीन पर्वाची सुरुवात केली आहे. संस्थेच्या सर्वजातीय वधू-वर परिचय केंद्राला आता ऑनलाईन स्वरूप देण्यात आले असून vivahamilan.in या पोर्टलचा शुभारंभ गुरुवारी (दि.२) अलिबागमधील हॉटेल गुरुप्रसाद हॉलमध्ये डॉ. जगन्नाथ पाटील व डॉ. दीपक पाटील यांच्या हस्ते संपन्न झाला. यावेळी सुजाता म्हात्रे, मंगेश म्हात्रे, रणजीत म्हात्रे, प्रविण घरत, ॲड. प्रसाद पाटील, प्रसाद पाटील, सुरेश पाटील, धनंजय म्हात्रे, अनंत म्हात्रे, राजेश पाटील, सतिश पाटील व विलास ठाकूर आदी मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.

**मोबाईलद्वारे शिक्षण देण्यावर भर** | **दसऱ्यानिमित्त वहीमध्ये सरस्वती काढून पूजन**

# ऑनलाईन युगात पाटी पूजन कालबाह्य

**| रायगड | जिल्हा प्रतिनिधी |**

ऑनलाईन शिक्षणाच्या जगतामध्ये मोबाईल अथवा, वहीवर लिखाण करून शिक्षण देण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे प्लास्टीक व लाकडाची पाटी कालबाह्य झाली आहे. या पाटीची जागा आता वहीने घेतली आहे. त्यामुळे जिल्ह्यात दसऱ्यानिमित्ताने गुरुवारी (दि.०२) शाळेतील विद्यार्थ्यांनी वहीवर सरस्वतीचे चित्र काढून वही पूजन केले.

पूर्वी पाटीवर लिहण्याची प्रथा होती. जिल्हा परिषदसह अन्य शाळांमधील विद्यार्थी पाटीवर अभ्यास तसेच लिखाण करीत होते. त्यावेळी पाचवीपर्यंत पाटीवर अभ्यास केला जात होता. पाचवीनंतर वहीवर अभ्यास करण्याची पद्धत होती. परंतु, बदलत्या काळानुसार शिकविण्याची पद्धत बदलण्यात आली. पाटीच्या जागी वही अथवा मोबाईलद्वारे शिक्षण देण्याकडे भर देण्यात आला. गेल्या काही वर्षांपासून ऑनलाईन शिक्षणावर अधिक भर दिला जात आहे. परंतु, वहीमध्ये घरचा अभ्यास लिहून आणण्याचे काम विद्यार्थ्यांना दिले जाते. त्यामुळे काळ्या रंगाची पाटी दिवसेंदिवस दप्तरातून कमी होत आता कालबाह्य झाल्याचे चित्र आहे.



> पुर्वी दसऱ्याला पाटी पुजन केले जात होते. आता मात्र पाटीचा वापर कमी झाला असून वहीचा वापर मोठ्या प्रमाणात केला जात आहे. त्यामुळे हल्ली दसऱ्याला पाटी पुजनाऐवजी वही पुजन केले जाते. वहीवर सरस्वतीचे चित्र काढून फुले अर्पण करून अबीर गुलाल लावला जातो. तसेच, अगरबत्ती लावून पुजन केले जाते.
>
> – रमेश धुमाळ, मुख्याध्यापक, राजेवाडी-अलिबाग

रायगड जिल्हा परिषदेच्या शाळांमध्ये गुरुवारी (दि.२) दसऱ्या निमित्त सरस्वती पूजन करण्यात आले. यावेळी शाळेतील विद्यार्थ्यांनी वहीवर सरस्वतीचे चित्र काढले. ती वही घेऊन सकाळी विद्यार्थी शाळेत आले. एका हातामध्ये वही तर दुसऱ्या हातामध्ये रुमालामधून थोडे तांदूळ, अबीर, गुलाल, फुले, पेन्सील, पेन, अगरबत्ती घेऊन विद्यार्थी शाळेत आले. शिक्षकांनी सर्व विद्यार्थ्यांना रांगेत बसवून वहीची पूजा करण्यास सांगितले. त्यानुसार फुले, गुलाल, अर्पण करून पूजा करण्यात आली. यावेळी मोबाईलच्या युगात रमणाऱ्या शाळकरी मुलांना एक वेगळा आनंद मिळाला. विद्यार्थ्यांनी वहीवर स्वरस्वतीचे चित्र काढून वहीचे पुजन केले. त्यामुळे पाटीची जागा आता वहीने घेतल्याने पाटी कालबाह्य होऊ लागली आहे. मात्र, जिल्ह्यातील काही शाळांमध्ये वही ऐवजी पाटीपूजनच करण्यात आले.

# जेन गुडॉल नावाची आशा

माकडापासून माणूस जन्माला आला हे पूर्वापार बोलले जात असे. रामायणात हनुमानाच्या वानरसेनेने केलेले पराक्रम अनेक शतकांपासून ऐकले जातात. उत्क्रांतीचा सिध्दान्त मांडून डार्विनने माणूस आणि माकड या दोन प्राण्यांचे निकटचे नाते आहे हे दाखवून दिले. तरीही माकडांची माणसासारखी असलेली अनेक वैशिष्ट्ये मानवाला ठाऊक नव्हती. ती पहिल्यांदा उजेडात आणली जेन गुडाल नावाच्या एका तरुणीने. १९६३ मध्ये वयाच्या अवघ्या २९व्या वर्षी नॅशनल जिओग्राफिक या जगप्रसिध्द मासिकात आफ्रिकेतील चिम्पांझींवरचा तिचा लेख प्रसिध्द झाला आणि संशोधकांच्या वर्तुळात एकच खळबळ उडाली. एक चिम्पांझी वारुळात डहाळी टाकून बाहेर काढत असल्याचे तिने पाहिले. त्या वारुळातील वाळवी व मुंग्या बाहेर काढण्यासाठी त्या डहाळीचा तो एखाद्या मोठ्या चमच्यासारखा वापर करीत असल्याचे तिच्या लक्षात आले. तोवरपर्यंत हत्यारे किंवा आयुधे बनवणे हे केवळ माणसेच करतात व अन्य कोण्याही प्राण्यांकडे असा विचार अथवा कल्पना करण्यासारखी बुध्दिमत्ता नसते असे मानले जात असे. पण गुडॉल यांच्या संशोधनाने तो समज बदलून टाकला. आई व मूल यांच्यात काही काळापर्यंत नाते असणे हे सर्व प्राण्यांमध्ये नैसर्गिक आहे. पण चिम्पांझी माणसांप्रमाणे आई व मुलाच्या पलिकडचीही नाती बराच काळ जपतात हाही तिचा निष्कर्ष अनेकांना धक्का देणारा ठरला. या लेखाने प्राण्यांच्या संशोधनामध्ये क्रांती झाली. तिथून पुढे साठ वर्षे गुडॉल यांचे कार्य वेगवेगळ्या रीतीने अक्षरशः शेवटच्या श्वासापर्यंत चालू राहिले. परवा त्यांनी अमेरिकेत ९१व्या वर्षी त्यांचे निधन झाले. त्याही दिवशी कॅलिफोर्नियातील टेकड्यांवर झाडे लावण्याच्या उपक्रमात त्या सहभागी होणार होत्या. त्यासाठी हजारो मुले जमा झाली होती. त्यांना श्रध्दांजली वाहून हा उपक्रम केला गेला. गुडॉल यांनी आधी संशोधक व नंतर निसर्गाच्या रक्षणाच्या चळवळीत काम केले. पर्यावरणाबाबत जागृती करण्यासाठी त्यांनी जगातल्या दोनशे देशांमध्ये सातत्याने भ्रमंती केली व मुले व तरुण मुलांना संशोधनाची प्रेरणा दिली. आपल्या स्वतःच्या जीवनातून त्यांनी या जगात एक आशा निर्माण केली.

### संशोधनाची दृष्टी बदलली

जेन गुडॉल यांचे एकूणच आयुष्य अद्भुत आहे व त्यावर अनेक पुस्तके व सिनेमे निघाले आहेत. त्या मूळच्या अभ्यासक वगैरे नव्हेत. किंबहुना पैसे नसल्याने त्या कॉलेजचे शिक्षणही घेऊ शकल्या नव्हत्या. ३ एप्रिल १९३४ रोजी त्यांचा जन्म इंग्लंडमध्ये झाला. लहानपणापासून त्यांना वाचनाची आवड होती. किरकोळ कारकुनी किंवा हॉटेलात वेटर म्हणून कामे करून त्यांनी काही पैसे साठवले होते. त्यांच्या मैत्रिणीची केनियामध्ये शेती होती. तिकडे सहलीसाठी म्हणून त्या गेल्या. तिथे लुईस लिकी नावाच्या संशोधकाशी तिची ओळख झाली. त्यांनी तिला सेक्रेटरी म्हणून नोकरी देऊ केली. ती तिने स्वीकारली आणि तिथेच तिच्या पुढच्या कारकीर्दीचा पाया घातला गेला. लिकी यांनी तिला टान्झानियातील गोम्बे राष्ट्रीय उद्यानात चिम्पांझीचा अभ्यास करण्यासाठी पाठवले. वास्तविक जेनला प्राणिशास्त्र किंवा विज्ञान संशोधनाचा गंधही नव्हता. पण चिम्पांझीसोबत राहून त्यांचे निरीक्षण करणे हे संयमाची परीक्षा घेणारे असते. त्यासाठी तास न तास व कित्येक महिने एका जागी बसून पाहणी करावी लागते. मुलगी असल्याने जेनला ते जमू शकेल असे लिकी यांना वाटले व तिने ते सार्थ ठरवले. एका प्रचंड मोठ्या गोड्या पाण्याच्या सरोवराच्या काठावर असलेल्या चिम्पांझींच्या कळपाच्या मागावर राहून त्यांचा अभ्यास तिने सुरू केला. ते सोपे नव्हते. कारण चिम्पांझीना मनुष्य वा प्राणी आपल्या जवळपास आलेला सहजी खपत नाही. पण जेनने त्यांचा विश्वास कमावला. इतका की नंतर ती त्यांच्या कुटुंबातील सदस्य झाल्यासारखी झाली. चिम्पांझी येऊन तिची गळाभेट घेऊ लागले. तब्बल वीसेक वर्षे चिम्पांझींच्या दोन-तीन पिढ्यांचे राहणे, वागणे, जेवण-खाण इत्यादींचा अभ्यास जेन यांनी केला. चिम्पांझी हे शाकाहारी नसून मांसही खातात, कळप करून माणसांसारख्या रीतसर लढाया करतात, प्रसंगी प्रचंड क्रूर होऊ शकतात अशा अनेक गोष्टी त्यांनीच पहिल्यांदा जगासमोर आणल्या. चिम्पांझींना तोवर निव्वळ जंगली निर्बुध्द प्राणी म्हणून पाहिले जात असे. पण मूळच्या वैज्ञानिक नसलेल्या जेन यांनी तो समज सप्रमाण खोडून काढला व एकूणच प्राणिजगाकडे पाहण्याची दृष्टी बदलली.

### अखेरपर्यंत कार्यमग्न

जेन यांनी अभ्यासाला सुरुवात केली त्या १९६० च्या काळात या क्षेत्रात महिला नव्हत्या. टांझानियामध्ये जेव्हा त्या प्रथम गेल्या तेव्हा त्यांना महिला असल्याने एकट्या फिरू देण्यास तेथील ब्रिटीश अधिकाऱ्यांनी परवानगी नाकारली. तेव्हा जेन यांची आई त्यांच्यासोबत येऊन राहिली. चिम्पांझी प्रकल्पातून प्रेरणा घेऊन नंतर दोन तरुण महिला संशोधकांनी युगांडातील गोरिला आणि इंडोनेशियातील ओरांग उटान यांचे असेच अभ्यास केले. अर्थात, इतके झाले तरी जेन चिम्पांझींचा संहार थांबवू शकल्या नाहीत. आफ्रिकेतील जंगलांमध्ये सातत्याने त्यांच्या शिकारी होत राहिल्या. शिवाय, जंगलेही नष्ट झाल्याने त्यांचे कळप नाहीसे होऊ लागले. दुष्काळ, पूर अशा आपत्तींमुळेही त्यांच्यावर संकट ओढवले. एकेकाळी दहा लाख असणारे चिम्पांझी आता केवळ चार लाखांवर आले. मग त्यांच्या संरक्षणासाठी तसेच एकूण निसर्गविषयक जागृतीसाठी आपल्याला जंगलांमधून बाहेर पडून कार्यकर्त्याची भूमिका करायला हवी हे जेन यांना कळले. मग त्यांनी जेन गुडाल इन्स्टिट्यूटची स्थापना केली. जगभरात साठ देशांमध्ये तिचे कार्य पसरले. तरुण मुलांमध्ये जागृती हे जेन यांनी आपले ध्येय ठेवले होते. काही महिन्यांपूर्वी त्या भारततही येऊन गेल्या होत्या. जंगलांचे संवर्धन करणे, प्राण्यांचे रक्षण करणे व पर्यावरणाचा ऱ्हास रोखणे यासाठी त्यांनी झपाटल्याप्रमाणे प्रचार केला. वास्तविक जेन यांचा खरा जीव जंगलावर होता. निसर्गाच्या सानिध्यातला एकांतवास त्यांना अधिक हवाहवासा वाटे. सततचे प्रवास, हॉटेल्स, विमानतळे, शहरे इत्यादींमधला गोंगाट नकोसा वाटे. पण आपल्या कामासाठी हे सहन केले पाहिजे अशी त्यांची मनोभूमिका होती. आपण एका अंधारलेल्या बोगद्यात असून त्याच्या टोकाशी एक प्रकाशमान तारा आहे. पण त्या ताऱ्याचा नुसता विचार करून भागणार नाही, तर सतत चालत राहावे लागेल असे त्या म्हणत. अगदी ९०व्या वर्षीही सतत कार्यमग्न राहण्यामागे हीच प्रेरणा होती. पण त्यात निव्वळ शास्त्रीय संशोधनाचा कठोरपणा नव्हता. तर प्रेमाची, माणुसकीची भावना अधिक होती. ज्यांचा अभ्यास केल्या त्या चिम्पांझींना त्यांनी माणसांची नावे ठेवली होती. एका मोठ्या मादी चिम्पांझीचे नाव फ्लो तर एका मोठ्या नराचे नाव डेव्हिड ग्रेबर्ड असे होते. संशोधन जगताचा याला विरोध होता. ते या प्राण्यांकडे केवळ अभ्यासाचा विषय किंवा वस्तू म्हणून पाहू इच्छित होते. पण जेन ही मुळात परस्परे जडो असे मानणारी संशोधक होती. तिला सलाम.

## विचार

# परिस्थितीची जाग की आंदोलनाची हाक?

**नेपाळमध्ये सरकारच्या विरोधात युवाशक्तीने उठाव केला, हिंसाचार झाला, युवकांच्या प्रक्षोभापुढे प्रशासन हतबल झाले आणि सरकारला राजीनामा द्यावा लागला. नेपाळअगोदर श्रीलंका आणि बांगलादेशमध्येही युवाशक्तीच्या आक्रोशापुढे सत्तांतर झाले. काँग्रेसचे नेते राहुल गांधी यांच्या मते देशातील युवक, विद्यार्थी, जनरेशन झी संविधानाचे रक्षण करेल. यातून त्यांना नेमके काय अभिप्रेत आहे? भारतात असे बंड घडू शकते का?**



डॉ. सुकृत खांडेकर

आपल्या देशात कोणता मुद्दा कधी मूळ धरेल आणि पाहता पाहता चर्चेचा, आंदोलनांचा विषय बनेल किंवा बनवला जाईल, हे सांगता येत नाही. मात्र असे विषय देशभरात गाजत आणि मतमतांतरे समोर आणत राहतात. बरेचदा ही चर्चा अनावश्यक असते तर बरेचदा ती काळाच्या कसोटीवर खरी उतरण्याची गरज असते. अशीच एक चर्चा अलिकडे देशभरात ऐकायला मिळाली. ज्या वेगाने हा विषय समोर आला, त्याच वेगाने तो शमलाही. मात्र त्याचा विचार करण्याची गरज जाणवली. नेपाळमध्ये सरकारच्या विरोधात जनरेशन झेड (युवाशक्ती) ने उठाव केला, हिंसाचार झाला, युवकांच्या प्रक्षोभापुढे प्रशासन हतबल झाले, सरकारला राजीनामा देऊन पळ काढावा लागला. नेपाळच्या अगोदर श्रीलंका आणि बांगलादेशमध्येही युवाशक्तीच्या आक्रोशापुढे सत्तांतर झाले. या पार्श्वभूमीवर भारतात असे काही घडू शकते का, असा मुद्दा अनेक धुरिणांच्या चर्चेत आला. हे घडत असतानाच काँग्रेसचे नेते आणि लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी केलेल्या एका ट्वीटमळे अनेकांचा डोळे विस्फारले. राहुल गांधी म्हणतात, देशातील युवक, विद्यार्थी, 'जनरेशन झी' संविधानाचे रक्षण करेल. लोकशाही वाचवतील आणि मतांची चोरीही रोखतील. मी त्यांच्याबरोबर आहे. काहीसे अनावश्यक आणि अस्वस्थता निर्माण करणारे हे ट्विट पुढे आल्यानंतर राजकीय आणि अन्य व्यासपिठांवर याबाबत प्रश्न विचारले गेले.

नेपाळमध्ये युवकांनी रस्त्यावर येऊन केलेल्या आंदोलनाचा उल्लेख राहुल गांधी यांनी केला नसला तरी त्यांचे ट्वीट वाचताना नेपाळमधील युवकांचा संघर्ष डोळ्यापुढे आला. राहुल गांधी यांनी असे ट्वीट करून युवकांच्या मनात असंतोष खदखदतो आहे, असा इशारा सरकारला दिला आहे का, असा प्रश्न पडला. गेल्या वर्षी झालेल्या लोकसभा आणि विधानसभा निवडणुकीमध्ये व्होटचोरी कशी झाली, याचे पुरावे देत राहुल गांधींनी गेले काही दिवस निवडणूक आयोगाची व सरकारची झोप उडवली. व्होट चोरीला निवडणूक आयोग संरक्षण देत आहे असा त्यांनी जाहीर आरोप केला. देशातील युवकांची ताकद आपल्या पाठिशी आहे असे काँग्रेस पक्ष सांगत आहे तर देशात काँग्रेसला नेपाळप्रमाणे आंदोलन घडवायचे असल्याचा आरोप भाजपा करत आहे. त्यातच सॅम पित्रोदा यांनी पाकिस्तानात आपल्याला घरासारखे वाटते असे म्हणत भाजपाला आयते कोलित दिले.

या महिन्याच्या प्रारंभी नेपाळमध्ये हजारो युवकांनी रस्त्यावर येऊन सरकारविरोधात संघर्ष केला. हिंसाचार, जाळपोळ केली. सरकारी इमारती, राष्ट्रपती, पंतप्रधान, मंत्र्यांची निवासस्थाने पेटवली, न्यायालयाच्या इमारतीला आग लावली, मंत्र्याना पळता भुई थोडी केली, पाठलाग करून मंत्र्यांना लाथा घातल्या, हे सर्व आश्चर्यकारक होते. पोलीस गोळीबारात पंचावन्न तरूणांचा बळी गेला. नेपाळ सरकारने फेसबुक, एक्स, युट्युब, इंस्टाग्राम आदी सोशल मिडियावर बंदी घातल्याचे निमित्त होऊन युवकांची माथी भडकली आणि ते रस्त्यावर उतरले. सोशल मिडिया केवळ टाइमपासचे माध्यम नाही, तर शिक्षण, रोजगार व जागतिक घडामोडींची वेगवान माहिती मिळवण्याचे साधन आहे असा दावा केला जात आहे. आजकाल तर रिल्स हे कमाईचे साधन बनले आहे. देश-विदेशात लक्षावधी लोक व्हिडिओ कॉलवरून संवाद साधत असतात. सोशल मिडिया हे परस्परांशी संवादाचे प्रभावी साधन आहे. या व्यासपिठावरुन जगभरात किती अब्ज रुपयांचा ऑनलाइन बिझनेस होत असेल हे सांगणेही कठीण आहे. मग नेपाळ सरकारने युवाशक्तीच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम का केले? नेपाळमधील संघर्षाच्या पार्श्वभूमीवर भारतातील युवक संविधानाचे रक्षण करतील आणि मतांची चोरी रोखतील असे राहुल गांधी यांनी म्हटले आहे म्हणूनच त्यांना भारतात नेपाळप्रमाणे आंदोलन होऊ शकते असे सुचवायचे आहे का, असा प्रश्न पडला.

राहुल गांधी यांनी बिहारमध्ये व्होट अधिकार यात्रा काढली, राजदचे नेते आणि लालूप्रसाद यादव यांचे पुत्र तेजस्वी यादव यांनीही राहुल यांना तेथे साथ दिली. कर्नाटक आणि महाराष्ट्रात एकेका मतदारसंघात सहा- सहा हजाराहून अधिक मतांची कशी चोरी झाली त्याची आकडेवारी त्यांनी दिली. बिहार यात्रेत दिलेली घोषणा 'व्होट चोर- गद्दी छोड' ही देशात घरोघरी पोचली. या घोषणेनंतर भाजपाचे केंद्रातील व राज्याराज्यातील प्रवक्ते, नेते व मुख्यमंत्री राहुल खोटे बोलतात म्हणून एक सुरात तुटून पडले. राहुल गांधींनी आपल्या पत्रकार परिषदांमधे केंद्रीय मुख्य निवडणूक आयुक्तांवर मतचोरांचे संरक्षक असल्याचा आरोप केला. आपल्याकडे मतचोरीचे भरपूर पुरावे आहेत असे सांगत त्यांनी दिल्लीमध्ये सादरीकरण केले. राहुल गांधी आता शांत बसायला तयार नाहीत. आपला देश आणि संविधान हे महत्वाचे आहे, असे ते वारंवार सांगत आहेत. 'भारत जोडो' यात्रेत युवकांनी न्यायासाठी झटले पाहिजे अशी भाषा राहुल गांधी वापरत होते. आता पुन्हा ते युवाशक्तीला आवाहन करताना दिसत आहेत.

भाजपाचे खासदार निशिकांत दुबे यांनी एक्सवर म्हटले आहे की, जनरेशन झेड घराणेशाहीच्या विरोधात आहे. पं. जवाहरलाल नेहरू, इंदिरा गांधी, राजीव गांधी, सोनिया गांधी आता राहुल आणि प्रियांका या घराणेशाहीला 'जनरेशन झेड' कशी मान्यता देईल? जेन झी भ्रष्टाचाराच्या विरोधात आहे. युपीए सरकारमधील घोटाळे कसे विसरता येतील? राहुल यांचे विदेश दौरे व सॅम पित्रोदा यांना मिळणारा विदेशी पैसा याची या पार्श्वभूमीवर चौकशी व्हायला हवी.

नेपाळमधील युवा क्रांती सरकारमधील घराणेशाहीविरोधात होती. काँग्रेसची भारतात ओळखच घराणेशाही आणि घोटाळे अशी आहे, असे भाजपा खासदार प्रदीप भांडारी यांनी म्हटले आहे. माजी खासदार सुब्रत पाठक यांनी तर कहरच केला आहे. ते म्हणतात, भारतात नेपाळसारखी क्रांती झाली तर लोक राहुल-अखिलेश यांच्या घरांना आग लावतील. ठाकरे यांच्या शिवसेनेने राहुल गांधींच्या वक्तव्याला साथ दिली. भारतातही असे घडू शकते, भाजपाने तयार राहावे, असे ते म्हणाले. या सर्व चर्चांवर संयुक्त जनता दलाचे निरजकुमार म्हणाले, की भारत म्हणजे बांगलादेश नाही आणि नेपाळही नाही. भारताचे संविधान मजबूत आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटले की, निवडणूक आयोगाला बदनाम करणे ही काँग्रेसची जुनी चाल आहे. दरम्यान, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते सॅम पित्रोदा यांनी आपण पाकिस्तानात गेलो की घरासारखे वाटते; बांगलादेश आणि नेपाळमध्येही असेच वाटते. त्यांनी असे म्हटल्यानंतर राहुल गांधींवर तुटून पडणारी भाजपाची फळी पित्रोदांकडे वळाली. त्यांना देशद्रोही ठरवण्यापर्यंत मजल गेली. शहजाद पुनावाला यांनी एक्सवर म्हटले की, २६ /११ च्या दहशतवादी हल्ल्यावर काँग्रेस मूग गिळून गप्प का बसली आणि पुलवामा घटनेच्या वेळी पाकिस्तानला काँग्रेसने साथ का दिली हे आत्ता उअमगते आहे. राहुल गांधी वारंवार सांगत आहेत की, संविधान धोक्यात आहे. पण हे सांगताना ते केवळ मतांच्या चोरीविषयी बोलत आहेत की रस्त्यावर युवाशक्ती उतरेल असा इशारा देत आहेत?

सोशल मिडियावर राहुल यांच्या वक्तव्यावर प्रतिक्रियांचा वर्षाव होताना दिसला. राहुल गांधी 'एक्स'वर 'व्होट चोरी फॅक्टरी' असा उल्लेख करत असतानाच मुंबईत रात्री दोन वाजता नवा ॲप्पल फोन खरेदी करण्यासाठी तरूणाईची झुंबड बघायला मिळाली. काँग्रेसच्या काळात घरगुती गॅस सिलेंडरसाठी रांगा दिसायच्या, आता ॲप्पल फोनसाठी रांगा लागत आहेत. या पार्श्वभूमीवर बिहारमधील निवडणुकीच्या निकालानंतर जनरेशन झेड राहुल गांधीबरोबर आहे की अन्य कोणाबरोबर, समजेल अशी आजची परिस्थिती आहे. आग आणि हिंसाचाराच्या माध्यमातून नव्हे तर मतदानातून सत्तांतर घडवण्याची ताकद देशातील युवकांमधे आहे. भारत हा बांगलादेश, श्रीलंका किंवा नेपाळपेक्षा वेगळा आहे. त्या दृष्टीने पाहिले जावे, हीच कोणत्याही भारतीयाची अपेक्षा असणार आहे.

## चर्चा आजची

# शेतकऱ्यांवर सरकारची अनास्था

वैभव पाटील

निसर्गाच्या रौद्र रूपापुढे, गरीब शेतकऱ्यांचं आयुष्य किती क्षणभंगुर आहे, याची जाणीव पुन्हा एकदा झाली. या पुराच्या पाण्याने नुसती घरंच नाही, तर अनेकांचे आयुष्य उद्ध्वस्त झाली आहेत. पोटाची भूक भागवणारी शेती मातीमोल झाली. डोक्यावरचं घर कोसळलं, संसार रस्त्यावर आला. तो संकटात असेल तेव्हा त्याला आधार देऊन उभे करणे हे सरकारचे काम आहे. कारण शेतकरी जगला तर जग जगेल. निसर्गाने मारल्यावर सरकारने तारले पाहिजे, पण शेतकऱ्यांच्या बाबतीत तसे होताना दिसत नाही. ढग दाटलं, आभाळ फाटलं अन् शिवार भरून पाणी पडलं. नद्या, नाले, ओढे पाण्याने तुडुंब भरून वाहत आहेत. पोटच्या लेकरापेक्षाही जिवापाड जपलेली पिकं डोळ्यादेखत पाण्यात नासू लागली आहेत. त्यामुळे मुसळधार पावसाने नद्यांना महापूर असला तरीही न भूतो न भविष्यती अशा नुकसानीमुळे नद्यांच्या महापुरापेक्षा शेतकऱ्यांच्या डोळ्यातील अश्रूंचा महापूर मात्र थांबेना झाले आहे. शेतकऱ्याला आपण बळीराजा म्हणतो पण तो राजा राहिला नसून त्याचा दररोज बळी जात आहे. सर्वांचे पोट भरतो म्हणून त्याला आपण अन्नदाताही म्हणतो. पण त्याच्यावरच उपाशी राहण्याची वेळ नेहमीच येत आहे. शेतकऱ्यांचे दुःख, व्यथा, समस्या कधीच संपत नाहीत. निसर्गाचा लहरीपणा तर त्यांच्या पाचवीलाच पुजलेला आहे. कधी चांगले पीक आले तर बाजारात भाव नसतो. बाजारात भाव असला, तर उत्पन्न येत नाही. दुष्काळ, अवकाळी, गारपीट या संकटानेही त्याला घेरले आहे. नैसर्गिक संकटे कमी की काय म्हणून, सरकारी धोरणांनी शेतकऱ्यांचा छळ मांडलेला आहे. शेती करणे आता परवडत नाही. शेतकऱ्यांनी जीवाची जोखीम पत्करून राबणाऱ्या शेतकऱ्याच्या



शेतात आज पाणीच पाणी दिसत आहे. घाम गाळून उभं केलेलं पीक काही क्षणात पाण्याखाली गेले. शेती हा शेतकऱ्याचा व्यवसाय नाही, तर जगण्याचा आधार आहे. आज या संकटात शेतकरी बांधवांसोबत उभं राहणं ही आपली सामूहिक जबाबदारी आहे. पण मायबाप सरकारची तर बातच निराळी. प्रत्येक मंत्री, नेता मी शेतकऱ्याचा मुलगा आहे, असेच म्हणतो; पण त्याला खुर्चीवर बसल्यावर त्यांच्या व्यथा मात्र दिसत नाहीत. कर्जमाफी असो वा अनुदान असो केवळ घोषणाबाजी सुरू आहे. आपणच शेतकऱ्यांचे कैवारी आहोत, हे दाखवण्यासाठी कोट्यवधी रुपये जाहिरातबाजीवर उधळायचे, पण शेतकऱ्यांना मदत द्यायची वेळ आली की टाळाटाळ करायची. दररोजच भाग बदलून पाऊस पडत आहे. उभी पिके आडवी होऊन सडू लागली आहेत. शेतकऱ्यांच्या हातात काहीच पडणार नसल्याने शासनाने भरीव मदत करणे गरजेचे आहे. परंतु, सध्या सुरू असलेल्या चर्चेनुसार जुन्या निकषानुसार हेक्टरी ८ हजार ५०० रुपये मदत दिली जाणार आहे. महापुरामुळे शेतकऱ्यांचे कोठ्यावधी रुपयांचे नुकसान झाले आहे. परंतु शासनाकडून मात्र शेतकऱ्यांना हजाराच्या पटीत नुकसान भरपाई मिळते त्यामुळे सरकार शेतकऱ्यांचे नुकसान भरपाई कशी देणार याकडे सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. या तुटपुंज्या मदतीमुळे शेतकऱ्यांचा लागवड खर्चही निघणार नसल्याने शासनाने ही मदत देणे म्हणजे शेतकऱ्यांच्या जखमेवर मीठ चोळण्यासारखे असल्याच्या भावना शेतकऱ्यांमधून व्यक्त होऊ लागल्या आहेत. सुखी आणि संपन्न राज्याचे स्वप्न पाहणाऱ्या शेतकऱ्यांच्या वाट्याला हालाखीचे आणि उपेक्षेचे दिवस आले आहेत. पावसामुळे महाराष्ट्रात भातशेतीवर मोठ्या प्रमाणावर संकट निर्माण झाले असून अनेक जिल्ह्यांत अतिवृष्टी, पूर आणि शेतात पाणी साचल्यामुळे पिकांचे मोठ्या प्रमाणावर सर्वत्र नुकसान झाले आहे. भात शेतीवरील परिणाम अत्याधिक पाऊस आणि पूरस्थितीमुळे कापणीला आलेले भात व इतर खरीप पिके पाण्यात बुडाली आहेत. काही जिल्ह्यांमध्ये शेतांमध्ये पाणी साचल्याने उभ्या पिकांचा चिखल झाला आहे, हातातोंडाशी आलेली पीक फुकट गेली. बळीराजावर संकट शेतकऱ्याचे केवळ आर्थिक नुकसान नव्हे, तर कर्जवाढ, पुढील वर्षांच्या लागवडीस अडचण, कुटुंबासमोरील प्रश्न निर्माण झाले आहेत. आता उठवू सारे रान, आता पेटवू सारे रान, शेतकऱ्यांच्या राज्यासाठी लावू पणाला प्राण असे साने गुरुजींनी म्हटले आहे. परंतु सरकार शेतकऱ्यांच्या राज्यासाठी त्यांचेच प्राण घेत आहे. हा कसला न्याय आहे. राज्यसरकारी कर्मचारी, शिक्षक, प्राध्यापक, इंजिनियर यांचा दरवर्षी वेतनवाढ मिळते. काहींना दिवाळी चांगली व्हावी म्हणून दिवाळीचा बोनस सरकार देते. पण शेतकऱ्यांसाठी सरकार काय देते? सरकार देत नाही पण त्यांचा जीव जरूर घेते.

## लोकसंसद

### वृद्धांवरील अत्याचार कधी थांबणार?



देशातील वृद्धांना, ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य करत त्यांच्यावरील अत्याचाराचे प्रमाण वाढल्याचे नुकत्याच प्रसिद्ध झालेल्या राष्ट्रीय गुन्हे नोंद ब्युरो (एनसीआरबी)च्या अहवालातून स्पष्ट झाले आहे. संपूर्ण देशात वृद्धांतरील अत्याचाराचे एकूण २७ हजार ८८६ गुन्हे दाखल झाले असून पहिल्या क्रमांकावर मध्य प्रदेश (५ हजार ७३८ गुन्हे) आहे. तर महाराष्ट्र दुसऱ्या स्थानी असून महाराष्ट्रात ५ हजार ११५ गुन्ह्यांची नोंद झाली आहे. त्यानंतर अनुक्रमे तामिळनाडूमध्ये २ हजार १०४ आणि कर्नाटकात १ हजार ८४० प्रकरणे नोंदली गेली. केंद्रशासित प्रदेश दिल्लीमध्ये १ हजार ३६१ प्रकरणे नोंदली गेली. एक लाख वृद्ध लोकसंख्येमागे ११८.६ हा सर्वाधिक गुन्हेगारीचा दर असून अहवालात २०२३ मध्ये ज्येष्ठ नागरिकांना लक्ष्य करून १ हजार ९१४ खून, १०४ बलात्कार आणि ७२१ हत्येच्या प्रयत्नाची प्रकरणे नोंदवली गेली. एनसीआरबीने राज्यातील मुंबई, नागपूर आणि पुणे या शहरांसह देशातील १९ महानगरांमधील गुन्हेगारीचा आढावा घेतला असता त्यात दिल्ली (१ हजार ३६१ गुन्हे) आघाडीवर असून बंगळुरू (६४९ गुन्हे) दुसऱ्या क्रमांकावर तर मुंबईचा (५१८ गुन्हे) तिसरा क्रमांक लागतो. २०२३ मध्ये वृद्धांच्या अत्याचाराच्या गुन्ह्यांच्या प्रकारांमध्ये सर्वाधिक २७.३ टक्के प्रकरणे 'साधी दुखापत' अंतर्गत नोंदवली गेली, त्यानंतर 'चोरी' अंतर्गत १४.८ टक्के प्रकरणे तर 'फसवणूक' अंतर्गत १२.५ टक्के प्रकरणे नोंदवली गेली. एकूणच या अहवालाने देशातील वृद्ध असुरक्षित असल्याचे पुन्हा एकदा स्पष्ट झाले असल्याने देशातील वृद्धांची विशेष काळजी घेण्यासाठी सरकारने उचित पावले उचलण्याची गरज आहे.

**– प्रदीप अनुसया शंकर मोरे, अंधेरी**

## दिनविशेष

# सुप्रसिद्ध गायक नट केशवराव भोसले

केशवराव भोसले हे मराठी संगीत रंगभूमीवरील एक सुप्रसिद्ध गायक नट होते. त्यांचा जन्म ९ ऑगस्ट १८९० रोजी कोल्हापूर येथे झाला. जनुभाऊ निमकर यांसारख्या कुशल नाट्यदिग्दर्शकाचे मार्गदर्शन त्यांना लाभले. तर दत्तोपंत जांभेकरबुवा यांच्याकडून शास्त्रीय संगीताची तालीमही मिळाली. सुरुवातीस बालकलाकार किंवा स्त्री पात्राच्या लहानसहान भूमिका करताना त्यांना गोविंद बल्लाळ देवल यांच्या शारदा या नाटकात शारदेच्या भूमिकेची संधी मिळाली. या भूमिकेने त्यांचे नाव सर्वतोमुखी झाले.

यानंतर त्यांनी सौभद्र, मृच्छकटिक इत्यादी नाटकांतही सुभद्रा, वसंतसेना या भूमिका केल्या. त्याही खूप गाजल्या. १९०७ साली त्यांनी स्वदेश हितचिंतक ही नाटक मंडळी सोडली आणि १ जानेवारी १९०८ रोजी हुबळी येथे 'ललितकलादर्श संगीत नाटक मंडळी' ही नाट्यसंस्था स्थापन केली. सुरुवातीस ही नाटक मंडळी शारदा, सौभद्र वगैरे जुनी नाटके करीत असे. नंतर राक्षसी महत्त्वाकांक्षा हे नाटक जोमदार संवाद, कर्णमधुर संगीत आणि नावीन्यपूर्ण देखावे यामुळे हे नाटक त्याकाळी अतिशय लोकप्रिय झाले. यातील मृणालिनी या त्यांच्या स्त्री पात्रातील भूमिकेस रसिकांचा उदंड प्रतिसाद मिळाला.

शाहू महाराज १९०२ रोजी परदेशात गेले होते. त्यावेळी त्यांनी रोमला भेट दिली. तेथे त्यांना कुस्ती मैदान आणि नाट्यगृह दिसले. तशी योजना त्यांनी आखली आणि आपल्या कोल्हापूर संस्थानात अंमलातही आणली, असा संदर्भ लेखक बाबुराव धारवाडे यांच्या 'जुनं कोल्हापूर' या पुस्तकात सापडतो.

थिएटर पॅलेस कसा उभा राहिला, याबाबत धारवाडे यांनी त्यांच्या पुस्तकात माहिती दिली आहे. शाहू महाराज भारतात परत आले. कोल्हापुरात आल्यानंतर त्यांनी खासबाग परिसर पाहिला. खासबाग मैदानासाठी आणि थिएटरसाठी ही जागा योग्य असल्याचे निश्चित होताच याठिकाणी कुस्तीचे मैदान आणि पॅलेस थिएटर उभारण्याचे ठरवले. पॅलेस थिएटरचा प्लॅन कागलचे ओव्हरसियर जिवबा कृष्णाजी चव्हाण यांच्याकडून त्यांनी करून घेतला. १९१३ साली पॅलेस थिएटरच्या बांधकामाला सुरुवात झाली. १९१५ रोजी बांधकाम पूर्ण झालं. १४ ऑक्टोबर, १९१५ च्या दसऱ्याला युवराज राजाराम महाराज यांच्या हस्ते उद्घाटन समारंभदेखील झाला.

सागवानी फळ्यांनी सजवून थिएटरची रचना अशी करण्यात आली की, शेवटी बसलेल्या प्रेक्षकांनाही नाटक चांगले दिसावे. थिएटरमध्ये आवाज घुमू नये म्हणून मंचाखाली विहिरीएवढी खोली तयार करून त्यावर या जाड सागवानी फळ्या टाकण्यात आल्या होत्या. असे जुने जाणकार सांगायचे. राजाराम कॉलेजच्या गॅदरिंगसाठी एकदा राजगोपालाचारी आले होते. त्यांनीही नाट्यगृहाच्या रचनेचे कौतुक केले होते.

बाळासाहेब देसाई बांधकाम मंत्री झाल्यावर (१९५७) पॅलेस थिएटरचे मनामकरण केशवराव भोसले नाट्यगृहफ करण्यात आले. तेव्हापासून आजतागायत केशवराव भोसले नाट्यगृह नावानेच ते प्रसिद्ध आहे.

१९१५ मध्ये त्यांनी संगीत मानापमान या नाटकाचा पहिला प्रयोग मुंबईत केला. पुढे मामा वरेरकर लिखित हाच मुलाचा बाप, संन्याशाचा संसार ही दोन सामाजिक नाटके केशवरावांनी रंगभूमीवर आणली. टिळक स्वराज्य फंडाच्या मदतीसाठी 'गंधर्व' व 'ललितकलादर्श' या नाटकमंडळ्यांतर्फे मानापमान नाटकाचा संयुक्त प्रयोग नाट्यगृहात झाला. या प्रयोगास प्रेक्षकांचा अभूतपूर्व असा प्रतिसाद मिळाला. त्यानंतर त्यांनी बालगंधर्वांसोबत सौभद्र या नाटकाचाही संयुक्त प्रयोग केला. टिपेच्या सुरांना सहज व स्वच्छपणे पोहोचणारा आवाज आणि अत्यंत प्रभावी तान हे त्यांच्या गायनाचे वैशिष्ट्य होते. त्यांना अच्युत कोल्हटकर यांनी संगीतसूर्य असे संबोधले होते. अशा या श्रेष्ठ गायकाचे ४ ऑक्टोबर १९२१ रोजी निधन झाले.

## बोध भक्त पुंडलिक

भक्त पुंडलिकाच्या निष्काम कर्मावर संपुष्ट होऊन भगवान पांडुरंग पुंडलिकावर प्रसन्न झाले.पुंडलिकाने देवाकडे एक वीट टाकून आपले काम पूर्ण होईपर्यंत थांबायला सांगितले. पुंडलिकाचे काम संपले आणि त्यांनी पांडुरंगाच्या पायावर लोळण घेतली. पांडुरंग आणि स्वतः, पुंडलिकला उठवले आणि विचारले, पुंडलिका! तुझ्या निष्काम कर्मयोगाने मी संतोष झालेलो आहे. मी तुझे काय भले करू, तुला काय हवे ते माग! भक्त पुंडलिकाला कशाची च इच्छा नव्हती. तो पांडुरंगाला म्हणाला, देवा लाखो भक्त तुझ्या दर्शनाची चातका प्रमाणे वाट पाहत आहे. त्यांना दर्शन देण्यासाठी तुम्ही इथे असेच राहा. भीमा तीरी भक्तांची वाट पाहत तो जगजेठी कटेवर हात ठेवून अजूनही उभा आहे. भक्तांच्या शब्दाबाहेर भगवंत कसा जाणार?

**श्रीज्ञानेश्वरभावहृदय आबामहाराज परांजपे**
**साधना आश्रम, दातार आळी, पेण.**

# नेरुळ शिवस्मारकाचे लोकार्पण रखडले

## ● स्वतःच स्मारकाचे उद्घाटन करण्याचा शिवप्रेमींचा इशारा

**। नवी मुंबई । प्रतिनिधी ।**

**नेरुळ सेक्टर-१ मधील छत्रपती शिवाजी महाराज चौकातील स्मारकाचे काम पूर्ण होऊनही केवळ राजकीय श्रेयाच्या वादामुळे लोकार्पण सोहळ्याला मुहूर्त मिळत नसल्याने शिवप्रेमी आक्रमक झाले आहेत.**

दसऱ्याच्या शुभमुहूर्तावर हे स्मारक खुले करण्याचा इशारा सकल मराठा समाजाने दिला होता, मात्र तोही मुहूर्त उलटला. आता दिवाळीपूर्वी उद्घाटन न झाल्यास, दि. २२ ऑक्टोबर रोजी (पाडव्याला) शिवभक्त स्वतःच स्मारकाचे लोकार्पण करतील, असा इशारा शिवप्रेमींकडून देण्यात आला आहे.



शिरवणे येथील राजीव गांधी उड्डाणपुलाजवळ असलेल्या या चौकात महाराजांची सिंहासनारूढ मूर्ती बसवण्यात आली आहे. परंतु, गेल्या चार-पाच महिन्यांपासून ही मूर्ती झाकून ठेवण्यात आली आहे. निवडणुकीच्या तोंडावर जाणीवपूर्वक हा सोहळा पुढे ढकलला जात असल्याचा आरोप सकल मराठा समाजाने केला आहे. १० सप्टेंबर रोजी पालिकेला दिलेल्या पत्रात त्यांनी ६ ऑक्टोबरपर्यंत उद्घाटन करण्याची मागणी केली होती. तर २९ सप्टेंबर रोजी दिलेल्या पत्रात दसऱ्याच्या मुहूर्तावर लोकार्पण करण्याचा इशारा दिला होता. मात्र, पालिकेकडून कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने शिवभक्तांमध्ये तीव्र संताप आहे.

सकल मराठा समाजाने पालिकेला पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे की, जर दिवाळीपूर्वी स्मारकाचे उद्घाटन झाले नाही, तर २२ ऑक्टोबर रोजी सकाळी १० वाजता समस्त शिवभक्तांच्या उपस्थितीत हे लोकार्पण केले जाईल. यावेळी ढोल-ताशा आणि महिला लेझीम पथकांचा सहभाग असेल. प्रशासनाने यात अडथळा आणल्यास किंवा आमच्यावर गुन्हे दाखल झाले तरी आम्हाला त्याची पर्वा नाही. महाराजांना या अवस्थेत जास्त काळ ठेवणे आम्हाला सहन होत नाही. त्यामुळे यानंतर निर्माण होणाऱ्या परिस्थितीला सर्वस्वी प्रशासन जबाबदार असेल, असा निर्वाणीचा इशारा सकल मराठा समाजाने दिला आहे.

### पालिका प्रशासनाची भूमिका संभ्रम वाढवणारी

याबाबत पालिका प्रशासनाची भूमिका मात्र संभ्रम वाढवणारी आहे. कार्यकारी अभियंता उमेश पाटील यांनी अभियंता विभागाचे काम पूर्ण झाले आहे. आता पुतळ्याच्या लोकार्पणाचे काम प्रशासकीय विभागाचे असल्याचे सांगितले आहे. तर महापालिकेच्या जनसंपर्क विभागाकडून मिळालेल्या माहितीनुसार हे काम शहर अभियंत्यांचे असल्याचे सांगण्यात आले आहे. त्यामुळे एकमेकांवर जबाबदारी ढकलणारे प्रशासन आणि राजकीय अनास्था यामुळेच स्मारकाचे लोकार्पण रखडल्याचा आरोप शिवप्रेमींनी केला आहे.

## निवडक



### राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संचलन

**खांब :** देश पातळीवर देशहितासाठी कार्यरत असणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाची तळवलीतर्फे अष्टमी येथे कार्यरत असणाऱ्या शाखेतर्फे विजयी दशमीला संचलन करण्यात आले. विजयादशमी, २ ऑक्टोबर २०२५ रोजी संघ स्थापनेला १०० वर्ष पूर्ण झाली. त्या अनुषंगाने संपुर्ण देशभर विविध प्रकारच्या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यक्रमांतर्गत विजयादशमी उत्सव रविवार दि.५ ऑक्टोबर रोजी ३.३० वा. नदी संवर्धन केंद्र, रोहा येथे साजरा करण्यात येणार आहे. त्या अनुषंगाने कार्यक्रमाच्या पूर्व तयारीचा एक भाग म्हणून तळवली येथे गेल्या ४० वर्षांहूनअधिक काळ कार्यरत असणाऱ्या आरएसएसच्या तळवली तर्फे अष्टमी या शाखेच्या वतीने विजया दशमीला एक विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून एक शाखा भरविण्यात आली. तसेच संघाचा गणवेश परिधान करून गावातून संघाचे संचलन करण्यात आले.



### स्नेह ज्येष्ठ नागरिकांची प्रभातफेरी

**कोलाड :** जागतिक जेष्ठ नागरिक दिनाचे औचित्य साधून स्नेह ज्येष्ठ नागरिक कल्याणकारी मंडळ कोलाड यांच्या वतीने बुधवारी (दि.१) प्रभातफेरी काढण्यात आली. ही प्रभात फेरी सकाळी १० वाजता कोलाड जेष्ठ नागरिक हॉल ते प्रभाकर हॉटेलपर्यंत काढण्यात आली. यावेळी असंख्य जेष्ठ नागरिक उपस्थित होते. या प्रभातफेरीत कोलाड पोलिसांचे उत्तम असे सहकार्य लाभले. 'जेष्ठ नागरिक दिनाचा विजय असो', 'जेष्ठ भारत, श्रेष्ठ भारत' असे घोषवाक्य देऊन प्रभातफेरी काढण्यात आली. यावेळ सर्व उपस्थित जेष्ठ नागरिक यांना सामाजिक कार्यकर्ते चंद्रकांतजी लोखंडे आंबेवाडी यांच्याकडून फराळ, चहाची व्यवस्था करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व कार्यकारिणीनी मंडळ व सर्व सदस्य यांनी मेहनत घेतली. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वच उपस्थितांचे व मदत करणाऱ्या नागरिकांचे तसेच कोलाड पोलीस व पत्रकारांचे आभार मानून कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.



### विद्यार्थ्यांनी घेतले वाहतूक नियमांचे धडे

**चिरनेर :** उरण तालुक्यातील जासई येथील रयत शिक्षण संस्थेच्या छत्रपती शिवाजी विद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी वाहतूक नियम विषयक व्याख्यान आयोजित केले होते. यात उरण वाहतूक शाखेचे वरिष्ठ पोलिस निरीक्षक अतुल दहिफळे यांनी विद्यार्थ्यांना महत्वपूर्ण असे वाहतूक नियमांचे धडे दिले. याचा अधिकाधिक फायदा सर्वच स्तरातील नागरिकांना व्हावा, तसेच या व्याख्यानात विद्यार्थी, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचाऱ्यांना करण्यात आलेल्या मार्गदर्शनातून वाहतूक नियमांची योग्यतेने अंमलबजावणी व्हावी हा मुख्य हेतू असल्याचे त्यांनी सांगितले. पुढे त्यांनी सांगितले की, या व्याख्यानातील वाहतूक नियमांबद्दलची माहिती आपापल्या घरी जाऊन पालकांना तसेच नातेवाईक आणि मित्रमंडळींना सांगावी. जेणेकरून कोणतेही वाहन चालवितांना वाहतुकीचे नियम पाळण्याबाबत प्रबोधन होईल. यावेळी ९०० विद्यार्थी उपस्थित होते.



### कर्जतमध्ये अभियंता दिन साजरा

**कर्जत :** कर्जत येथे रायगड जिल्हा परिषद व जिल्हा परिषद अभियंता संघटना शाखा रायगड यांच्या वतीने अभियंता दिन उत्साहात साजरा करण्यात आला. कर्जत येथील रॉयल कॅम्प कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. भारतरत्न सर मोक्षगुंडम विश्वेश्वरैया यांच्या जयंतीनिमित्त अभियंता दिन साजरा करण्यात आला. यावेळी सुजित मधुकर धनगर ग्रामीण पाणीपुरवठा विभाग, विनायक ताठरे बांधकाम विभाग, आमिन चिपळुकर बांधकाम विभाग, शनिश जुजगार (बांधकाम), सचिम करडे (ग्रापापु), सुदर्शन आगलावे (बांधकाम), राहुल शेळके (बांधकाम), पुजा शेळके ग्रामीण पाणीपुरवठा विभाग मनिषा शिद (बांधकाम), मयुर भाळवावे (ग्रापाष), प्रतिक्षा चवरकर (विद्युत) यांना आदर्श अभियंता पुरस्कार प्रदान करण्यात आले.



### आदिवासी बांधवांना ब्लॅंकेटचे वाटप

**चिरनेर :** डिस्ट्रिक्ट चेअरमन लायन ॲड. दत्तात्रेय नवाळे यांच्यातर्फे उरण तालुक्यातील विंधणे येथील आदिवासी बांधवांना १०० ब्लॅंकेटचे वाटप करण्यात आले. सामाजिक बांधिलकी जोपासत ॲड. दत्तात्रेय नवाळे यांनी सुरू होणाऱ्या थंडीच्या दिवसात गोरगरीब आदिवासींना दिलेली ही मायेची उब आहे. दरम्यान लायन्स क्लब ऑफ उरण गोल्डच्या वतीने सेवा सप्ताह आयोजित करण्यात आला होता. यावेळी हा उपक्रम राबविण्यात आला. याप्रसंगी लायन्स क्लब ऑफ उरण गोल्डच्या प्रेसिडेंट लायन निरज कार्डीयन तसेच एम.जे.एफ. लायन संदीप म्हात्रे, निखील भोईर, मच्छिंद्र घरत, श्रेयस घरत, राजेद्र ठाकुर, रेखा घरत आदी मान्यवर उपस्थित होते. गरिब आदिवासी बांधवांना ब्लॅंकेटच्या स्वरूपात मायेची उब मिळाल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

## विलास गवळी यांचे निधन

**रसायनी :** एचओसी कंपनीचे माजी कर्मचारी व श्री साई बाबा सत्संग केंद्र रसायनीचे संस्थापक सदस्य (विश्वस्त) विलास नामदेव गवळी



यांचे अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा व तीन मुली, जावई असा परिवार आहे. गवळी यांचे मोहोपाडा रसायनी येथील श्री साई मंदिरासाठी त्यांचं मोलांच योगदान आहे. त्यांनी खजिनदार, उपाध्यक्ष व विश्वस्त म्हणून कार्य केले आहे. मंदिर जडणघडणीत त्यांचा मोलाचा वाटा आहे. त्यांचे विचार नेहमी सकारात्मक होते. ते चांगले सल्लागार होते.

## सक्षम स्त्रियाच खऱ्या नवदुर्गा: प्रा. जोगळेकर

**। अलिबाग । प्रतिनिधी ।**

अलिबाग तालुक्यातील नवेदर बेली, जि.प. प्राथमिक शाळेत नवरात्र उत्सवानिमित्त एकल महिलांचा सन्मान सोहळा पार पडला. महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती, अलिबाग शाखेने शुक्रवार दि.२६ सप्टेंबर रोजी हा कार्यक्रम आयोजित केला होता.



या सोहळ्यासाठी शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष, संदेश राऊत, उपाध्यक्ष व पोलीस पाटील उपस्थित होत्या. मुख्याध्यापिका दीपा फाळके यांनी सर्व पाहुण्यांचे स्वागत केले. डॉ. संदीप वारगे यांनी प्रास्ताविक केले. आभाळाची आम्ही लेकरे काळी माती आई या कवी वसंत बापट यांच्या गीताने कार्यक्रमाची सुरुवात झाली.

अकाली वैधव्य प्राप्त झालेल्या पंधरा स्त्रियांचा नवेदर बेलीतील शिक्षणप्रेमी परशुराम पाटील यांनी परिचय करून दिला. त्यानंतर या महिलांचा पाहुण्यांच्या हस्ते भेटवस्तू, खाऊ, सन्मानपत्र देऊन सत्कार करण्यात आला.

यावेळी सचिन यांनी बुवाबाजी करणारे करणीचा नारळ दाखवून त्यांच्या भोळ्या भक्तांना कसे फसवतात, हे सप्रयोग स्पष्ट केले. शुभांगी जोगळेकर यांनी स्वयंपाकघरात स्त्रिया वापरत असलेल्या विज्ञानाची माहिती दिली. प्रमुख पाहुणे प्रा.शाम जोगळेकर यांनी विद्यार्थ्यांना आणि सर्वांना ज्ञानाची आराधना करण्याचे आवाहन केले. गावकऱ्यांनी शाळेतील वाचनालय समृद्ध करण्याचे त्यांनी सुचविले. तसेच, पतीच्या अकाली निधनानंतर, कष्टाने मुलांना घडवण्याचे कार्य यशस्वीपणे करणाऱ्या या सक्षम स्त्रीयाच खऱ्या नवदुर्गा आहेत, असे ते म्हणाले.

तसेच, जिल्हाध्यक्ष निर्मला फुलगावकर यांनीदेखील महिलांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला अंनिस कार्यकर्ते, शिक्षक आणि विद्यार्थी उपस्थित होते.

## बाळसई येथे रंगला पैठणीचा खेळ



**। सुकेळी । प्रतिनिधी ।**

नागोठणे जवळच असलेल्या बाळसई गावामध्ये नवरात्रोत्सव अतिशय आनंदमय वातावरणात साजरा करण्यात आला. दरवर्षीप्रमाणे श्री आई बेलजाई मित्र मंडळ बाळसई यांच्या वतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये खास महिलांसाठी होम मिनिस्टर, खेळ पैठणीचा या स्पर्धे चे आयोजन बुधवारी (दि.१) करण्यात आले होते. यामध्ये अनेक महिलांनी सहभागी होत उत्स्फूर्त प्रतिसाद दाखवला.

या स्पर्धेत वेगवेगळ्या प्रकारचे अनेक खेळ खेळण्यात आले. यामध्ये संगीत खुर्ची, फुगे फोडणे, चमचा गोटी, कपामध्ये चेंडू टाकणे असे विविध खेळ खेळण्यात आले. या संपुर्ण स्पर्धेत अंतिम पैठणीची विजेती ठरली धनश्री विनायक पाटेकर. तर उपविजेत्या पदावर मनाली एकनाथ कोकाटे यांना समाधान मानावे लागले. या दोन्ही विजेत्यांना उपस्थित महिलांच्या हस्ते पैठणी देऊन गौरविण्यात आले. यावेळी सर्वच महिलांमध्ये उत्साह दिसून येत होता. यावेळी श्री आई बेलजाई मित्र मंडळाचे सर्व पदाधिकारी, ग्रामस्थ व महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

## धनगर समाजाकडून शोभायात्रा



**। नेरळ । प्रतिनिधी ।**

माथेरान शहरात विजयादशमीचा सण मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. विजयादशमीनिमित्त हर हर चांगभल धनगर समाजाने मेळाव्याचे आयोजन केले. समाज बांधवांनी धनगरी नृत्य, गजानृत्य करून पर्यटकांचे लक्ष वेधले आणि या नृत्यांमुळे माथेरान शहरात आलेले पर्यटकदेखील सहभागी झाले.

माथेरानमध्ये धनगर समाजाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे विजयादशमीनिमित्त अनेक कार्यक्रमाचे आयोजन केले होते. त्यासाठी कर्जत तालुक्यातील सर्व भागातून मोठ्या प्रमाणावर धनगर समाज एकवटला. अध्यक्ष राकेश कोकळे, महिला अध्यक्षा संगीता ढेबे यांच्या माध्यमातून या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले. सर्वत्र सदानंदाचा जयघोष दुमदुमला. ढोलताशांच्या गजरात मिरवणुकीला सुरुवात झाली.

### ● पारंपरिक नृत्याने पर्यटकांचे लक्ष वेधले

कर्जत, नेरळ, खालापूर तसेच आजूबाजूच्या सर्व गावांतील धनगर माथेरानमध्ये दाखल झाले. पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर चौक येथून मिरवणुकीत सर्व सामील झाले. सदानंदाचा येळकोट, येळकोट येळकोट जय मल्हार या घोषणा देत मिरवणूक वाजतगाजत बाजारपेठेच्या दिशेने निघाली. सर्वत्र भंडारा उधळत नाचत मिरवणूक निघाली. यामुळे परिसराला जत्रेचे स्वरूप आले होते.

माथेरानमध्ये दरवर्षी या मेळाव्याचे आयोजन करण्यात येते. याप्रसंगी समाज बांधव कर्जत तसेच खालापूर तालुक्यातून येत असतात. पिसारनाथ मंदिरामध्ये विधिवत पूजाअर्चा होते. तिथे सुद्धा गजानृत्य सादर केले जाते. मिरवणूक काढली जाते. तरुणाईने पारंपरिक धनगरी नृत्य केले तर काही समाज बांधवांनी गजानृत्य करून पर्यटकांचे लक्ष वेधले.

## महात्मा गांधी जयंती उत्साहात

**सुतारवाडी :** रायगड जिल्हा परिषद शाळा, कुडली येथे गुरुवारी (दि.२) ऑक्टोबर रोजी राष्ट्रपिता महात्मा गांधी यांची जयंती मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात गांधीजींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. अहिंसा या गांधीजींच्या विचारांची महत्त्वपूर्ण माहिती विद्यार्थ्यांना देण्यात आली. या कार्यक्रमाला मोहन राठोड व विद्यार्थी उपस्थित होते. शेवटी स्वच्छ भारताचा संकल्प घेऊन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

## दसऱ्याला सोने लुटण्याची परंपरा

### शेलघर ग्रामस्थांच्या आनंदाला उधाण

**। चिरनेर । प्रतिनिधी ।**

पनवेल तालुक्यातील शेलघर गावात सोने लुटण्याची परंपरा सुमारे शंभर वर्षांची आहे. १९२५ म्हणजेच स्वातंत्र्यपूर्वकाळापासून शेलघरमध्ये उत्साहात दसरा सण साजरा करण्याची परंपरा नारायण देहू घरत यांनी सुरू केली. हीच दसरा सण साजरा करण्याची परंपरा आजही तितक्याच उत्साहाने पाचव्या पिढीदेखील सांभाळली आहे. एकेकाळी शेलघरच्या जंगलातील शमीच्या (आपटा) वृक्षाखाली गावातील सर्व मंडळी एकत्र जमून सोने लुटत असत. आपल्यातील वैरभाव विसरून गुण्यागोविंदाने एक दुसऱ्याला शमीची (आपटा) पाने देऊन दसरा साजरा करत असत.



त्यानंतर दसऱ्याची हीच परंपरा दिवंगत जनार्दन आत्माराम भगत, विठ्ठल गणपत भगत, तुकाराम नारायण घरत, काशिनाथ त्रिंबक भगत, जगन्नाथ वामन भगत, सुदाम कान्हा भगत यांच्या पुढाकाराने गावातील ग्रामस्थ एकत्र येत हा दसरा साजरा करीत असत. गुरुवारी दसऱ्याला सर्व ग्रामस्थांनी एकत्र येऊन शमीच्या झाडाची पूजा केली आणि एकमेकांना शमीची पाने देऊन उत्साहाने दसरा साजरा केला. यावेळी ग्रामस्थांच्या आनंदाला उधाण आले होते.

## श्री धावीर महाराजांचा पालखी सोहळा

### रायगड पोलिसांकडून सशस्त्र मानवंदना

**। रोहा । प्रतिनिधी ।**

जिल्ह्याचे श्रध्दास्थान आणि रोहाचे ग्रामदैवत श्री धावीर महाराजांच्या पालखी सोहळ्यास शुक्रवारी पहाटे मोठ्या उत्साहात सुरूवात झाली. यावेळी रायगड पोलिसांच्यावतीने रोहा पोलीस निरीक्षक मारुती पाटील व पथकाने श्री धाविर महाराजांना सशस्त्र मानवंदना दिली. यावेळी मंत्री, खासदार, राजकिय पक्षांचे प्रमुख आणि शासनाचे अधिकारी आदी मान्यवर उपस्थित होते. हा सलामी सोहळा पाहण्यासाठी पहाटेपासून भाविकांनी



मंदिर परिसरात गर्दी केली होती.

या उत्सवानिमित्त मंदिराचा संपूर्ण परिसर विविध रंगी फुलांच्या सजावटीने सजविण्यात आला होता. पाण्याचे उंच कारंजे आणि सुंदर रांगोळ्यांनी वातावरण प्रसन्न झाले होते. भल्या पहाटे मंगलमय वातावरणात गोंधळ्यांच्या वाद्याने ग्रामदैवताची महाआरती झाली. पोलिसांनी मानवंदना दिल्यानंतर महाराजांची पालखी पारंपारिक वाद्यांच्या गजरात मार्गस्त झाली. शहरातील ठरलेल्या मार्गावर विविध ठिकाणी ग्रामस्तांना दर्शन देत पालखी दुसऱ्या दिवशी (शनिवारी) सकाळी मंदीरात परतणार आहे. यावेळी पुन्हा महाराजांना पोलीस मानवंदना देण्यात येईल. पालखीच्या स्वागतासाठी शहरात ठीकठीकाणी फुलांनी आणि रांगोळयांनी बहरलेले रस्ते या सोहळयाला एक वेगळे रूप प्राप्त करून देते.

**स्मारक परिसरात उपस्थितांच्या हस्ते वृक्षारोपण** | **विविध क्षेत्रातील ४८ गुणवंतांचा सत्कार**

# तळा येथे धम्मचक्र प्रवर्तन दिन साजरा

**। तळा । प्रतिनिधी ।**

भारतीय बौद्ध महासभा तालुका तळा आणि तळा तालुका बौद्धजन सेवा संस्था रायगड यांच्या संयुक्त विद्यमाने डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक, तळा येथे ६९ वा धम्मचक्र प्रवर्तन दिन मोठ्या उत्साहात साजरा झाला.

धम्मचक्रप्रवर्तनदिनाचे औचित्य साधत तळा तालुका बहुजन सेवा संस्था या संस्थेच्या वतीने प्रथमतः स्मारक परिसरात उपस्थितांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. त्यानंतर मान्यवरांच्या हस्ते तथागत भगवान गौतम बुद्ध आणि महामानव, बोधिसत्व डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमांचे पुष्प पूजन, दीप पूजन आणि सुगंधी पूजन करण्यात आले. तदनंतर तथागत भगवान



गौतम बुद्ध आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना समता सैनिक दल आणि उपस्थित भीमानुयायी यांच्या वतीने मानवंदना देण्यात आली.

यावेळेस उपरोक्त दोन्ही संस्थेच्या वतीने उपस्थित प्रमुख पाहुणे, भारतीय बौद्ध महासभेचे विद्यमान महिला व पुरुष जिल्हा पदाधिकारी तसेच उपस्थित मान्यवर सर्व गाव प्रमुख महिला व पुरुष यांचा पुष्पगुच्छ देऊन यथोचित सन्मान करण्यात आला.

तळा तालुका बौद्धजन सेवा संस्था (रजि.) रायगड यांच्या वतीने सेवानिवृत्त कर्मचारी व भारतीय बौद्ध महासभेचे माजी कार्यालयीन सचिव केशव लोखंडे (कुडे) यांनी आपल्या मांदाड हायस्कूल येथील प्रदीर्घ सेवेनंतर सेवानिवृत्त झाले, तसेच आयु. महेंद्र गायकवाड (बामणघर) हे देखील सेवानिवृत्त झाल्याने त्यांच्या कुटुंबीयांसह शाल, भेटवस्तू आणि पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सत्कार करण्यात आला.

यानंतर तळा तालुक्यातील दहावी, बारावी पदवीधर तसेच विविध क्षेत्रांमध्ये उल्लेखनीय यश संपादन करणाऱ्या एकूण ४८ गुणवंतांचा सत्कार तळा तालुका बहुजन सेवा संस्थेच्या वतीने करण्यात आला करण्यात आला. यामध्ये तळा येथील कुमारी जान्हवी रमेश साळवे हिने मार्च २०२५ मध्ये घेण्यात आलेल्या दहावीच्या परीक्षेमध्ये ९२.४०% गुण मिळवून तळा तालुक्यामध्ये प्रथम क्रमांक पटकावला. तसेच शेणवली येथील कुमार रोहन मिनाक्षी गायकवाड हा विद्यार्थी देखील गरीब कुटुंबातील असून त्याची आर्थिक परिस्थिती ही हालाखीची असल्यामुळे या दोन्ही विद्यार्थ्यांना तळा तालुका बौद्धजन सेवा संस्थेने पुढील शिक्षणाकरिता दत्तक घेऊन त्यांचा दोन वर्षासाठीचा शैक्षणिक खर्चाचा भार उचलला आहे.

### चार विशेष उपक्रम

या वर्षामध्ये तळा तालुका बौद्धजन सेवा संस्था (रजि) रायगड संस्थेने वृक्षारोपण, खांबवली आदिवासी वाडी येथील गरीब व गरजू विद्यार्थ्यांना शालेय वस्तूंचे वाटप, तळा तालुक्यातील दोन विद्यार्थी दत्तक घेणे आणि सेवानिवृत्त कर्मचाऱ्यांच्या सत्कार समारंभ असे चार उपक्रम हाती घेतले आहेत. याबद्दल सामाजिक स्तरातून सेवा संस्थेचे कौतुक होत आहे.

# कर्जत पोलिसांकडून ४१ मोबाईल हस्तगत

| कर्जत | प्रतिनिधी |

कर्जत पोलीस ठाणे हद्दीत नागरिकांचे मोबाईल गहाळ होणे, तसेच ओटीडीआर मशिन चोरी झाल्याच्या तक्रारींवरून कारवाई करत कर्जत पोलिसांनी संबंधित आरोपीला अटक केली आहे. त्याच्याकडुन सुमारे ४१ मोबाईल हस्तगत करण्यात आले असून १० लाख ९८ हजाराचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव चंद्रकांत माधव अनकाडे (नांदेड) असे असून, २१ ऑगस्ट रोजी त्याला अटक करण्यात आली होती. या गुन्ह्यातील मोबाईल महाराष्ट्रसह उत्तर प्रदेश, झारखंड आणि तामिळनाडे या ठिकाणाहून हस्तगत करण्यात आले आहेत. या कारवाईत पोलीस अधीक्षक आँचल दलाल, अप्पर पोलीस अधीक्षक अभिजीत शिवथरे तसेच उप विभागीय पोलीस अधिकारी राहूल गायकवाड यांचे मार्गदर्शन लाभले. कारवाई पथकात कर्जतचे पोलीस निरीक्षक संदिप भोसले, पोलीस उपनिरीक्षक सुशांत वरक, पोलीस हवालदार स्वप्नील येरुणकर, समीर भोईर, पोलीस नाईक प्रविण भालेराव, केशव नागरगोजे, पोलीस कॉन्स्टेबल विठ्ठल घावस यांचा समावेश होता.

या यशस्वी कारवाईमुळे कर्जत परिसरातील नागरिकांना मोठा दिलासा मिळाला असून पोलिसांच्या सतर्कतेचे कौतुक होत आहे.


## ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने- तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने- मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड- कुंदन- पोलकी- सेट- मॅचिंग बांगड्या- कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**



## क्लासिफाईड
*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- 1BHK समुद्र पासून पाच मिनिटांवर फुल्ल फर्निचर विकणे आहे. संपर्क : ८८०५५४०४६४

**जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१**


### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे कळविणेत येते की, आमचे पक्षकार यांनी मौजे मांडवणे, ता. कर्जत, जि. रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे मालक जीवन फार्म प्रा.लि.तर्फे नंदकिशोर लक्ष्मीनारायण कागलीवाल यांचेकडून सदर मिळकत विकत घेणेचे ठरविले आहे.

| सर्व्हे नंबर/हिस्सा नंबर | क्षेत्रफळ हे.आर.पॉ | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ६५/३/ब | ०-३२-०० | ०-३० |

सबब सदर व्यवहाराबाबत कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत सदरची नोटीस प्रसिद्ध झाले पासून १० दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे प्रथमदर्शनी लेखी पुराव्यासह हरकत दाखल करावी. वरीलप्रमाणे मुदतीत कोणतीही हरकत दाखल न झाल्यास सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहीत आहेत असे समजून वरील मिळकतीचा व्यवहार पूर्ण केला जाईल. मागाहून येणाऱ्या तक्रारीस आमचे पक्षकार जबाबदार राहणार नाहीत याची नोंद घ्यावी.

दिनांक : ०३/१०/२०२५

ॲड. समीर आर. सावंत
बी.कॉम.एल.एल.बी.
पत्ता - गाळा नं.०९, कोर्ट व्ह्यू बिल्डींग, तळ मजला, दिवाणी व फौजदारी न्यायालयासमोर, कर्जत, ता. कर्जत, जि. रायगड
मो.नं ९१५८३१३७३३

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे कार्ले, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री. भास्कर कृष्णा भगत वगैरे ६ रा. कार्ले, पो. खंडाळे, ता. अलिबाग-रायगड, असलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र.व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| कार्ले ता.अलिबाग | ३१२ | ०.७६.७० पो.ख.०.०८.५० एकूण ०.८५.२० | २०.८८ |
| वर नमुद मिळकतीपैकी क्षेत्र ०.४२.०० हे. आर. ही मिळकत | | | |

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०४/१०/२०२५

सही /-
श्री. शेखर विष्णू मगर
पत्ता: दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड.
मो.नं.९८२३१९९४६५

## महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ मर्यादित

**विशेष नियोजन प्राधिकरण**

वांद्रे रेक्लमेशन डेपोसमोर, लीलावती हॉस्पिटल जवळ, के.सी.मार्ग, वांद्रे (प.), मुंबई- ४०० ०५०.
Tel. No.: ०२२-२६४००१९०/२०१, २६५५८१७५/७६, Fax No. : ०२२-२६४१७८९३
Website: http://www.msrdc.in
म.रा.र.वि.म.

### सूचना

क्रमांक. मरारविम/ वि.नि.प्रा./खालापूर व कर्जत तालुक्यातील ३१ गाव/ विकास योजना/२०२५/३०९८

रायगड जिल्ह्यातील खालापूर व कर्जत तालुक्यातील ३१ गावांच्या अधिसूचित क्षेत्राच्या प्रारुप विकास योजनेमधील फेरबदल / बदलांचे महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ चे कलम २८ (४) अन्वये प्रसिध्दीकरण

ज्याअर्थी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ (यापुढे "उक्त अधिनियम" असे निर्देशिलेले) च्या कलम ४० चे पोट-कलम (१ब) मधील तरतुदीनुसार शासनास प्राप्त असलेल्या व इतर सर्व शक्तीस अनुसरून शासनाने अधिसूचना क्रमांक टीपीएस-१७१७/२७५०/प्र.क्र ९१/१९/मरारविम/नवि-१२, दिनांक १९/०९/२०१९ आणि दिनांक १६/०३/२०२३ रोजीच्या पूरक पत्राद्वारे रायगड जिल्ह्यातील खालापूर व कर्जत तालुक्यातील ३१ गावांच्या अधिसूचित क्षेत्रासाठी (यापुढे "उक्त अधिसूचित क्षेत्र" असे उल्लेखलेले) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाची (महाराष्ट्र शासनाच्या अखत्यारितील कंपनी) (येथून पुढे महामंडळ असे निर्देशित करण्यात येईल) "विशेष नियोजन प्राधिकरण" (येथून पुढे वि.नि.प्रा. असे निर्देशित करण्यात येईल.) म्हणून नेमणूक केली आहे;

आणि ज्याअर्थी महामंडळाने ठराव क्र. २०, दिनांक ०९/११/२०२० अन्वये उक्त अधिसूचित क्षेत्रासाठी प्रारुप विकास योजना तयार करण्याचा इरादा जाहिर करुन उक्त अधिनियमाच्या कलम २१ चे उपकलम (२) व कलम २३ च्या उपकलम (१) अन्वये त्याबाबतची सूचना महाराष्ट्र शासन राजपत्र, भाग-२, दिनांक ११/११/२०२१ ते १७/११/२०२१ अन्वये प्रारुप विकास योजना तयार करण्याचा इरादा प्रसिद्ध केलेला आहे;

आणि ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २४ च्या तरतूदीस अनुसरुन उक्त क्षेत्रासाठी उक्त प्रारूप विकास योजना तयार करण्यासाठी मा. सहसंचालक, नगर रचना, कोकण विभाग यांनी आदेश क्र. ४७९, दि. ३०/०३/२०२२ पत्रान्वये उप-मुख्य नियोजनकार, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांची "नगररचना अधिकारी" म्हणून नेमणूक केली आहे.

आणि ज्याअर्थी उक्त अधिनियमातील कलम २५ अन्वये महामंडळाने अधिसूचित क्षेत्रामध्ये समाविष्ट असलेल्या जमिनींचे सर्व्हेक्षण करुन नगर रचना अधिकाऱ्यांमार्फत उक्त अधिसूचित क्षेत्रासाठीचा विद्यमान भूवापर दर्शविणारा नकाशा तयार केला असून सदर विद्यमान भूवापर नकाशा उक्त कलम २५ अन्वये दि. ०६/०५/२०२२ रोजी विशेष नियोजन प्राधिकरणास सादर केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, विशेष नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिसूचित क्षेत्रासाठी प्रारुप विकास योजना व अहवाल तयार केलेला आहे.

आणि ज्याअर्थी, महामंडळाच्या संचालक मंडळासमोर उक्त अधिसूचित क्षेत्रासाठी विशेष नियोजन प्राधिकरणाने तयार केलेली प्रारुप विकास योजना व संबंधित अहवाल दि. ०६/०८/२०२४ रोजीच्या संचालक मंडळाच्या बैठकीमध्ये मांडण्यात आला व संचालक मंडळाने तयार केलेल्या उक्त प्रारूप विकास योजना अहवाल प्रस्तावास संचालक मंडळाने ठराव क्र.३२ अन्वये मंजूरी दिली आहे. तसेच, संचालक मंडळाने, विशेष नियोजन प्राधिकरणाच्या उक्त प्रारुप विकास योजना आणि अहवाल उक्त अधिनियमाच्या कलम २६(१) अन्वये, नागरीकांकडून सूचना व हरकती मागविण्यासाठी प्रसिद्धीकरणासाठी देखील मान्यता दिली. त्यानूसार कलम २६(१) अन्वये प्रसिद्धीकरणाची सूचना ही महाराष्ट्र शासनाच्या राजपत्र दिनांक २२/०८/२०२४ रोजी व स्थानिक वृत्तपत्रांत नागरिकांकडून सूचना व हरकती मागविण्यासाठी प्रसिद्ध करण्यात आली.

आणि ज्याअर्थी प्रारुप विकास आराखड्यावर नागरिकांकडून प्राप्त झालेल्या सूचना व हरकतींवर सुनावणी देण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम २८ (२) अन्वये दिनांक १४/०१/२०२५ रोजी नियोजन समितीने नागरिकांकडून प्राप्त सुचना व हरकतींचा विचार करुन नियोजन समितीने त्यांचा अहवाल उक्त अधिनियमाच्या कलम २८ (३) नुसार सादर केला आहे.

आणि ज्याअर्थी, नियोजन समितीने सादर केलेल्या अहवालावर, विचारांती उक्त नियोजन प्राधिकरणाने त्यावर नव्याने बदल व फेरबदल सूचवून, उक्त योजनेत फेरबदल / बदल करण्यासाठी व सदर प्रारुप विकास योजना उक्त अधिनियमाच्या कलम ३० नुसार शासनास मंजूरीसाठी सादर करण्यासाठी मा.अध्यक्ष, संचालक मंडळ यांनी दि. २३/०९/२०२५/DCMO-४४ अन्वये मान्यता दिली आहे.

आणि, ज्याअर्थी, उक्त अधिनियमाच्या कलम २८(४) खालील तरतूदींनुसार, उक्त योजनेच्या मसूद्यात केलेले फेरबदल / बदल नागरीकांच्या अवलोकनार्थ प्रसिद्ध करणे आवश्यक आहे.

त्याअर्थी, उक्त प्रारूप विकास योजनेच्या मसूद्यात, विशेष नियोजन प्राधिकरणाने उक्त अधिनियमाचे कलम २८(४) अन्वये प्रसिध्द करण्यात आले आहे. सदर प्रसिध्द केलेल्या सुधारणा / बदल दर्शविणारा उक्त प्रारूप विकास योजनेचा नकाशा व अहवाल नमूद केलेल्या कार्यालयात कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत ३० दिवसांच्या कालावधीकरीता नागरिकांच्या अवलोकनार्थ ठेवण्यात आला असून ती msrdc.in या संकेत स्थळावर सुध्दा उपलब्ध आहे.

(१) संचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.), विशेष नियोजन प्राधिकरण, ए११०१-११०९, शेल्टन सॅफायर, प्लॉट नंबर १८ व १९ सेशन कोर्ट जवळ, सेक्टर १५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, ४००६१४. दूरध्वनी क्र.०२२-४५०००२०७.

(२) सहसंचालक, नगररचना, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.), विशेष नियोजन प्राधिकरण, ए४०८-४०९, शेल्टन सॅफायर, प्लॉट नंबर १८ व १९ सेशन कोर्ट जवळ, सेक्टर १५, सीबीडी बेलापूर, नवी मुंबई, ४००६१४. दूरध्वनी क्र.०२२-४५०००२०७.

(३) महामंडळाचे संकेत स्थळ msrdc.in

मुंबई
दिनांक : ०१.१०.२०२५

(अनिलकुमार ब. गायकवाड)
उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक,
म.रा.र.वि.महामंडळ (मर्या.),मुंबई

### वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दाव्यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि. चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

\- मुख्य संपादक

### E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-11/25-26/ Rfx No.7000037812 | Supply of various consumable items at various s/s under 400 kV R.S. (O&M) Division Nagothane….4th call | Rs. 2,22,918/- | 13.10.2025 up to 23:59 hrs |

**EMD Rs. 5000/-, Tender fee Rs. 500/- + GST** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635 **Email ID:** ee7230@mahatransco.in **Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.**

### E-TENDER NOTICE

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

MSETCL invites online bids (e-Tender) from reputed and registered contractors on Mahatransco e-Tendering Website **https://srmetender.mahatransco.in/** for the following Tender specification.

| Sr. No. | Tender No. EE/ 400kV R.S. (O&M) Dn/NGTN/Tech/ | Description | Estimated cost in lakhs | Submission Date |
|---|---|---|---|---|
| 1 | e-Tender-16/25-26/ Rfx No.7000037756 | Scheme for SITC of 1 No. of 22kV Bay for MSEDCL at 400 kV Nagothane s/s under 400 kV RS O&M Division Nagothane | Rs. 20,22,308.83/- | 17.10.2025 up to 23:59 hrs |

**EMD 1 % of estimate Cost i.e. 20,223.08/-, Tender fee Rs. 500/- + GST.** For further details visit our website **https://srmetender.mahatransco.in/ Contact Person:** Mitesh Goyal (Dy. EE) Mob No. 9461456635 **Email ID:** ee7230@mahatransco.in **Note:** All eligible supplier/Contractors are mandated to get enrolled on SRM E Tenders (New) portal of MSETCL.

**Sd/-**
**EXECUTIVE ENGINEER, 400kV R.S. (O&M) Dn. Nagothane.**

### जाहिर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे रुळे, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या भातशेती मिळकतीचे विद्यमान मालक श्री.बालाजी दत्तात्रय गुळवे वगैरे ४ रा.रुळे, पो. खंडाळे, ता.अलिबाग-रायगड, असलेली भातशेती मिळकत माझे स्नेही यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशी बोलणी विद्यमान मालकांबरोबर झालेली आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग क्र. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| रुळे ता.अलिबाग | २१/६ | ०.१२.०० पो.ख.०.००.०० एकूण ०.१२.०० | १.७५ |
| रुळे ता.अलिबाग | २१/५/अ | ०.०४.१० पो.ख.०.००.०० एकूण ०.०४.१० | ०.०६ |

सदर मिळकत निर्वेध असल्याबाबतचा निर्वाळा विद्यमान मालकांनी दिलेला आहे. सबब सदरहू मिळकतीवर अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, कुळ वहिवाट, ताबा कब्जा, इजमेंट, साठेकरार, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खाली पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरुन माझे स्नेही वरीत मिळकतीच्या संदर्भातील नियोजित व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझे स्नेही यांचेवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०४/१०/२०२५

सही/-
श्री.शेखर विष्णू मगर
पत्ता: दुय्यम निबंधक कार्यालयासमोर, अलिबाग, ता.अलिबाग, जि.रायगड.
मो.नं. ९८२३१९९४६५

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुरेश सदाशिव धरती व १, रा. दहिगाव, ता. सुधागड, जि. रायगड यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-दहिगांव, ता. सुधागड, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पैसे) |
|---|---|---|
| ८२/१ | ०-६२-७० | ६.१६ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहीवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ०४/१०/२०२५

सही /-
ॲड. समिर अनंत आंबोलकर
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली, ता.सुधागड, जि.रायगड
मो. नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यांत येते की :-

मौजे चिंचवली शेकीन, ता. खालापुर, जि. रायगड येथील खोपोली नगर परिषदेचे हद्दीतील खालील प्रमाणे हक्कनोंदीस वर्णन असलेल्या बिनशेती भूखंडांच्या मिळकती संबंधीत भूखंड मालकांकडुन आमचे अशिल खरेदी घेणेचे विचारात आहेत:-

| भूखंड मालकांचे नाव | नगर भूमापन क्रमांक | सर्व्हे नंबर /हिस्सा नंबर | भूखंड क्रमांक | क्षेत्रफळ चौ.मिटर | आकार रूपये पैसे |
|---|---|---|---|---|---|
| निरूपमा एच. व्होरा | १७७५ | ५७/३ब पैकी | २ | ५९४.८० | २३.८० |
| प्रेरणा के. व्होरा | १७७५ | ५७/३ब पैकी | ५ | ४८३.२७ | १९.३३ |

सबब सदर मिळकतींवर अगर त्यांच्या कोणत्याही भाग, अंश अगर हिश्यावर कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, पोटगी, चार्ज, संपादन, भाडेपट्टा, वहिवाट, साठेकरार, लिज, तबदील, ट्रस्ट, वारसा या प्रकारचा अगर अन्य कोणत्याही व कसल्याही प्रकारचा हक्कहितसंबंध असल्यास संबंधितानी आपापल्या हरकती अगर तक्रारी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासुन चौदा (१४) दिवसांचे मुदतीत खाली सही करणार ॲडव्होकेट यांचेकडे सकृतदर्शनी लेखी पुराव्यासहीत रजिस्टर पोस्टाने पाठवाव्यात. या प्रमाणे कोणाचीही कसलीही हरकत अगर तक्रार आली नाही तर सदर मिळकती निर्वेध, बोजा रहीत व हस्तांतरीत करून घेणेस योग्य आहेत असे समजुन आमचे अशिल सदरचा व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणाऱ्या तक्रारी अगर हरकती आमच्या अशिलांवर कोणत्याही व कसल्याही प्रकारे बंधनकारक राहणार नाहीत व संबंधितानी आपापल्या तथाकथित हरकती, तक्रारी कायमच्या सोडुन दिल्या आहेत असे समजणेत येईल.

खोपोली
४/१०/२०२५

(श्रीकांत परशुराम पाटणकर)
ॲडव्होकेट
रा. गंगाधर स्मृती, दत्त मंदिरा जवळ, पो.खोपोली, तालुका खालापुर, जि.रायगड

### जाहीर नोटीस

सर्व संबंधितांना याद्वारे कळविण्यात येते की, माझे अशिल यांनी मौजे चौल, ता. अलिबाग येथील खालील नमूद मिळकत, सदर मिळकतींचे मालक प्रविण जनार्दन गोंधळी, रा. चौल, ता. अलिबाग, जि. रायगड यांजकडून कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरविले आहे.

संदर्भित जमीन मिळकती पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिद्ध झाल्या दिनांकापासून ७ दिवसांचे अवधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी देऊन माझी खात्री पटवून द्यावी. विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल त्यांचा संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे चौल, ता. अलिबाग, जि. रायगड येथील भूमापन क्रमांक १४६२/३, एकूण क्षेत्र ०-०८-४ हे. आर. आकार ४-०४ रु. ही मिळकत व त्यातील मालमत्ता घर क्र.३२२६ हे घर

अलिबाग,
दिनांक ३.१०.२०२५

सही/-
(ॲड.श्री.प्रसाद विजय वर्तक)
जिल्हा न्यायालय
अलिबाग-रायगड

### जाहीर नोटीस

दिनांक ०३/१०/२०२५

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी मौजे झाप ता.सुधागड जि.रायगड येथील खालील वर्णनाची मिळकत कायम खरेदीखताने विकत घेण्याचे ठरविले आहे. सदर मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे :-

**मिळकतीचे वर्णन :**
**मौजे-झाप ता. सुधागड जि. रायगड**

| कब्जेदाराचे नांव | गट नं./स.नं. | क्षेत्र हे.आर | आकार रू.पैसे |
|---|---|---|---|
| श्री.रोनक रमेश परमार | १८२ | ०-४०-७० | ९-०३ |

सदर वरील वर्णन केलेली एकूण सर्व मिळकत आमचे अशिलांनी सदर मिळकतीचे कब्जेदार यांचेकडून कायम खरेदीने विकत घेण्याचे ठरविले आहे. तरी सदर होणारे खरेदी विक्री व्यवहारास कोणाचीही हरकत अथवा दावा असल्यास वा सदरहु मिळकतींचे खरेदी विक्री बाबत तसेच हक्क हितसंबंध, मालकी वहिवाट, पोटगी बक्षिसपत्र, मृत्यूपत्र, साठेकरार अथवा कोणाचेही काही हक्क हितसंबंध वहिवाट अथवा सदर मिळकतीचे ताबे कब्जा वहिवाट असल्यास सदर नोटीस प्रसिद्ध झालेपासून संबंधीत तक्रारदार याने आपली हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यासहीत ७ दिवसांचे कालावधीत खालील पत्त्यावर नोंदवावे. सदर कालावधीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजारहित आहे असे समजून आमचे अशिल सदरचा खरेदी विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेली हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची नोंद घ्यावी.

ठिकाण :- पाली - सुधागड
दिनांक ०३/१०/२०२५

सही /-
श्री. प्रभाकर कृष्णकांत भोईर
ॲडव्होकेट
मु.पो.नविन पनवेल ता.पनवेल जि.रायगड
मो.बा.नं. ८१४९६५१५०८

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सागर विजय गोळे, रा.दिडबाव, पो. कुर्डुस, अलिबाग यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरु आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-दहिगांव, ता.सुधागड, जि.रायगड**

| सर्व्हे नं | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु. पैसे ) |
|---|---|---|
| ८१/२ब | ०-६८-५० | १०.१७ |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहिवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ०४/१०/२०२५

सही /-
ॲड. समिर अनंत आंबोलकर
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो. नं. ९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, आमचे अशील खालील वर्णनाची मिळकत मिळकतीचे विद्यमान मालक सावित्री भागुराम वाघे उर्फ वंदना मारूती मुठल रा. सांताक्रुज, मुंबई यांचे कडून कायम खरेदी करणार असून, तशी बोलणी आमचे अशिल व मिळकत मालक यांचेमध्ये सुरू आहे.

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे-दहिगांव, ता. सुधागड, जि. रायगड**

| सर्व्हे नं. | क्षेत्र (हे. आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|
| ८०/१ | २-९७-०० | ०.५० |

वरील मिळकत पूर्णपणे निर्वेध असल्याची खात्री मिळकतीचे मालक याने आमचे अशिलास दिली असून, मिळकत मालक आमचे अशिलाचे लाभांत खरेदीखत करून देणार आहे. तरी वरील मिळकतीमध्ये अन्य कुणाचाही भाडेकरार, साठेकरार, फरोक्त, वारसा, गहाण, दान, बक्षीस, वहिवाट, पोटगी, मृत्यूपत्रान्वये अथवा अन्य हक्क असल्यास अशा व्यक्तींनी त्यांच्या लेखी हरकती प्रथमदर्शनी पुराव्यासह खाली सही करणार यांचेकडे ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत कळवाव्यात. सदर मुदतीमध्ये कोणाचीही हरकत प्राप्त न झाल्यास मिळकत निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल व्यवहार पूर्ण करतील व मागाहून आलेल्या हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पाली
दिनांक : ०४/१०/२०२५

सही /-
ॲड. समिर अनंत आंबोलकर
वरद कृपा निवास, बल्लाळेश्वर नगर पाली, ता. सुधागड, जि. रायगड
मो.नं.९२०९२९६७२५/९४०३३०५२५०

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिल खाली वर्णन केलेली शेतजमिन मिळकत विकत घेण्याकरिता इच्छुक असून तशी बोलणी सदर मिळकतीच्या विद्यमान मालक यांचेसोबत सुरु आहे. सदरील मिळकतीचे तपशिलवार वर्णन पुढीलप्रमाणे

**मिळकतीचे वर्णन**
**मौजे धोत्रे, ता.कर्जत, जि.रायगड**

| भुमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर.पॉ | आकारणी रु.पै. |
|---|---|---|
| ६१/१ | एकूण क्षेत्र ०-१८-०० हे.आर. | ०.१२ |
| ६१/२ | एकूण क्षेत्र २-००-०० हे.आर. १) यापैकी मालती गजानन रसाळ याचे मालकीचे खाते क्र.२५० ज्याचे क्षेत्र ०-६०-०० हे.आर २) यापैकी वंदना भास्कर रसाळ याचे मालकीचे खाते क्र.३२९ ज्याचे क्षेत्र ०-३४-०० हे.आर ३)यापैकी अमोल महादेव सूर्यवंशी याचे मालकीचे खाते क्र. ३९७ ज्याचे क्षेत्र ०-४०-०० हे.आर | १.३८ |

तरी सदर नमुद मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास, किंवा त्यांची आमचे अशिलांच्या वर नमुद व्यवहारास हरकत असल्यास, त्यांनी तसे आम्हास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून ७ (सात) दिवसांत लेखी पुराव्यासह कळवावे. वरील मुदतीत कोणीही लेखी हरकत न घेतल्यास, वरील मिळकतीशी कोणत्याही इसमाचा अगर संस्थेचा कसल्याही प्रकारचा हक्क हितसंबंध नाही, किंवा असल्यास ते हक्क हितसंबंध त्यांनी आमचे अशिलांच्या लाभात सोडून दिलेले असून, त्यांची आमचे अशिलांच्या वर नमूद व्यवहारास कोणतीही हरकत नाही असे समजण्यात येऊन आमचे अशिल सदरचा व्यवहार पूर्ण करतील. मुदतीनंतर येणारी कोणतीही हरकत विचारात घेतली जाणार नाही.

दिनांक :- ०४/१०/२०२५
ठिकाण :- पनवेल

सही
ॲड. रोहित रो. मानकवळे
मो.नं. ९०२८८१७९३०
पत्ता:- शॉप नं.२३, प्लॉट नं.५१, कल्पतरु कॉम्प्लेक्स, सेक्टर ०९ खांदा कॉलनी, पनवेल, ता.पनवेल, जि.रायगड ४१०२०६

### जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीद्वारे कळविण्यात येते की, आमचे अशिलांनी खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालकांकडून कायम खरेदी करण्याचे ठरविले असून तशी बोलणी आमचे अशिल व विद्यमान जमीन मालकांचे दरम्यान झालेली आहेत व सदरची मिळकत ही निर्वेध व बोजाविरहीत असल्याचा भरवसा आमचे अशिलांस विद्यमान मालकांनी दिला आहे. सदर मिळकतीचे मालकी हक्कांबाबतचा शोध घेण्याकरिता व त्या मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणे कामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आमचेकडे दिलेले आहे. त्या मिळकतीचे वर्णन खालीलप्रमाणे -

| मौजे | स.नं. | मिळकत मालकाचे नाव | क्षेत्रफळ हे.आर. | आकार रू.पै. |
|---|---|---|---|---|
| खंदार, ता.रोहा | ८२ | विश्वास वसंत ठाकुर, प्रभाकर विठ्ठल म्हात्रे | ०-४०-६० पो.ख.०-०१-६० | ३.८१ |
| | | गणेश रामचंद्र पेढवी | ०-४१-५० | ३.९० |
| | | | एकुण क्षेत्र ०-८३-७० | ७.७१ |

तरी वरील मिळकतीचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, लिज, फरोक्त, पोटगी साठेकरार, वहिवाटीचे जाणेयेणेचे मार्ग आदी कोणत्याही प्रकारे हक्क, हितसंबंध असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी ही नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांच्या मुदतीत खालील सही करणारे यांचेकडे कळवावे. येणेप्रमाणे विहीत मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनाजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरच्या मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे. सदर नोटीस प्रसिद्ध करण्यास तसेच सदर व्यवहारास विश्वास वसंत ठाकुर, प्रभाकर विठ्ठल म्हात्रे, गणेश रामचंद्र पेढवी यांची कोणत्याही प्रकारची हरकत नाही.

अलिबाग
दिनांक : ०३/१०/२०२५

सही /-
ॲड. पुजा पंकज पाटील
पत्ता. कुरुळ, अलिबाग- रायगड
मो. ७७६७९१६०४३




## राशीभविष्य

- **मेष** : अनावश्यक मानसिक ताण राहील. महत्त्वाचे निर्णय प्रलंबित राहतील. विद्यार्थ्यांना अडचणी येतील.
- **वृषभ** : अनुभवींचा सल्ला कामी येईल. घरगुती व्यवसायात अनुकूलता राहील. आर्थिक समस्या उदभवतील.
- **मिथुन** : रखडलेली कामं मार्गी लागतील. इतरांचा उपदेश घ्यानी घ्यावा. सरकारी कामं विलंबानं होतील.
- **कर्क** : आर्थिक बाबतीत समाधान लाभेल. जुनी येणी सहज वसूल होतील. कलाकारांचा उत्साह वाढेल.
- **सिंह** : मनाप्रमाणे सारं घडत जाईल. प्रियजनांच्या भेटीने समाधान लाभेल. वरिष्ठांची मर्जी राखायला हवी.
- **कन्या** : कार्याचा योग्य मोबदला मिळेल. उत्साहवर्धक घटना घडतील. कामानिमित्त प्रवास सफल होईल.
- **तूळ** : मनाविरूध्द घटना संभवतात. आर्थिक व्यवहारात लाभ होईल. शिक्षण क्षेत्रात अनुकूलता राहील.
- **वृश्चिक** : दूरच्या प्रवासाचे बेत ठरतील. आध्यात्मिक प्रगती होईल. स्थावर प्रश्नात तडजोड सोयीची ठरेल.
- **धनु** : सरकारी कामांबाबत समाधान लाभेल. विचारांना कृतीची जोड मिळेल. नातलगांचं सहकार्य लाभेल.
- **मकर** : प्रक्रिया उद्योगात संधी लाभतील. आर्थिक बाबतीत विचारानं रहावं. वैवाहिक सुख-समाधान लाभेल.
- **कुंभ** : ताण-तणाव वेळीच दूर करावेत. अनुभवींचा सल्ला कामी येईल. गृहसजावटीत अनुकूलता राहील.
- **मीन** : महत्त्वाची बोलणी आज करावीत. व्यवसायात नव्या संधी लाभतील. मुलांची विशेष प्रगती होईल.

## स्टाईल स्टेटमेंट

### एथनिक्सना द्या हटके लूक!

✻ पारंपरिक लेहंगा चोलीला तुम्ही मॉडर्न लूक देऊ शकता. लेहंग्यावर चोली घालण्याऐवजी साईट कट असलेला लाँग कुर्ता घाला. नक्षीकाम केलेला केपही चालू शकेल. यावेळी लेहंगा आणि कुर्त्याच्या रंगसंगतीकडे विशेष लक्ष द्या. यासोबत स्टेटमेंट नेकलेस कॅरी करा. पोटली बॅग किंवा क्लच घ्या. अशा प्रकारे तुम्ही एथनिक लूक मिळवू शकता.

✻ कुर्ता ड्रेसेस हा यंदाचा ट्रेंड आहे. शॉर्ट कुर्त्यापासून मॅक्सी पद्धतीचे लाँग कुर्ते यांची बरीच चलती आहे. कुर्त्यांमध्ये सध्या प्रचंड व्हरायटी बघायला मिळते. यासोबतच छानशी पादत्राणं कॅरी करा.

✻ सण किंवा लग्न म्हटलं की साडी हवीच. एथनिक्समध्ये साडीला पर्याय नाही. अर्थात साडीही वेगळ्या पद्धतीने कॅरी करता येईल. साडीला स्टायलिश लूक देण्यासाठी वेस्टबँड्सचा वापर करता येईल. धोती पद्धतीने साडी नेसता येईल. नेहमीच्या पारंपरिक ब्लाउजना फाटा देऊन पेप्लम टॉप, क्रॉप टॉप किंवा मेटालिक कोरसेटचा वापर करता येईल.

## दिन विशेष

### ४ ऑक्टोबर

- १९१३ : प्रख्यात गायिका सरस्वतीबाई राणे यांचा जन्म.
- १९२१ : प्रख्यात मराठी गायक केशवराव भोसले यांचे निधन.
- १९९७ : शार्लट, नॉर्थ कॅरोलिना या शहरात १,७३,००,००० अमेरिकन डॉलरचा दरोडा.
- २००६ : ज्युलियन असांज यांनी विकिलीक्स सुरू केलं.
- २०१३ : राज ठाकरे यांनी खास इव्हेंट घेऊन नाशिकमधील ‘गोदापार्क’ या प्रकल्पाचा आराखडा सादर केला.

## रंजक विज्ञान

### वाऱ्याची वर्गवारी

दिसत नाही पण जाणवतं ते काय, असं कोडं कोणी घातलं तर तुम्ही हवा हे उत्तर देऊन मोकळे होता. हवा आहे म्हणून आपलं अस्तित्व आहे हेदेखील तुम्ही जाणता. पृथ्वीचा पृष्ठभाग सगळीकडे सम प्रमाणात तापत नाही. या असमतोलामुळे वाऱ्याची निर्मिती होते. पृथ्वीचा पृष्ठभाग वेगवेगळ्या घटकांनी बनला आहे. पाणी आणि जमीन समान नाही. यामुळे सूर्याची किरणं शोषून घेण्याचं प्रमाणही समान नसतं. वेग आणि दिशेद्वारे हवेचं मापन केलं जातं. पृथ्वीच्या काही भागावर सूर्याची किरणं थेट पडतात. यामुळे हा परिसर वर्षभर तापलेला असतो. काही प्रदेशात सूर्यकिरणं थेट पोहचत नाहीत. हा भाग तुलनेने थंड असतो. अशा परिस्थितीत थंड हवेच्या तुलनेत वजनाने कमी असलेल्या गरम हवेचं प्रमाण वाढतं. त्यानंतर थंड हवा वातावरणात शिरते आणि गरम हवेचा प्रभाव कमी होतो. यामुळे वारा वाहतो. खारे वारे, जमिनीवरून वाहणारे वारे अशी वर्गवारी केली जाते.

## पंचांग

**शनिवार, ४ ऑक्टोबर २०२५**
विश्वावसूनाम संवत्सर, शके १९४७, अश्विन शु. १२, चंद्रराशी : कुंभ, योग : शूल, नक्षत्र : धनिष्ठा, सूर्योदय : ६.३२, सूर्यास्त : ६.२२

## फॉरवर्डस

**हमी क़ो क़त्ल औऱ हमी क़ो सलाम करतें हैं...**

**कुछ लोग़ बड़े सलीक़े सें ये क़ाम करतें हैं ...!**

## आरोग्यमंत्र

### काय आहे फंगल इन्फेक्शन?

बऱ्याच जणांना फंगल इन्फेक्शनचा त्रास होतो. शरीराच्या कोणत्याही भागात होणारं हे फंगल इन्फेक्शन खूपच त्रासदायक असतं. उष्ण आणि दमट वातावरणामुळं तसंच ज्या लोकांना खूप घाम येतो त्यांना फंगल इन्फेक्शन होण्याची शक्यता जास्त असते. ओले कपडे घालणं, घट्ट शूज किंवा कपडे घालणं, वैयक्तिक स्वच्छतेची काळजी न घेणं. काही प्रतिजैविक औषधांचे दुष्परिणाम आणि कमी रोगप्रतिकार शक्ती ही अशा फंगल इन्फेक्शनचची मुख्य कारणं आहेत.



पुरळ किंवा लालसर चट्टे असं बहुतेकदा यांचं स्वरूप असतं. खाज सुटणं, आग होणं ही याची लक्षणं असतात. कँडीडा अल्बिकन्स हे एक फंगल इन्फेक्शन असून ते त्वचेवर, तोंडाजवळ किंवा गुप्तांगा जवळच्या ओलसर त्वचेवर होतं. तर रिंगवर्म या प्रकारचं फंगल इन्फेक्शन प्रामुख्याने त्वचेवर, डोक्याच्या त्वचेवर, पायांना, मांडीवर आणि गुप्तांगाजवळ होतं. यातून बाहेर पडण्यासाठी किंवा हा त्रास होऊ नये यासाठी वैयक्तिक स्वच्छतेची काळजी घेतली पाहिजे. स्नानगृह किंवा सार्वजनिक आंघोळ अथवा पोहण्याचे तलाव या ठिकाणी स्वच्छता बाळगली पाहिजे. दररोज मोजे बदलणं, खूप घट्ट शूज न घालणं, कोणाचीही वस्तू न वापरणं ही काळजी घ्यायला हवी. यावर उपाय म्हणून २.५ पीएचचे ॲसिडीक पाणी दिवसातुन ३-४ वेळा बाधित जागेवर स्प्रे करावे. मात्र लवकर बरे न झाल्यास डॉक्टरांचा सल्ला घेणं आवश्यक आहे.

## फिटनेस फंडा

व्यायामानंतरच तुम्ही उच्च जीआययुक्त अन्नपदार्थांचं सेवन करू शकता. यावेळी उच्च जीआयचा तुमच्या शरीरातल्या इन्शुलिनवर परिणाम होत नाही. पण तुम्हाला फॅट लॉस करायचा असेल तर वर्कआउटनंतरही कमी जीआययुक्त पदार्थ खाणं योग्य ठरतं. व्यायामानंतर प्रथिनांचं सेवन करायला हवं. प्रथिनांमुळे शरीरात अमायनो ॲसिड शोषलं जाईल. सुरूवातीला दहा ग्रॅम प्रथिनांपासून सुरूवात करा. व्यायामाची तीव्रता वाढली की प्रथिनांचं प्रमाण २५ ते ३० ग्रॅमपर्यंत न्या. व्यायामानंतरच्या आहारात फॅट्स टाळा. कारण त्यावेळी शरीराला फॅट्सची अजिबात गरज नसते.

## करिअरवाटा

### सूत्रसंचालक व्हायचंय?

सध्या मनोरंजन विश्व विस्तारलं आहे. कार्यक्रमांची संख्या वाढत आहे त्याचप्रमाणे निर्माते आणि वाहिन्यांची टीम सादरीकरणात वैविध्य आणण्याच्या प्रयत्नात आहेत. यातूनच छोट्या पडद्यावर कारकिर्दीच्या नवनवीन संधी उपलब्ध होत आहेत. सध्या उत्तम सूत्रसंचालकांना



चांगली मागणी आहे. या मंडळींची कमाईही प्रचंड असते. अर्थात सूत्रसंचालक म्हणून काम करण्यासाठी काही कौशल्यांची गरज असते. त्यांचं सामान्य ज्ञानही उत्तम असावं लागतं. हे ज्ञान मिळवण्याची प्रक्रिया सतत सुरू असते. टीव्हीवरील कार्यक्रमाचं निवेदन करणं, सामाजिक- सार्वजनिक कार्यक्रमाचं सूत्रसंचालन करणं, वृत्तनिवेदन करणं, वृत्तविषयक चर्चेचं संचालन करणं, विविध क्रीडा सामन्यांचं समालोचन करणं आदी जबाबदाऱ्या पार पाडताना अँकरला याचा उपयोग होतो. रटाळ पद्धतीने निवेदन करण्यापेक्षा ते अधिक मनोरंजक किंवा उद्बोधक कसं होईल याला महत्त्व असतं. हे प्रशिक्षण देणाऱ्या अनेक संस्था आहेत. टीव्ही जर्नालिझम अँन्ड अँकरिंग या विषयातला पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमही उपलब्ध आहे. इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ मास कम्युनिकेशन, नवी दिल्ली या संस्थेतही अँकरिंगचं प्रशिक्षण दिलं जातं. त्याचा नक्कीच फायदा होईल.

## खेचाखेची

### त्रास

**मुख्याध्यापक** : तुमचा मुलगा शाळेत नेहमी त्रास देतो. तुम्ही भेटायला या उद्या.

.
.
.
.
.
.

**पालक** : तो घरी पण खूप त्रास देतो. आम्ही बोलावतो का तुम्हाला ?

## वेगळं काही

संयुक्त अरब अमिरातीतल्या एका ब्रँडने बनवलेले बूट जगातले सर्वात महागडे आहेत. या बुटांची किंमत किती बरं असावी? दहा लाख, वीस लाख का पन्नास लाख... नाही हे बूट १.७ कोटी डॉलर म्हणजे तब्बल १.२३ अब्ज रूपयांचे आहेत. ‘पॅशन डायमंड’ असं या बुटांचं नाव आहे. यात १५ कॅरेटचा हिरा जडवण्यात आला आहे. यासोबतच छोटे छोटे २३६ हिरे आणि सोन्यामुळे बूट खूपच सुंदर दिसतात. संयुक्त अरब अमिरातीतल्या जदा दुबई या ब्रॅण्डने पॅशन ज्वेलर्सच्या सहयोगाने हे बूट बनवले आहेत. हे बूट बनवण्यासाठी ९ महिन्यांचा काळ लागला. जदा दुबई हा ब्रॅण्ड हिरे जडवलेले बूट बनवण्यासाठी प्रसिद्ध आहे. पण अत्यंत महागडे असे हे बूट बघून आपण तोंडात बोटं घालू हे नक्की!

## स्मार्ट टिप्स

### काम होईल झटपट

तयार होताना येणाऱ्या छोट्या-मोठ्या समस्यांवर वैतागून नव्हे तर काही टिप्स अवलंबून उपाय शोधणं चांगलं. याविषयी...



✻ एखादा पेहराव घालायला काढल्यानंतर चुरगळलेला निघाला तर खूप वैताग येतो. बराच काळ तसाच ठेवल्याने इस्त्री केलेला पेहरावही चुरगळून जातो. इस्त्री करायला वेळ नसतो. अशा वेळी फक्त दोन मिनिटांमध्ये चुरगळलेला ड्रेस इस्त्री केल्यासारखा दिसू शकतो. तुम्ही ब्लो ड्रायरचा वापर करून कपड्यांच्या सुरकुत्या घालवू शकता. ब्लो ड्रायर लांब धरून चुरगळलेल्या भागावरून फिरवा. टॉवेलनेही सुरकुत्या घालवता येतील. चुरगळलेलं कापड टेबलवर पसरवून त्यावर ओला टॉवेल ठेवा. वरून दाब द्या. यामुळे सुरकुत्या निघून जातील. ✻ काजळ संपलं असेल तर तुम्ही घरच्या घरी नैसर्गिक काजळ तयार करू शकता. यासाठी चार- पाच बदाम, कोरफडीचा गर, खोबरेल तेल, भांडं असं साहित्य घ्या. बदाम काळपट होईपर्यंत गॅसवर ठेवा आणि थंड झाल्यावर वाटून घ्या. पाणी घालून पेस्ट बनवा. यात कोरफडीचा गर आणि खोबरेल तेल घाला. तुमचं काजळ तयार आहे. हे काजळ हवाबंद डब्यात भरून ठेवा.

## सुडोकू १२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ३ | ५ | | | | २ | ९ | |
| ८ | | | | ७ | ३ | | | |
| | | | | ९ | | ५ | ३ | |
| | | | | | ८ | १ | | २ |
| ६ | | | | २ | | | | ४ |
| ४ | | ७ | ६ | | | | | |
| | ६ | ८ | | ५ | | | | |
| | | | ३ | १ | | | | ६ |
| | १ | ९ | | | | ७ | २ | ३ |

**टीप -**

✻ या चौकटीमध्ये सर्व रिकाम्या घरांमध्ये १ ते ९ पैकी अंक वापरून चौकट पूर्ण करायची आहे. यामध्ये प्रत्येक आडव्या ओळीत, उभ्या ओळीत व ३ ह ३ लहान चौकटीमध्ये १ ते ९ पैकी प्रत्येक अंक एकदा आणि एकदाच आला पाहिजे.

✻ आधी छापून दिलेले अंक बदलता येणार नाहीत.

✻ अशा तऱ्हेने पूर्ण झालेले उत्तर नेहमी एकच असते. पर्यायी उत्तरे असू शकत नाहीत.

## सुडोकू १० चे उत्तर

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ७ | ३ | १ | ५ | ४ | ९ | ८ | ६ | २ |
| ८ | ९ | ६ | २ | १ | ७ | ३ | ४ | ५ |
| ५ | २ | ४ | ८ | ३ | ६ | ७ | १ | ९ |
| ४ | ८ | ५ | ६ | २ | ३ | १ | ९ | ७ |
| ६ | १ | ९ | ४ | ७ | ८ | ५ | २ | ३ |
| २ | ७ | ३ | ९ | ५ | १ | ४ | ८ | ६ |
| ९ | ५ | ७ | १ | ८ | २ | ६ | ३ | ४ |
| १ | ४ | २ | ३ | ६ | ५ | ९ | ७ | ८ |
| ३ | ६ | ८ | ७ | ९ | ४ | २ | ५ | १ |

## शब्दकोडे क्रमांक १२



**आडवे शब्द :-**

१) चंद्रावर गेलेला पहिल्या अंतराळवीराचे नाव
५) पुष्कळ
८) खाजणारा
९) आकाशाला भेदणारे
१२) प्रत्येक दिवशी
१४) मान,सन्मान
१७) सोंगटी
१८) चिखल
१९) उत्सव
२०) मडके
२२) अंकुर
२३) दुर्दशा
२५) दरिद्री,गरजू लोक
२७) चाटण्याचे औषध
२८) पाण्याचा बारीक प्रवाह,पात्याची तीक्ष्णता
२९) काढलेली सुट्टी
३०) गोमाता
३१) आभारदर्शक शब्द
३२) अहंकार
३३) डोंगराचा उभा भाग
३५) अपशकुन करणे
३७) सूर्याचे एक नाव
३८) सवयीचे होणे
४०) जिवाविषयी अती प्रीती असणे
४४) ढीग
४६) पत,ओंजळ,साक्ष
४७) मान्यतेचा शब्द
४८) एक पांढरा शुभ्र प्राणी
४९) आग्रा येथील संगमरवरी वास्तू
५१) आश्रय
५३) पर्ण
५४) नीटनेटके,ठाकठीक
५६) अंगातील ज्वर
५८) माफ
६०) चौकशी
६२) मालक
६३) वर्ष, साल
६४) प्रतिष्ठा
६५) एक तार वाद्य
६७) यश देणारे
७०) जाजम
७१) विश्व,दुनिया
७३) मऊ
७४) गणेशाचे एक नाव
७५) कपडे बदलणे
७७) अथवा,किंवा
७८) मातापिता

**उभे शब्द :-**

१) शनीचा खडा
२) संकट
३) भक्कम,मजबूत (इं.)
४) आकाश
५) खटला दाखल करणारा
६) नशा आणणारा,मदकारी
७) पंख
८) कंड
१०) खून करणे,जीवे मारणे (वा.प्र)
११) भित्रा
१३) रडणे,विलाप
१५) कामाची दाटी
१६) शेळी
१८) बोटांसह तळहात
१९) सती गेलेल्या स्त्रीच्या चितेभोवती पहारा करणे
२१) जाणे-येणे,वहिवाट
२३) अनुमती
२४) उर्ध्व दिशा
२६) दुर्लक्ष,क्षमा
२८) गहू,तांदूळ,डाळ इ प्रकार
३१) कथिंबीरीचे बी
३३) चंद्राकृती गोड पदार्थ
३४) केर
३६) सिंह
३७) विपत्तीची कहाणी
३९) अर्धी ओंजळ
४१) उसनवार
४२) तहानलेला (हिं.)
४२) वाटेल तसे
४५) पसरलेले (सामान)
४५) समर्थन करण्याजोगे
४९) वडील
५०) वेल
५२) असुर,दानव
५५) स्थैर्य
५७) पळून जाणे
५९) मनुष्य
६१) प्राचीन
६४) देशाचा एक मोठा भाग
६५) कमळ
६६) चांदी
६८) द्वेष,मत्सर (फारसी)
६९) एक खाद्यतेल
७०) एक वाद्य
७२) नड,आवश्यकता
७६) फळांचा राजा

(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| वा | स्त | व्य | ■ | दे | वा | ल | य | ■ | अ | व | धा | न | ■ | क | र्म |
| ट | ■ | व | सा | ह | त | ■ | म | स | ■ | न | वा | ■ | ओ | ळ | ■ |
| प | ड | सा | द | ■ | ड | ब | ल | रो | टी | ■ | धा | क | ■ | स | मा |
| ■ | रा | य | ■ | हि | ■ | ख | ■ | व | च | ना | व | च | नी | ■ | नि |
| भा | व | ■ | पा | रा | वा | र | ■ | र | ■ | मां | ■ | रा | ज | धा | नी |
| ग | ड | क | री | ■ | चा | ■ | सा | ■ | स | त | त | ■ | मो | र | ■ |
| ■ | रा | स | ■ | दे | ■ | प | र | स | दा | र | ■ | क | ड | क | ड |
| आ | व | क | जा | व | क | ■ | क | म | चा | ■ | मा | स | ■ | स | र |
| व | ■ | स | गा | ■ | द | मा | ■ | ■ | र | स | दा | र | ■ | ■ | पो |
| ई | श | ■ | ई | श्व | र | ■ | ला | ज | ■ | म | ■ | त | क | त | क |
| ■ | ह | या | त | ■ | दा | स | ■ | म | क | र | ■ | ■ | ब | ला | ■ |
| भा | र | त | ■ | रा | न | व | ट | ■ | ल | स | ल | स | ■ | त | ख्त |
| रा | ■ | ना | रा | ज | ■ | ड | व | र | णे | ■ | हा | ल | चा | ल | ■ |
| ■ | म | म | ■ | व | सा | ■ | ट | ■ | ■ | ध | न | ग | र | ■ | ज |
| त | न | य | ■ | ट | व | ट | वी | त | ■ | डा | स | ■ | ग | म | न |
| सा | न | ■ | गो | ■ | ध | न | ■ | प | सा | ■ | र | पे | ट | ■ | न |

# विनोदाचा बादशहा मेहमूद

**महमूद अली हे बॉलिवूडमधील एक प्रसिद्ध नाव. त्यांचा एक किस्सा आठवतो. जो महमुद यांचा 'पडोसन' चित्रपट रिलीज झाला तेव्हांचा आहे. पडोसनमध्ये एका दाक्षिणात्य नृत्यप्रशिक्षकाची भूमिका महमूद यांनी साकार केली आहे. किशोर कूमार सोबत छान जूगलबंदी आहे. सुनिल दत्त, किशोर कूमार, मेहमूद, मूकरी, ओमप्रकाश असे एकापेक्षा एक कलाका होते या चित्रपटात. सायरा बानो या चित्रपटाची नायिका महमूदकडून नृत्य शिकत असते. तर सुनील दत्त नायक होता. हा खूप विनोदी चित्रपट होता. पण दक्षिण भारतातील लोकांचा असा गैरसमज झाला की या चित्रपटातून दक्षिणेतील लोकांची टिंगल करण्यात आली आहे. दक्षिणेतील प्रसिद्ध अभिनेता कमल हसन तेव्हा शाळेत शिकत होता. तो सांगतो आम्ही चित्रपट पहायला जाताना हातात दगड घेऊन गेलो होतो. थिएटरमध्ये दगडफेक करून हा चित्रपट बंद पाडण्यासाठी. पण जेव्हा चित्रपट पाहिला तेव्हा एवढे भान हरपून गेले हसून हसून पोट दुखले की हातातले दगड विसरूनच गेलो.**

**श्री. श्रीराम शेटये**





आपल्या अफलातून अभिनयाने, टायमिंगने एकेकाळी या हास्यअभिनेत्याने प्रेक्षकांच्या हृदयावर राज्य केले आहे. मन हेलावून टाकणाऱ्या अभिनयासोबतच मेहमूद यांनी त्यांच्या चित्रपटांच्या माध्यमातून सामाजिक विषय देखील तेवढेच आशयघनतेने मांडत भारतीय चित्रपटसृष्टीवर आपला अमिट ठसा उमटवला. मेहमूद यांना त्यांच्या कारकिर्दीत फिल्मफेअर पुरस्कारांसाठी २५ नामांकने मिळाली. यात सर्वोत्कृष्ट हास्यअभिनेत्यासाठी १९ आणि सर्वोत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्यासाठी ६ नामांकने मिळाली होती. मेहमूद यांची प्रसिद्धी इतकी होती की, चित्रपटात काम करण्यासाठी त्यांना नायकापेक्षा अधिक मानधन मिळत असे. मात्र हा प्रवास एवढा सोपा नव्हता.

४० आणि ५० च्या दशकातील प्रसिद्ध नर्तक आणि अभिनेता आणि मुमताज अली या दाम्पत्याला २९ सप्टेंबर १९३२ ला मेहमूद अली यांचा जन्म झाला. त्यांच्या आठ अपत्यांपैकी दुसरा मेहमूद अली. लहानपणापासून अभिनयाची आवड असली तरी घरची आर्थिक परिस्थिती फारच बिकट होती. त्यामुळे लहानपणापासूनच त्यांनी अंडी आणि कंगवे विकण्याचे काम केले. थोडे मोठे होताच टॅक्सी चालविण्यास शिकले. त्याचदरम्यान 'किस्मत' (१९४२) या चित्रपटातून बालपणीच रुपेरी पडद्यावर त्यांनी आपली किस्मत आजमावत अभिनय कारकिर्दीला सुरुवात केली. मोठे झाल्यावर मीना कुमारी यांनी त्यांना टेबल टेनिस शिकवण्यासाठी नोकरीला ठेवले होते. तिथे ते मीना कुमारीची बहीण मधू हिच्या प्रेमात पडले, मधुशी लग्न करण्याकरिता आत्महत्या करण्याची धमकीसुद्धा देऊन टाकली. अखेरीस मधु आणि मेहमूद यांचा विवाह झाला. पुन्हा अभिनयाच्या आवडीने उचल घेतली. मेहमूद यांनी अभिनय करण्यास सुरवात केली.

सुरुवातील दो बिघा जमीन (१९५३) सी. आय. डी. (१९५६) आणि प्यासा (१९५७) या चित्रपटांमध्ये छोट्या-छोट्या भूमिकांच्या स्वरुपात सुरुवात झाली. पहिला ब्रेक परवरिश (१९५८) या चित्रपटात मिळाला. राज कपूर यांच्या भावाची भूमिका मेहमूद यांनी केली होती. या चित्रपटापासून ओळख मिळाली आणि भूमिकांची लांबीही वाढली. ९११ (१९५९) आणि छोटी बहन (१९५९) या चित्रपटांसाठी त्यांना सहाय्यक अभिनेता म्हणून पहिले फिल्मफेअर नामांकन मिळाले. त्यानंतर त्यांनी 'मियां बीवी राजी' (१९६०), 'मंझिल' (१९६०), 'श्रीमान सत्यवादी' (१९६०), 'ससुराल' (१९६१), 'राखी' (१९६२), 'दिल तेरा दीवाना' (१९६२), 'हमराही' (१९६३), 'घर बसाके देखो' (१९६३), 'गोदान' (१९६३), 'कहीं प्यार ना हो जाए' (१९६३), 'भरोसा' (१९६३), 'जिंदगी' (१९६४), 'बेटी बेटे' (१९६४), 'चित्रलेखा' (१९६४), 'सांझ और सवेरा' (१९६४) आणि 'जोहर-मेहमूद इन गोवा' (१९६५) यासारख्या सुपरहिट चित्रपटात अभिनय करतांना दिसले. यातील काही चित्रपटात त्यांनी हिरो म्हणून रोल केले, परंतु प्रेक्षकांनी त्यांना कॉमेडियन म्हणून जास्त पसंती दिली.

हास्यअभिनेता म्हणून प्रेक्षकांनी डोक्यावर घेतल्यावर मेहमूद यांना मागे वळून पाहण्याची गरज पडली नाही. प्रेक्षकप्रिय असल्याने, चित्रपट निर्मात्यांसाठी ते आवडते हास्यअभिनेता होते; खास त्यांच्यासाठी चित्रपटात भूमिका लिहिल्या जात; त्यांच्यासाठी विशेष गाणी लिहिली जात. भारतीय चित्रपटसृष्टीतील मेहमूद यांचे योगदान चार दशकांहून अधिक काळ आहे. मात्र मेहमूद केवळ हास्यअभिनेता नव्हते. मात्र इतर अभिनेत्यांपेक्षा लोकांना हसवण्याच्या कलेतील उत्कृष्ट कला त्यांच्या अंगी होती. त्यांच्या संस्मरणीय भूमिकांमध्ये 'पडोसन' (१९६८) मधील नृत्य शिक्षकाची भूमिका असो, 'गुमनाम' (१९६५) मधील हैदराबादी प्रेमी असो किंवा 'प्यार किये ए जा' (१९६६) उनाड मुलगा असो प्रत्येक भूमिका त्यांनी समरसून केली. यानंतर त्यांची कारकिर्द 'दो दिल (१९६५),' 'गुमनाम'(१९६५), 'काजल'(१९६५), 'प्यार किये जा' (१९६६), 'पत्थर के सनम'(१९६६), 'मेहरबान' (१९६६), 'आंखे' (१९६८), 'नील कमल' (१९६८), 'दो कलियां' (१९६८), 'इज्जत' (१९६८), 'मेरी भाभी' (१९६९), 'वारिस' (१९७०), 'हमजोली' (१९७०), 'पारस' (१९७०), 'जोहर महमूद'(१९७१),' 'नया जमाना' (१९७१), 'मेरे अपने'(१९७१), 'लूटमार' (१९८०), 'मन पसंद'(१९८०), 'खुद्दार'(१९८२), 'फैसला'(१९८२) या चित्रपटातून बहरत राहिली.

एक यशस्वी अभिनेता असण्याबरोबरच मेहमूद निर्माता आणि सर्जनशील दिग्दर्शकही होते. त्यांचे स्वत:चे प्रॉडक्शन हाउस सुरु करत त्यांनी 'छोटे नवाब' (१९६१) या चित्रपटातून निर्माता म्हणून आणि १९६५ मध्ये 'भूत बंगला' या चित्रपटातून दिग्दर्शक म्हणून आपल्या कारकिर्दीची सुरुवात केली. त्यानंतर त्यांनी 'साधू और शैतान' (१९६८), 'पडोसन' (१९६८), 'बॉम्बे टू गोवा' (१९७२), 'कुंवारा बाप' (१९७४), 'गिन्नी और जॉनी' (१९७६), 'दुश्मन दुनिया का' (१९७६), 'एक बाप छे बेटे' (१९७८), 'जनता हवालदार' (१९७९) या चित्रपटाची निर्मिती केली. त्यांच्या निर्मितीतील चित्रपटांमध्ये त्यांनी आर.डी.बर्मन आणि अमिताभ यांना अनुक्रमे 'छोटे नवाब' (१९६१) आणि 'बॉम्बे टू गोवा' (१९७१) संधी दिली.

सिनेमांत हीरो आणि हिरोइनची कमाई खलनायकापेक्षा जास्त असते, परंतु त्याकाळी महमूद हिरोपेक्षा अधिक पटीने जास्त पैसे घेत होते. 'मै सुंदर हूं' सिनेमात महमूद यांच्यासोबत विश्वजीत यांनी काम केले होते. या सिनेमात हिरो म्हणून काम करण्यासाठी विश्वजीत यांना दोन लाख रुपये तर महमूद यांना आठ लाख रुपये मानधन मिळाले होते. असेच 'हमजोली' सिनेमासाठीसुद्धा घडले होते. या सिनेमातील नायक जितेंद्र होते, परंतु महमूद यांना त्यांच्यापेक्षा जास्त पैसे मिळाले होते. सिनेमाच्या पोस्टवर नायकाच्या बरोबरीने त्यांचेही छायाचित्र झळकत असे. हास्य अभिनेता, विनोदवीर, विनोदाचा बादशहा अशी अनेक विशेषणे असलेले मेहमूद हे अभिनेता म्हणूनही प्रसिद्ध होते. मेहमूद आणखी एका गोष्टीसाठी प्रसिद्ध होते ते म्हणजे ते कोणत्याही प्रसंगाची संवाद रिर्हसल करत नसत. जे काही असे ते उत्स्फूर्ततेने सादर करत असत.

मात्र त्यांच्या अनेक सिनेमांमध्ये त्यांनी आपल्या दमदार अभिनयाने प्रेक्षकांना रडण्याससुद्धा भाग पाडले. 'कुंवारा बाप', 'लाखो में एक जैसा' हे चित्रपट त्याचे मोठे उदाहरण आहेत. या दोन्ही सिनेमामध्ये मेहमूद यांनी मुख्य अभिनेता म्हणून भूमिका साकारली.. 'कुंवारा बाप' ही मेहमूद यांच्या खऱ्या आयुष्यावर आधारित सिनेमा होता. त्यांचा मुलगा मकदूम अलिला पोलियो झाला होता. मेहमूद यांनी त्याला ठिक करण्यासाठी लाख प्रयत्न केले मात्र होऊ शकले नाही. त्यामुळे त्यांनी आपले दु:ख सिनेमाद्वारे मांडण्याचा व पोलिओमुळे एखाद्या अपत्याच्या अपंगत्वाचा परिणाम संपूर्ण कुटुंबावर कसा होतो हे दाखविण्याचा प्रयत्न केला होता. आय.एस.जौहर व मेहमूद यांची जोडी खास मानली जाते. या दोघांनी जौहर महमूद इन गोवा व जौहर महमूद इन हाँगकाँग या चित्रपटात जान आणली.

मेहमूद यांनी अनेक कलाकारांना मदतीचा हात दिला होता. महानायक अमिताभ बच्चन यांना जेव्हा चित्रपट मिळत नव्हते तेव्हा मेहमूद यांचा भाऊ अन्वर अली यांच्यामुळे अमिताभची मेहमूदशी ओळख झाली आणि मेहमूद यांनी नायक म्हणून अमिताभला बॉम्बे टू गोवा या चित्रपटात घेतले. या चित्रपटाचा एक किस्सा सांगितला जातो. तो म्हणजे या चित्रपटातील गाणे 'देखा ना हाय रे सोचा ना' यात अमिताभला नाचायचे होते. अमिताभने जीव तोडून सांगितले की, मला नाचता येत नाही, पण मेहमूद यांनी काहीएक ऐकले नाही आणि अमिताभला या गाण्यात डान्स करावा लागला.

या गाण्यातील त्यांचा डान्स प्रेक्षकांनाही आवडला होता. मेहमूद यांनी त्याच्या कारकिर्दीत ३०० पेक्षा हिंदी चित्रपटांमधून काम केले होते. मेहमूद आणि मधू यांना आठ अपत्ये झाली, त्यातील १९९६ मध्ये त्यांची निर्मिती असलेला शेवटचा सिनेमा दुश्मन दुनिया का या चित्रपटातून त्यांनी आपला मुलगा मंजूर अली याला नायक म्हणून पडद्यावर आणले पण चित्रपट सपाटून आपटला. दुसरा मुलगा लकी अली हा प्रसिध्द गायक व अभिनेता आहे. जीवनात अनेक उतारचढाव पाहिलेल्या मेहमूद यांना अखेरच्या काळात हृदयविकाराने ग्रासले होते. यासाठीच्या उपचारांसाठी ते अमेरिकेला गेले होते. तिथेच उपचार सुरु असताना २३ जुलै २००४ ला पेनसिल्वेनिया येथे त्यांनी या दुनियेला अलविदा म्हटले. मेहमूद खूदा जवळ गेले तरी त्यांच्या आठवणी आजही सीने रसिकांच्या हृदयात कायम आहेत. **

# कादंबरीमध्ये हरवलेला माणूस

श्रद्धांजली

**डॉ. तारा भवाळकर**



**पहिल्या कादंबरीपासून मी एस. एल. भैरप्पांची वाचक आहे. मराठीमध्ये त्यांच्या कादंबऱ्यांचे भाषांतर करणारी उमा कुलकर्णी ही माझी लहानपणापासूनची मैत्रीण. तिच्यामुळे अनेकदा प्रकाशित होण्यापूर्वीच मला त्यांच्या कादंबऱ्या वाचायला मिळाल्या आहेत. त्यामुळे लेखक म्हणून ते चांगलेच परिचित आहेत. आज देहरुपाने ते आपल्यामध्ये नाहीत. पण त्यांचे लेखन पुढच्या अनेक पिढ्यांसाठी प्रेरणादायी ठरेल यात शंका नाही.**

एस. एल. भैरप्पा यांच्या निधनाची वार्ता साहित्यप्रेमींना दु:ख देऊन गेली. त्यांच्या नसण्याने साहित्यविश्वाचे किती मोठे नुकसान झाले आहे, हे वेगळे सांगण्याची आवश्यकता नाही. लेखनासाठी कादंबरी हा साचा निवडणारे भैरप्पा तत्वज्ञानाचे प्राध्यापक आणि अभ्यासक होते. कुटुंबात घडलेल्या विपरित प्रसंगांना तोंड देत ते लहानाचे मोठे झाले. लहानपणीच आईचे छत्र हरवले. पंधराव्या वर्षीचे असताना रानात नेऊन आपल्या अवघ्या पाच वर्षांच्या लहान भावावर अंत्यसंस्कार करण्याचा प्रसंगही त्यांच्यावर आला. असे विविध प्रकारचे दु:ख भोगत एका अर्थी जगण्याकडून तत्वज्ञानाकडे आणि तत्वज्ञानाकडून जगण्याकडे त्यांचा सतत प्रवास होत राहिलेला आपल्याला दिसतो. पुढे शिक्षणामध्येही अनेक अडथळे आले. तरीदेखील त्यांनी शिक्षण पूर्ण केले. पदवी घेतलीच, त्याचप्रमाणे डॉक्टरेटही घेतली. १९५८ च्या आसपास त्यांनी लेखनाला सुरूवात केली. 'वंशवृक्ष' ही त्यांची पहिली कादंबरी. या कादंबरीने कन्नड साहित्यात मोठे वादळ निर्माण केले. त्या वेळचे उदयोन्मुख आणि नामांकित लेखक, नाटककार गिरीश कर्नाड यांनी त्यावर एक चित्रपटही काढला. त्यात स्वत: काम केले. मात्र पुढील काळात गिरीश कर्नाड, लेखक अनंत मूर्ती यांच्या आणि भैरप्पांच्या विचारसरणीमध्ये अंतर निर्माण होत गेले. यातून त्यांनी एकमेकांवर केलेली टीकाही आपण जाणतो. असा सगळा इतिहास बराच मोठा आहे.

पहिल्या कादंबरीपासून मी भैरप्पांची वाचक आहे. याचे कारण मराठीमध्ये त्यांच्या कादंबऱ्यांचे भाषांतर करणारी उमा कुलकर्णी ही माझी लहानपणापासूनची मैत्रीण. तिच्यामुळे अनेकदा प्रकाशित होण्यापूर्वीच मला भैरप्पांच्या कादंबऱ्या वाचायला मिळाल्या आहेत. त्यांना प्रत्यक्ष भेटीचा योग काही आला नाही. त्यामुळे व्यक्ती म्हणून त्यांचा परिचय नाही. मात्र लेखक म्हणून ते चांगलेच परिचित आहेत. आधी उल्लेख केल्याप्रमाणे अखेरपर्यंत त्यांनी कादंबरी हाच लेखनाचा साचा कायम ठेवला. त्यांना अनेक पुरस्कार मिळाल्याचे आपण जाणतो. त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्यांमध्ये 'दुभंग'चा उल्लेख करावा लागेल. यात त्यांनी सोसलेले दारिद्र्य दिसते. त्यांच्या 'वंशवृक्ष' या कादंबरीने मराठी वाचकांना चांगलेच बांधून ठेवले. बऱ्याच कादंबऱ्यांची मराठीत भाषांतर झाल्यामुळे तेदेखील, मी कन्नडपेक्षा मराठी वाचकांना अधिक परिचित आहे, असे म्हणत असत. महाराष्ट्रात त्यांचे सतत जाणे-येणे होते. काही दिवस ते मुंबईमध्ये रहायला होते. त्यांनी सुरूवातीच्या काळात सयाजीराव गायकवाड यांच्या कॉलेजमध्ये अध्यापनाचे काम केले होते. त्यामुळेच त्यांच्या निधनाने महाराष्ट्रातील वाचकांनाही मोठा धक्का बसलेला आपण पाहिला.

त्यांच्या गाजलेल्या कादंबऱ्यांपैकी एक म्हणजे 'पर्व'. मला स्वत:ला ती खूप आवडली. विशेषत: यातील शेवटचे प्रकरण मला भावले. यात त्यांनी महाभारत युद्धाचा शेवटचा काळ चित्रित केला आहे. हे सगळे वर्णन खरोखर अंगावर काटा आणणारे आहे. महत्त्वाचे म्हणजे यातून आपल्या जीवनाची नश्वरता आणि भीषणता प्रामुख्याने समोर येते. आपण भीष्मांना पितामह म्हणून वंदनीय, पूजनीय मानतो. पण या प्रकरणात त्यांच्या माध्यमातून निसर्गाच्या दरबारात एक माणूस म्हणून शरीराची होणारी विकलांगता लेखकाने अत्यंत परखडपणे मांडली आहे. या प्रकरणात भैरप्पांनी केलेले महायुद्धाचे वर्णन, नंतरची पडझड आणि विविध पातळीवरील माणसासमोर येणाऱ्या दु:खाचे स्वरुप आपल्यालाही अंतर्मुख करुन जाते. राजपदावर असणारी व्यक्ती असो की सामान्य शिपाई, सगळ्यांना दु:खाचा सामना करणे ही बाब अपरिहार्य आणि अटळ असते हे यातून अधोरेखित होते. जगाच्या पाठीवर झालेल्या सगळ्या महायुद्धांचा इतिहास पाहिला, वर्णने वाचली तरी हेच जाणवते. दुसऱ्या महायुद्धाचा काळ, हिटलरने केलेला छळ, विषारी वायूने मारलेले जीव हे सगळेच आपण विविध माध्यमांतून जाणले आहे. समजून घेतले आहे. खरे तर कथा-कादंबऱ्यांमधून वा चित्रपटातून दाखवलेल्या या गोष्टी बघून जगातील क्रौर्य कमी व्हायला हवे होते. भैरप्पांसारख्या लेखकांनी आपल्या लेखणीतून जनांना या अर्थाने शहाणे करण्याचा प्रयत्न केला आहे. पण दुर्दैवाने तसे होताना दिसत नाही.

भैरप्पा यांची गाजलेली आणखी एक कादंबरी म्हणजे 'आवरण'. यामध्ये त्यांनी आधुनिक विश्व चित्रीत केले आहे. यावर पुरोगामी लोकांचा बराच आक्षेप येत राहिला. डाव्या-उजव्या बाजूने चर्चा झाली. मात्र भैरप्पांनी माणसाच्या जीवनातील सगळी उलथापालथ प्रत्यक्षातही अनुभवली होती आणि तत्वज्ञानाच्या अभ्यासातून अभ्यासलीही होती. यातून आलेले महत्त्वपूर्ण विचार त्यांच्या लेखणीतून समोर येत होते. एकंदरच त्यांच्या लेखनात इतिहास, समाजशास्त्र, पुराण, मानववंशशास्त्र आणि मानसशास्त्र या सर्वांचे एकत्रीकरण दिसून येते. माझ्या मते, कोणत्याही विषयाचा एकरेषीय विचार करुन आपल्याला त्या विषयाचे नेमके भान येत नाही तर आंतरज्ञानशाखीय चिंतन करुन केलेली मांडणी असेल तरच जीवनाचे सगळे पैलू उलगडतात. भैरप्पा यांच्या कादंबऱ्यांमध्ये मला हा घटक महत्त्वाचा वाटतो. अशा विचारातून लेखन होते तेव्हा स्वाभाविकच तो केवळ मनोरंजनाचा भाग राहत नाही तर माणसाला अंतर्मुख करणारा, चिंतनशील बनवणारा भाग ठरतो. जीवनावर गांभिर्याने विचार करण्याची प्रवृत्ती अशा कादंबऱ्यांमधून दिसते. भैरप्पांच्या कादंबऱ्या हे याचे सर्वोत्तम उदाहरण म्हणाव्या लागतील.

त्यांच्याच नव्हे तर दक्षिणेकडील सगळ्याच लेखकांबाबत मला ही बाब जाणवते. मराठीमध्ये मात्र हे गांभीर्य फारसे दिसत नाही. मुळातला, भारतीय माणसाच्या मातीतला विचार म्हणता येईल असे लेखन, भारतीय तत्त्वज्ञानाच्या चिंतनातून आलेले विचार दक्षिणेतील सगळ्या लेखकांनी मांडलेले दिसतात. गिरीश कर्नाडांपर्यंतच्या काळाचा विचार केला तर ही बाब प्रकर्षाने जाणवते. मात्र असा विचार महाराष्ट्रात केलेला दिसत नाही. इंग्रजोत्तर काळात जणू दुफळी निर्माण झाली आणि लोकजीवन तसेच अभिजन जीवन वेगवेगळे असल्याचे विचार प्रबळ झाले. कदाचित त्याचा हा प्रभाव असावा. म्हणूनच आंतरज्ञानशाखीय चिंतनात्मक मांडणी मला महत्त्वाची वाटते.

भैरप्पा यांच्या 'उत्तरकांड' या कादंबरीचा उल्लेख मी आवर्जून करेन. त्यांनी 'पर्व'मध्ये महाभारतावर लेखन केले तर रामायणावरील त्यांचे लेखन 'उत्तरकांड'मध्ये दिसते. रामाने सीतेचा त्याग केला. तिची मुले स्विकारली, त्यांना राज्यावर बसवले पण शीलावरुन लोकांनी आक्षेप घेतल्यामुळे रामाने तिला मात्र बाजूला टाकले. त्यानंतर ती परत रामाकडे गेली नाही. रामायणाचा आधार घेत भैरप्पा यांनी या कादंबरीमध्ये रामायणातील या उत्तरकाळाचा वेध घेतला आहे. माझ्या प्रवृत्तीला आणि अभ्यासाला जवळचा असल्यामुळे हा विषय अधिक महत्त्वाचा वाटतो. अलिकडेच लोकपरंपरेतून समजलेली सीता मी 'सीतायन' मध्ये मांडली आहे आणि 'उत्तरकांड'मध्ये भेटणारी सीता याला समांतर जाणारी आहे. उमा कुलकर्णीने भैरप्पांशी बोलताना माझ्या या लेखनाची कल्पना दिली होती. तेव्हा त्यांनी 'सीतायन'चे भाषांतर तू कन्नडमध्ये कर, असे म्हटले होते. तेव्हा प्रत्यक्षात भेट न होता हे त्यांच्याकडून मिळालेले प्रशस्तीपत्रक आहे, अशीच माझी भावना आहे.

देह नश्वर असतो. निसर्गनियमाप्रमाणे भैरप्पा देहरुपाने आज आपल्यात नाहीत. पण चिंतन, लेखनातून ते पुढील अनेक पिढ्यांना मार्गदर्शन देत राहतील यात शंका नाही. त्यांना विनम्र आदरांजली.

**(शब्दांकन : स्वाती पेशवे)**

**

## एस. एल. भैरप्पा यांना मिळालेले काही महत्त्वपूर्ण पुरस्कार

- भारत सरकारकडून पद्मश्री पुरस्कार, २०१६
- आसाम साहित्य सभेचा मामोनी रईसोम गोस्वामी राष्ट्रीय साहित्य पुरस्कार, २०१६
- म्हैसूर विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट, २०१६
- भारत सरकारकडून साहित्य अकादमी फेलोशिप, २०१५
- २०१५ मध्ये म्हैसूर विद्यापीठाकडून मानद डॉक्टरेट
- बेतागेरी कृष्ण शर्मा पुरस्कार, २०१४
- दीनानाथ मेमोरियल फाउंडेशन, मुंबईकडून वाग्विलासिनी पुरस्कार, २०१२
- बिर्ला फाउंडेशनकडून 'मंद्र' या कादंबरीसाठी सरस्वती सन्मान, २०११
- गुलबर्गा विद्यापीठामधून मानद डी.लिट, २००७
- हेडगेवार पुरस्कार (कलकत्ता), २००७
- एनटीआर पुरस्कार (आंध्र प्रदेश), २००७
- कर्नाटक सरकारी मुक्त विद्यापीठ, म्हैसूरकडून मानद डी.लिट., २००५
- पंपा प्रशस्ती (कर्नाटक राज्य) पुरस्कार, २००६

## बाबा यागाची झोपडी

**रशियन लोककथा**

रशियात वरझुगा नावाचे एक लहानसे गाव आहे. गावात वासिलिका नावाची एक मुलगी राहत होती. तिची सावत्र आई ओलेन्का तिचा खूप छळ करत असे. एकदा वासिलिकाला तिच्या सावत्र आईने घरातल्या सगळ्यांसाठी स्वेटर्स विणायला सांगितले. 'हे सगळे स्वेटर्स एका दिवसात विणून झाले नाहीत, तर मी तुला घरातून हाकलून देईन. 'ओलेन्का म्हणाली. बिचारी वासिलिका. ते सगळे स्वेटर्स पूर्ण करण्यासाठी तिला रात्रभर काम करावे लागणार होते. रात्री अंधारात काम करण्यासाठी तिला उजेडाची गरज होती. वासिलिकाला तिच्या आईने मरण्यापूर्वी एक जादूची बाहुली दिलेली होती. 'उजेड मिळवण्यासाठी तुला बाबा यागाकडून प्रकाश आणावा लागेल.' जादूची बाहुली म्हणाली. गावाजवळच्या जंगलात बाबा यागा राहत होती. जंगलाच्या आत अगदी खोल घनदाट झाडीत तिची जादूची झोपडी होती. त्या झोपडीला कोंबड्याचे पाय होते. आश्चर्य म्हणजे ती झोपडी जमिनीवर एका जागी स्थिर नव्हती. ती हवेत उडू शकायची. सगळ्यांना बाबा यागाची भीती वाटायची. 'मी बाबा यागाला मुळीच घाबरत नाही.' वासिलिका म्हणाली. उंच उडणाऱ्या त्या झोपडीत प्रवेश करायला वासिलिका उंच झाडावर चढली. झोपडी त्या झाडाजवळ आली की बाबा यागा तिची जादूची झोपडी एकदम उंच किंवा एकदम खाली घेऊन जाई. बिचारी वासिलिका. उंचावरून खाली पडून तिचे गुडघे फुटले. अंग खरचटले. शेवटी बाबा यागाला तिची दया आली. तिने वासिलिकाला झोपडीत येऊ दिलं. ' मी सांगेन ती कामं केलीस आणि मला खुश केलेस तरच तुला मी 'प्रकाश' देईन.' बाबा यागा म्हणाली. बाबा यागाने तिला खूप कठीण कामे करायला लावली. पण वासिलिकाने जादूच्या बहुलीच्या मदतीने सगळी कामे भराभर केली. अखेर बाबा यागा तिच्यावर प्रसन्न झाली. तिने वासिलिकाला जादूच्या कवटीमध्ये प्रकाश दिला. तो प्रकाश घेऊन वासिलिका घरी आली. सगळ्या वरझुगा गावात तो प्रकाश पसरला. तिच्या पराक्रमामुळे आणि गोड स्वभावामुळे वरझुगाच्या राजपुत्राने तिच्याशी लग्न केले. वासिलिका गावाची राणी बनली.





## अंटार्क्टिकाच्या अंतरंगात...



**आगळंवेगळं जग**

छोट्यांनो, अंटार्क्टिका हा एक खंड आहे. अंटार्क्टिका म्हणजे जगाचं टोक. अंटार्क्टिकावर सगळीकडे बर्फच बर्फ पहायला मिळतो. म्हणूनच अनेकांना या खंडाबद्दल प्रचंड आकर्षण वाटतं. बरेच संशोधक अंटार्क्टिकावर जाऊन संशोधन करत आहेत. अंटार्क्टिकावर बरंच काही पहायला मिळतं. या अजब अशा अंटार्क्टिकाविषयी जाणून घेऊ.

■ पृथ्वीचा दक्षिण ध्रुव अंटार्क्टिकावरच आहे. या ठिकाणाला ॲम्युंडसेन-स्कॉट दक्षिण ध्रुव स्थानक असं नाव देण्यात आलं आहे. १९११ मध्ये नॉर्वेच्या ॲम्युंडसेन यांच्या नेतृत्वाखालील चमूने दक्षिण ध्रुवावर पहिलं पाऊल ठेवलं होतं. हे मानवाचं दक्षिण ध्रुवावरचं पहिलं पाऊल होतं.

■ अंटार्क्टिकावर भारतानेही संशोधन केंद्र उभारलं आहे. 'भारती' असं या संशोधन केंद्राचं नाव आहे. या कायमस्वरुपी केंद्राच्या माध्यमातून भारताचे शास्त्रज्ञ अंटार्क्टिकावर संशोधन करत आहेत. यासोबतच 'दक्षिण गंगोत्री' आणि 'मैत्री' ही केंद्रंही आहेत.

■ पृथ्वीच्या या दक्षिण ध्रुवावरची कोरडी आणि थंड हवा, समुद्रसपाटीपासूनची उंची आणि पृथ्वीच्या अक्षांवरचं स्थैर्य यामुळे अंटार्क्टिकावरून आकाशनिरिक्षणाची संधी साधता येते. इथे भली मोठी दुर्बिण बसवण्यात आली आहे. या दुर्बिणीतून आकाशातले ग्रह, तारे बघता येतात.

■ दक्षिण ध्रुवावर फारसं प्रदूषण नाही. त्यामुळे इथल्या प्रयोगशाळेत संशोधन करणाऱ्या शास्त्रज्ञांचे निष्कर्ष बऱ्याच अंशी अचूक असतात.

■ अंटार्क्टिकावर कोणाचंही सरकार नाही. या खंडावर कोणत्याही देशाचा अधिकार नाही. पण जगातल्या बऱ्याच देशांमध्ये अंटार्क्टिकाबाबत करार झाले आहेत.

■ दक्षिण ध्रुवावर बर्फाचा भला मोठा थर असल्यामुळे उत्तर ध्रुवाच्या तुलनेत दक्षिण ध्रुव अधिक थंड आहे.

## हार्मोनियम

**ओळख वाद्यांची**

हार्मोनियम हे सुषिर वाद्यांपैकी एक लोकप्रिय वाद्य आहे. हे पेटीच्या आकाराचे असून त्याला 'बाजाची पेटी' किंवा संवादिनी असेही म्हणतात. या वाद्यात पितळेच्या पात्यांपासून आवाज निर्माण होतो. यात पियानोप्रमाणे पांढऱ्या आणि काळ्या कळा असतात. मागे एक 'बेलोज' म्हणजे हवा भरण्याची पिशवी असते. ती हाताने चालवली जाते. हवा आत गेल्यावर ती धातूच्या 'रीड्स' मधून जाते आणि सूर उमटतो. फ्रान्स मधील अलेक्जेंड्रे डेबेन याने १८४० मध्ये हार्मोनियमचा शोध लावला. त्याने ९ ऑगस्ट १८४० ला पॅरिस मध्ये आपल्या नावावर हार्मोनियमचे पेटंट करून घेतले होते. हार्मोनियम वाजवणे तुलनेने सोपे असल्यामुळे ते गायकांच्या साथीला सर्वाधिक वापरले जाते. भजन-कीर्तन, शास्त्रीय संगीत, नाट्यसंगीत, गझल आणि चित्रपटसंगीतातही हार्मोनियमचा मोठ्या प्रमाणावर उपयोग होतो. साधारणपणे १९ व्या शतकात युरोपातून हे वाद्य भारतात आले असे म्हटले जाते. त्यानंतर हे वाद्य भारतीय संगीतामध्ये इतके मिसळले की ते आता भारतीय परंपरेचाच भाग वाटते. हार्मोनियममध्ये स्केल चेंज ही खास सुविधा असते. त्यामुळे त्यातून गायकाच्या आवाजाला अनुरूप स्वर मिळवता येतात. पंडित विष्णू दिगंबर पलुस्कर, भीमसेन जोशी, कुमार गंधर्व यांच्यासारख्या गायकांच्या साथीसाठी हार्मोनियमचे विशेष स्थान होते. आजही अनेक संगीत शाळांमध्ये प्राथमिक शिकवणी हार्मोनियमवरच सुरू केली जाते. याचे सूर स्वच्छ, स्पष्ट आणि स्थिर असल्यामुळे विद्यार्थ्यांना स्वर शिकणे सोपे जाते. हार्मोनियम म्हणजे संगीताच्या अभ्यासाचा आधारस्तंभ आणि भारतीय संगीताचा अविभाज्य घटक आहे.



## सह्याद्री पर्वतरांग

सह्याद्री पर्वतरांगेला पश्चिम घाट असेही म्हणतात. ही भारतातील एक महत्त्वाची पर्वतरांग आहे. सह्याद्री पर्वतरांग महाराष्ट्राच्या पश्चिमेकडील भागात,गोवा,कर्नाटक,केरळ आणि तमिळनाडू या राज्यांत पसरलेली आहे. सह्याद्री पर्वतांची लांबी सुमारे १,६०० किलोमीटर असून ते अरबी समुद्राच्या किनाऱ्याला समांतर पसरले आहेत. या रांगेची उंची साधारणपणे ९०० ते १२००मीटर दरम्यान आहे.काही शिखरे २,६०० मीटरपर्यंत उंच आहेत.कळसुबाई शिखर, भैरवगड, रत्नगड, साल्हेर, हरिश्चंद्रगड, म्हैसाळगड, राजगड, तोरणा ही महाराष्ट्रातील तर कर्नाटकातीलमुल्ळयनगिरी शिखर आणि केरळातील अणमुदी शिखर प्रसिद्ध आहेत. कळसूबाई शिखर१६४६ मीटर उंच असून ते महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर मानले जाते. सह्याद्री पर्वतरांग नैसर्गिक सौंदर्य, ऐतिहासिक किल्ले, धबधबे, नद्या आणि दाट जंगलांनी समृद्ध आहे. कृष्णा,गोदावरी आणि कावेरी यासारख्या अनेक नद्या येथे उगम पावतात. सह्याद्री जैवविविधतेसाठीही प्रसिद्ध आहे. विविध प्रकारचे पक्षी,कीटक आणि प्राणी या जंगलांमध्ये राहतात. युनेस्कोने त्याला जागतिक नैसर्गिक वारसा स्थळाचा दर्जा दिला आहे.इतिहासाच्या दृष्टीनेही सह्याद्री पर्वत अनेक गड-किल्ल्यांसाठी ओळखला जातो. छत्रपती शिवाजी महाराजांनी या किल्ल्यांचा उपयोग आपल्या साम्राज्याच्या सुरक्षेसाठी आणि लढायांसाठी केला. रायगड, प्रतापगड, तोरणा, हरिश्चंद्रगड, राजगड यासारख्या किल्ल्यामुळे सह्याद्रीला सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारसा लाभला आहे.नैसर्गिक सौंदर्य, ऐतिहासिक वारसा, पावसाळ्यातील धबधबे, आणि निसर्गप्रेमींसाठी असलेली आकर्षणे यामुळे सह्याद्री पर्वतरांग पर्यटक आणि गिर्यारोहकांसाठी स्वर्ग मानली जाते. त्यामुळेच सह्याद्री पर्वतरांग महाराष्ट्राचे अभिमानस्थान आहे.

## महागडे कुत्रे





**फन टाईम**

दोस्तांनो, कुत्रा हा ईमानदार प्राणी. बरेचजण कुत्रा पाळतात. वेगवेगळ्या प्रजातींची कुत्री पहायला मिळतात. प्रत्येक प्रजातीची वैशिष्ट्यं, गुण वेगवेगळे असतात. कुत्रे विकत घेण्यासाठी पैसे मोजावे लागतात. जगातले काही कुत्रे खूप महागडे आहेत. या कुत्र्यांच्या किंमती वाचून तुम्हालाही आश्चर्याचा धक्का बसेल. अशाच काही महागड्या कुत्र्यांची ओळख करून घेऊ.

▶ 'सेंट बर्नर्ड' हा खूप मोठ्या आकाराचा कुत्रा आहे. कुत्र्यांची ही प्रजाती खूप प्रेमळ असते. काश्मीर, अंटार्क्टिका तसंच इतर बर्फाळ प्रदेशात माणसं बर्फाखाली गाडली जातात. या माणसांना शोधण्याचं काम हे कुत्रे करतात. त्यांना सतत प्रशिक्षण द्यावं लागतं. या प्रजातीच्या कुत्र्याची किंमत ७२ हजार ते २.६ लाख रुपयांच्या घरात असते.

▶ 'केस कोर्सो' प्रजातीचे कुत्रे ग्रीसमध्ये आढळतात. त्यांच्या अंगावर केस असतात. हे केस वेळोवेळी काढून टाकावे लागतात. हे कुत्रे युद्धात सहभागी होत असत. त्यांच्यावर राखण करण्याची जबाबदारी असते. त्यांना शेताची राखण करण्यासाठी ठेवलं जातं. या कुत्र्याची किंमत १.८ लाख ते २.६ लाख रुपयांच्या घरात आहे.

▶ 'अफगाण हाउंड' या प्रजातीचे कुत्रे खूप सुंदर दिसतात. या कुत्र्यांना सगळं स्वतंत्रपणे करायला आवडतं. ते खूप प्रेमळ असतात. 'अफगाण हाउंड' ही कुत्र्यांची पृथ्वीवरची सर्वात जुनी प्रजाती आहे. हे कुत्रे माणसांसोबत शिकारीला जात असत. त्यांची किंमत १.१० लाख ते २.६ लाख रुपयांपर्यंत असते.

▶ 'पग' ही कुत्र्यांची प्रजाती चीनमधल्या राज्यकर्त्यांमध्ये बरीच लोकप्रिय होती. डच व्यापाऱ्यांनी ही प्रजाती युरोपला नेली. हे कुत्रे हुशार असतात. ते हट्टीही असतात. या कुत्र्यांसाठी १.८ ते २.६ लाख रुपये मोजावे लागतात.

**ठिपके जुळवा**



## अशी आहे यो-यो चाचणी

**जाणून घ्या**

मुलांनो, तुम्ही यो-यो टेस्टबद्दल ऐकलं असेल. यो-यो ही क्रिकेटपटूंच्या तंदुरुस्तीची चाचणी असते. ही यो-यो चाचणी म्हणजे नेमकं काय हे समजून घेऊ.

♥ भारतीय क्रिकेट संघातल्या प्रत्येक खेळाडूला यो-यो चाचणी द्यावी लागते. या चाचणीत उत्तीर्ण होणाऱ्या खेळाडूंची संघात निवड केली जाते. मैदानात उतरणारा प्रत्येक खेळाडू तंदुरुस्त असायला हवा. म्हणूनच यो-यो चाचणी बंधनकारक करण्यात आली आहे.

♥ यो-यो चाचणी ही संकल्पना सर्वात आधी फुटबॉलपटूंसाठी राबवण्यात आली. आता मात्र क्रिकेटच नाही तर हॉकीच्या खेळाडूंनाही ही चाचणी द्यावी लागते.

♥ क्रिकेटपटूंची चाचणी बंगळूरूमधल्या राष्ट्रीय क्रिकेट अकादमीत घेतली जाते.

♥ यो-यो चाचणी डेन्मार्कचे फूटबॉल फिजिओलॉजिस्ट जेन्स बँग्सबो यांच्या संकल्पनेतून साकारली आहे.

♥ यो-यो ही सॉफ्टवेअरवर आधारित चाचणी आहे. यात खेळाडूंना ठराविक अंतर धावावं लागतं. यावरून खेळाडूंच्या तंदुरुस्तीबाबत निष्कर्ष काढले जातात. फूटबॉल, क्रिकेट आणि रग्बी या खेळांसाठी यो-यो चाचणी बंधनकारक करण्यात आली आहे.




## ...म्हणून वाढतं वजन

**हेल्थ वेल्थ**

छोट्यांनो, तुम्हाला नेहमीच्या पोळी भाजीपेक्षा फास्ट फूड, जंक फूड जास्त आवडतं. लिंबू सरबतापेक्षा कोल्डड्रिंक प्यावंसं वाटतं. तुमच्या वयाच्या बऱ्याच मुलांचं वजन वाढलेलं असतं. पण अशा प्रकारे वजन वाढणं चांगलं नाही. वाढलेल्या वजनामुळे मोठं झाल्यावर बराच त्रास होतो. मधुमेह, उच्च रक्तदाबासारखे विकार जडतात. म्हणूनच वजन नियंत्रणात ठेवायला हवं. आपण बरंच काही खातो, पितो. पण काही पदार्थांमुळे, पेयांमुळे आपलं वजन वाढू शकतं. वजन वाढवणारे पदार्थ कोणते? जाणून घेऊ.

➪ वजन कमी करण्यासाठी बरेच जण डाएट करतात. पण ही फॅट डाएट्स तुमचं वजन वाढवू शकतात. डाएट केल्यामुळे शरीराची वजन वाढण्याची क्षमता वाढते. चयापचय क्रियेचा वेग मंदावतो. सतत खावंसं वाटतं. त्यामुळे कोणाच्या नादी लागून भलतीच डाएट्स करू नयेत.

➪ कोल्डड्रिंक आरोग्यासाठी घातक आहे. या कोल्डड्रिंकमध्ये साखरेचं प्रमाण बरंच जास्त असतं. त्यामुळे वजन वाढण्याची शक्यताही जवळपास सहापटींनी वाढते. या पेयांची गोडी वाढवण्यासाठी साखरेसोबतच कृत्रिम गोड पदार्थही घातले जातात. यामुळे दात खराब होतात. तसंच आरोग्यावर वाईट परिणाम होतात.

➪ बरीच मुलं टीव्ही बघताना वेफर्स, पिझ्झा तसंच इतर जंक फूड खातात. टीव्ही बघत असताना आपलं खाण्यावर नियंत्रण रहात नाही आणि वजन वाढू लागतं.

➪ रात्री झोप येत नसेल तर आई-बाबांना सांगा. आपल्या शरीराला पुरेशी झोप हवी असते. अपुऱ्या झोपेमुळेही वजन वाढू शकतं. त्यामुळे सात ते आठ तासांची झोप घ्यायला हवी.

➪ तुम्हा मुलांवरही बराच ताण असतो. भरपूर अभ्यास करण्याचा, चांगले गुण मिळवण्याचा दबाव असतो. तुमचीही बरीच धावपळ होते. पण हा ताण तुमचं वजन वाढवू शकतो. त्यामुळे ताणाला जरा लांबच ठेवा. संध्याकाळी मैदानी खेळ खेळा. व्यायाम करा. यामुळे ताण निघून जाईल.





## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) जर्मनीचं चलन कोणतं?
२) लीप वर्षात किती दिवस असतात?
३) ऑस्ट्रेलियाची राजधानी कोणती?
४) हॉकीच्या एका संघात किती खेळाडू असतात?
५) बंगळूरू या शहराला कोणत्या नावाने ओळखलं जातं?
६) आयएएसचं पूर्णरुप काय?
७) एनजीओचं पूर्णरुप काय?
८) भारतीय राष्ट्रीय काँग्रेसच्या पहिल्या महिला अध्यक्ष कोण?
९) सरहद्द गांधी म्हणून कोण ओळखलं जातं?
१०) भारत छोडो आंदोलनाची सुरूवात कोणत्या वर्षी झाली?

उत्तर : १) युरो २) ३६६ ३) कॅनबेरा ४) ११ ५) गार्डन सिटी ६) इंडियन ॲडमिनिस्ट्रेटिव्ह सर्व्हिस ७) नॉन गव्हर्नमेंट ऑर्गनायझेशन ८) ॲनी बेझंट ९) खान अब्दुल गफार खान १०) १९४२

**दोस्त हे मस्त**

### 'अटलांटिक पफिन'



मुलांनो, पक्षी आकाशात निवांत विहार करत असतात. जगात अनेक सुंदर आणि आकर्षक पक्षी पहायला मिळतात. 'अटलांटिक पफिन' हा सुद्धा असाच एक सुंदर पक्षी आहे. हा पक्षी एखाद्या खेळण्यासारखाच दिसतो. याचे डोळे आणि चोच खूप आकर्षक असते. या पक्ष्याला समुद्री पोपट असंही म्हटलं जातं. हा पक्षी हवेत भरारी घेतो शिवाय पाण्यातही ६० मीटरपर्यंत खोल जातो. 'अटलांटिक पफिन' हा अनोखा पक्षी आहे.

**खादाडी**

### चीजी डिप

दोस्तांनो, तुम्हाला चीज आवडत असेल. मग मस्तपैकी चीजी डिप बनवता येईल. यासाठी एक कप चीज, दोन चमचे मैदा, अर्धा चमचा मीठ, अर्धा चमचा मिरपूड, दोन चमचे बटर आणि दोन कप दूध हे साहित्य घ्या. आता एका कढईत बटर गरम करून घ्या. यात मैदा घालून परतून घ्या. त्यानंतर दूध घालून उकळी येईपर्यंत हलवत रहा. मग यात मिरपूड आणि मीठ घाला. त्यात किसलेलं चीज घाला. चीज वितळेपर्यंत हलवत रहा. तुमचं डिप तयार आहे. हे डिप थंड होऊ द्या. नाचोस, वेफर्स, पापडसोबत हे डिप खाता येईल.



**स्टडी टिप्स**

### तयारी परीक्षेची...



छोट्यांनो, तुम्हाला आता वार्षिक परीक्षेचे वेध लागले असतील. वार्षिक परीक्षेत जास्त जोर लावावा लागतो. परीक्षा कोणतीही असली तरी अभ्यास करायलाच हवा. सर्वात आधी तुमचं वेळापत्रक तयार करा. परीक्षेच्या तारखा आणि अभ्यासक्रमानुसार वेळेचं नियोजन करा. अभ्यासाची वेळ स्वतःच ठरवा. अभ्यास करताना टीव्ही, मोबाईल बंद ठेवा. सगळं लक्ष अभ्यासावर केंद्रित करा. प्रत्येक विषयाला समान वेळ द्या.

**योगा टाईम**

### मत्स्यासनाने आजारांना दूर ठेवा

मुलांनो, तुम्हाला सारखा सर्दी-खोकला होतो का? मग योगासनं करा. योगामुळे आपलं आरोग्य उत्तम राहतं. मत्स्यासनामुळे सर्दी-खोकला तसंच श्वसनाशी संबंधित आजार बरे व्हायला मदत होते. या आजारांना प्रतिबंध म्हणूनही हे योगासन करता येईल.



# मानसिक स्वास्थ्य अभियान : एक स्तुत्य उपक्रम




लायन्स इंटरनॅशनल ही संस्था १९१७ साली अमेरिकेमध्ये शिकागो या शहरात स्थापन झाली. आज जगातील सर्वात मोठी स्वयंसेवी संघटना म्हणून गरीब, गरजू, समाजातील वंचित घटकांसाठी सतत उभी राहिलेली ही चळवळ आज जगभरात २०० हून अधिक देशात ४९ हजार क्लब आणि तब्बल १४ लाखापेक्षा जास्त सदस्यांची ताकद घेऊन कार्यरत आहे. या संस्थेने दृष्टी, पर्यावरण, मधुमेह, लहान मुलांचा कॅन्सर, भूक, मानवता, युवा विकास, आपत्ती व्यवस्थापन आणि मानसिक आरोग्य अशा नऊ महत्त्वाच्या क्षेत्रामध्ये सेवा द्यायचे ध्येय ठरवले आहे. भारतामध्ये डोळ्यांच्या शस्त्रक्रिया, मोफत उपचार, हजारो रुग्णालय आणि दरवर्षी लाखो गरजूंना दृष्टी मिळवून देणारी लायन्स सेवा खरोखरच अभिमानास्पद आहे.

अलिबागमध्ये पन्नास वर्षांपूर्वी स्थापन झालेला अलिबाग लायन्स क्लब हा या संस्थेचा भाग असून याने अलिबाग परिसराला सामाजिक बांधिलकीची वेगळी ओळख करून दिली आहे. आज अलिबाग परिसरात सात वेगवेगळे क्लब कार्यरत आहेत. यामध्ये मांडवा, पोयनाड, नागाव, मुरुड, श्रीबाग तसेच सर्व स्त्री सदस्य असलेला अलिबाग डायमंड सामील आहे. ४०० पेक्षा अधिक सदस्य या विविध क्लबमधून कार्यरत आहेत.

अलिबाग क्लब हा लायन्स फेस्टिवल साठी तसेच लायन्स टॅलेंट हंट या ॲक्टिव्हिटीसाठी विशेष करून ओळखला जातो. या क्लबने अलिबाग परिसरात सातत्याने विविध सेवाभावी उपक्रम यशस्वीरित्या राबविलेले आहेत. प्राचार्य आर. टी. कुलकर्णी यांच्या प्रेरणेतून चालू झालेला क्लबचे आज १०० पेक्षा अधिक सदस्य आहेत. लायन प्रदीप नाईक यांनी अध्यक्षपदाची धुरा समर्थपणे यावर्षी सांभाळलेली आहे.

इंटरनॅशनल युथ एक्सचेंज अतिशय चांगला उपक्रम गेले अनेक वर्ष या क्लब मार्फत राबविला जातो. या कार्यक्रमांतर्गत अलिबाग परिसरातील अनेक युवक, युवती परदेशामध्ये लायन सदस्यांच्या घरी राहिलेले आहेत. आणि तीस ते चाळीस विविध देशातील मुलांच्या बरोबर त्यांनी या देशांमध्ये कॅम्पमध्ये सहभाग घेतला आहे. तसेच अनेक परदेशी युवक, युवती अलिबागमध्ये या कार्यक्रमांतर्गत आजपर्यंत आलेले आहेत. तसेच या कार्यक्रमाद्वारे विविध देशाच्या संस्कृतीची ओळख युवकांना करून दिली जाते. १९१८ साली अलिबाग परिसरातील चार क्लबने एकत्र येऊन लायन्स हेल्थ फाऊंडेशनची स्थापना केली. यामार्फत डोळ्यांचे अत्याधुनिक हॉस्पिटल चालवण्यात येते. पास्ट डिस्ट्रिक्ट गव्हर्नर लायन अनिल जाधव यांच्या नेतृत्वाखाली येथील डोळ्यांच्या रुग्णालयात आजपर्यंत १६००० पेक्षा अधिक मोतीबिंदू तसेच रेटिना शस्त्रक्रिया यशस्वीरित्या झालेल्या आहेत. त्यातील दहा हजार पेक्षा जास्त शस्त्रक्रिया या संपूर्ण मोफत केल्या आहेत. अलिकडे सोगाव येथे स्वतःची जागा विकत घेऊन याच फाऊंडेशनने एक मल्टी स्पेशालिटी हॉस्पिटलचे काम सुरू केले आहे, तेथे सर्व वैद्यकीय सेवा वाजवी दरात उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. आरसीएफ तसेच निलिकॉन कंपनी आणि लायन सदस्यांच्या निधीतून या प्रकल्पाचे काम पूर्ण होत आहे. महात्मा फुले आणि प्रधानमंत्री आरोग्य योजनांचे लाभही इथे उपलब्ध होणार आहेत. त्यामुळे गरजू रुग्णांपर्यंत सरकारी सुविधा मोफत पोहोचणार आहे. दरवर्षी लायन्स इंटरनॅशनलच्या वतीने ऑक्टोबर सेवा सप्ताह २ ऑक्टोबर ते ८ ऑक्टोबर या दरम्यान देशभर साजरा केला जातो. या काळात सर्वच क्लबकडून विविध प्रकारच्या कार्यक्रम आयोजित केले जातात. ज्यामध्ये वृक्षारोपण, डोळे तपासणी, वैद्यकीय तपासणी शिबीरे, मानसिक आरोग्य जनजागृती इतर विविध सेवा दिल्या जातात. यावर्षी ४ ऑक्टोबर ते १० ऑक्टोबर मानसिक आरोग्य सेवा सप्ताह म्हणून विशेष सप्ताह साजरा केला जाणार आहे. या माध्यमातून समाजातील प्रत्येकाचे मानसिक आरोग्य सशक्त बनवण्यावर भर दिला जाणार आहे. आज मानसिक आरोग्य ही समस्या जगभरातच खूप लक्षवेधी ठरत आहे. आज जगामध्ये प्रत्येक ४० सेकंदाला या समस्येमुळे एक आत्महत्या होत असते. तर भारतामधील हे प्रमाण सात मिनिटाला एक एवढे आहे. विविध कारणांमुळे आज हा मानसिक स्वास्थ्याचा प्रश्न अतिशय महत्त्वाचा ठरत आहे. २०३० सालापर्यंत जगामध्ये मानसिक आरोग्य हा आजार सर्वात मोठा आजार ठरण्याची शक्यता वर्तवली जात आहे. त्यामुळे वेळीच याविषयी जागरूकता निर्माण करणे तसेच याविषयीचे जे गैरसमज आहेत ते दूर करणे फार गरजेचे आहे आणि त्याचप्रमाणे या आजारावर वेळीच उपाययोजना केल्यास हे आजार बरे होऊ शकतात हे लोकांना पटवून देणे तेवढेच महत्त्वाचे आहे. तसे पाहिले तर लहान मुलांपासून युवक, महिला त्याचप्रमाणे औद्योगिक क्षेत्रातील कामगार, वरिष्ठ नागरिक या सर्वांमध्येच या मानसिक आरोग्याचा प्रश्न हा अत्यंत महत्त्वाचा ठरत आहे. प्रत्येकाची कारणे वेगवेगळी आहेत, परंतु गैरसमज मात्र सर्वसाधारणपणे एकसारखे आहेत. त्यामुळे लायन्स इंटरनॅशनलच्या माध्यमातून यावर्षी वरील सप्ताह आयोजित करण्याचे ठरविले आहे. दरम्यान, विविध कार्यक्रमाच्या माध्यमातून जनजागृती करणे, परिसंवाद त्याचप्रमाणे कार्यशाळा घेणे असे विविध कार्यक्रम आयोजित करावयाचे निश्चित केले आहे.



**ला. प्रविण सरनाईक**

प्रथम उपप्रांतपाल. ३२३१-४

लायन्स क्लब अलिबागच्या वतीने सुद्धा या सप्ताहामध्ये अलिबागमध्ये विविध कार्यक्रम आयोजित करणारा आहोत. मानसिक आरोग्य म्हणजे केवळ आजार नाही तर भावनिक समतोल, निरोगी संवाद, परस्पराची मदत, समाजात स्वीकार आणि सहिष्णूता वाढवणे हा त्याचा खरा हेतू आहे. सकारात्मक मनाशी बांधिलकी ठेवली तर व्यक्ती सक्षम नागरिक बनते आणि आपला समाज सुदृढ होतो हे सर्वांनी समजून घेण्याची गरज आहे. याकरिता जागरूकता निर्माण करणे ही आपली सर्वांचीच जबाबदारी आहे. लायन्स क्लब अलिबागच्यावतीने मानसिक आरोग्य या विषयावर जे कार्यक्रम आयोजित करत आहोत त्यामध्ये यातील विविध विषयांवर तज्ज्ञ व्यक्तींचे लेख पुढील काही दिवसांमध्ये आपल्या जिल्ह्यातील आघाडीचे वृत्तपत्र दैनिक कृषीवल यामध्ये प्रकाशित करीत आहोत. कृषीवल वृत्तपत्राने यासाठी आपल्याला फार मोलाचे सहकार्य करून हे लेख प्रकाशित करण्याचे मान्य केले आहे.

या लेखाद्वारे आपण लोकांपर्यंत युवक, महिला तसेच वरिष्ठ नागरिक, औद्योगिक कामगार आणि काही याविषयीच्या आजाराबाबत आपण माहिती लोकांपर्यंत पोहोचवण्याचा प्रयत्न करणार आहोत. एकंदरीतच मानसिक आरोग्य हा विषय आपल्या सर्वांच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असून आपले जीवनमान सुधारण्याच्या दृष्टिकोनातून त्याचप्रमाणे देशाची उत्पादकता वाढविणे आणि देशांमध्ये सुदृढ आणि सशक्त नागरिक घडवण्यासाठी पर्यायाने देशाचा विकास अधिक जलद गतीने होण्यास मदत करण्याचे काम आपण लायन्स क्लबच्या माध्यमातून पुढील काही दिवसांमध्ये करणार आहोत. सर्वांचा सहभाग आणि सकारात्मक प्रतिसादाची अपेक्षा ठेऊन हा सप्ताह सर्वांचे मनोबल उंचावण्याचे, संवाद वाढविण्याचे आणि आनंदी, निरोगी, सुदृढ आणि सशक्त पिढी निर्माण करण्यासाठी महत्वपूर्ण ठरेल, असा माझा ठाम विश्वास आहे.

माझ्या सर्व लायन सदस्यांना या वैशिष्टपूर्ण कामासाठी शुभेच्छा देतो.

## निवडक



### कर्जतमध्ये ४०+ क्रिकेटच्या नवीन हंगामाचा शुभारंभ

**कर्जत** : विजयादशमीच्या शुभ मुहूर्तावर सालाबादप्रमाणे ४०+ क्रिकेटच्या नवीन हंगामाचा शुभारंभ कर्जत क्रिकेटची पंढरी असलेल्या आमराई मैदानावर करण्यात आला. कर्जत ४०+ क्रिकेट संघटनेचे मधु दादा सुर्वे, राजाभाऊ कोठारी, रणजित जैन, प्रविण गांगल, शिरीष दिघे, गजू दांडेकर आदी उपस्थित होते. महेंद्र निगुडकर यांच्या हस्ते श्रीफळ अर्पण करण्यात आला. याप्रसंगी संघटनेतील सचिन मनोरे, भाई जाधव, राजेश लाड, ॲड. संकेत भासे, विराग फाटक, सचिन बाम, सुरेश मोहिते, पांडुरंग मोहिते, राजु जैन, सुनील खातु, दिपंकार सालये, गिरीश सुर्वे, किरण देशमुख, पांडुरंग पाटील, समीर चव्हाण, संदीप देशमुख, चंद्रकांत दगडे, अभिजित मुधोळकर, रमेश पवार, जितेंद्र कोल्हे, अजय झुंजारराव, मंगेश म्हसे, सुजित पवार, जितेंद्र देशमुख, सुरेश गायकवाड, ॲड. किशोर देशमुख, यशवंत राणे, जगदीश पालकर, शैलेश पवार, सुभाष पाटील, रमेश मिसे, राकेश गुप्ता, युगान सुर्वे, अन्वय झुंजारराव, दिनेश कडु तसेच ४०+ व ५०+ सदस्य बहुसंख्येने उपस्थित होते.

### किक बॉक्सिंग स्पर्धेत प्रेरणाला सुवर्ण

**बांदा** : खेमराज मेमोरीयल प्रशाळेच्या प्रेरणा भोसले या विद्यार्थिनीने प्रशिक्षक किरण देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली किक बॉक्सिंग स्पर्धेत निर्विवाद वर्चस्व राखत सुवर्णपदक पटकावले. तिचे हे दुसरे सुवर्णपदक आहे. गेल्याच महिन्यात झालेल्या बॉक्सिंग क्रीडा प्रकारात सुवर्ण तर कराटे स्पर्धेत तिने कांस्यपदक मिळविले होते. क्रीडा व युवक संचालनालय महाराष्ट्र राज्य जिल्हा क्रीडा परिषद व जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय सिंधुदुर्ग यांच्या वतीने सिंधुदुर्गनगरी येथे जिल्हास्तरीय शालेय क्रीडा स्पर्धा सोमवारी (दि. २९) झाली. यामध्ये १९ वर्षांखालील मुलींच्या गटात प्रेरणा हिने अंतिम फेरीत विजय मिळवत सुवर्णपदक मिळवले. ती क्रीडा प्रशिक्षक किरण देसाई यांच्या मार्गदर्शनाखाली सराव करत आहे. तिला खेमराज बांदाच्या क्रीडा शिक्षिका सुमेधा सावळ यांचे मार्गदर्शन लाभले.

# भारताकडून ४४८ धावांचा डोंगर

## फलंदाजांकडून विंडिजच्या गोलंदाजांची धूळधाण; एकाच दिवसात तिघांची शतकं

**। अहमदाबाद । वृत्तसंस्था ।**

भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातील पहिल्या कसोटी सामन्याच्या दुसऱ्या दिवशी भारतीय फलंदाजांनी वर्चस्व राखले. दुसऱ्या दिवसाचा खेळ संपला तेव्हा भारतीय संघाने आपल्या पहिल्या डावात पाच गडी गमावून ४४८ धावांचा डोंगर उभा केला आहे.



वेस्ट इंडिजविरुद्धच्या पहिल्या कसोटीमध्ये भारतीय संघ मजबूत स्थितीमध्ये पोहोचली आहे. त्यामुळे भारतीय संघाची आघाडी २८६ रनपर्यंत पोहोचली आहे. आजच्या एका दिवसात भारताच्या तीन खेळाडूंनी दणदणीत शतकं झळकावली. दिवसाअखेरीस रवींद्र जडेजा १०४ रनवर नाबाद खेळत आहे, जडेजासोबत वॉशिंग्टन सुंदर ९ रनवर क्रीजवर आहे. रवींद्र जडेजाशिवाय केएल राहुल आणि ध्रुव जुरेल यांनीही शतकी खेळी केली. राहुल १०० रनवर तर ध्रुव जुरेल १२५ रनवर आऊट झाले. जुरेलचे कसोटीमधलं हे पहिलंच शतक आहे. तर जडेजाचे कसोटीमधलं सहावं शतक होत. राहुलचे कसोटीमधील हे ११ वं शतक होते. तब्बल ९ वर्षांनंतर शतक केले आहे. दुसरीकडे कर्णधार शुभमन गिल यानेही ५० रनची खेळी केली. वेस्ट इंडिजकडून कर्णधार रोस्टन जेसने सर्वाधिक २ विकेट घेतल्या, तर खेरी पेयर, जोमेल वारिकन आणि जेडेन सिल्ल यांना १-१ विकेट मिळाली आहे.

या सामन्यात वेस्ट इंडिजचा कर्णधार रोस्टन चेसने टॉस जिंकून पहिले बॅटिंगचा निर्णय घेतला होता. यानंतर भारताने वेस्ट इंडिजचा १६२ रनवर ऑलआऊट झाला. भारताकडून मोहम्मद सिराजने सर्वाधिक ४ विकेट घेतल्या, तर बुमराहला ३ आणि कुलदीप यादवला २ विकेट मिळाल्या. वॉशिंग्टन सुंदरलाही एक विकेट घेण्यात यश आले. भारत आणि वेस्ट इंडिज यांच्यातली ही सीरिज वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपचा भाग आहे, त्यामुळे या सीरिजच्या दोन्ही टेस्टमध्ये विजय मिळवून पॉईंट्स टेबलमध्ये अव्वल स्थान पटकावण्याची संधी भारतीय संघाला आहे. भारतीय संघ सध्या वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशीपच्या पॉईंट्स टेबलमध्ये तिसऱ्या क्रमांकावर आहे.

वेस्ट इंडिजने आपल्या पहिल्या डावात केवळ १६२ धावा केल्या होत्या, त्यामुळे संघाची एकूण आघाडी आता २८६ धावांपर्यंत पोहचली आहे. सामन्याच्या तिसऱ्या दिवशी ही आघाडी आणखी वाढवण्यासाठी भारतीय संघाचा प्रयत्न असणार आहे.

## मुकेशचा अचूक नेम

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

मुकेशने पुरुषांच्या २५ मीटर पिस्तूल या बिगर-ऑलिम्पिक प्रकारात ५८५ गुणांची कमाई करत सुवर्णपदक मिळवले. तटस्थ खेळाडू अलेक्सांद्र कोवालेवने ५७७ गुणांसह रौप्यपदक जिंकले, तर भारताच्या साहिल चौधरीने ५७३ गुणांसह कांस्यपदकावर नाव कोरले.

आयएसएसएफ ज्युनियर वर्ल्ड कपच्या अखेरच्या दिवशी भारताच्या नेमबाजांनी दमदार कामगिरी करत पदकतालिकेत १९ पदकांसह अव्वल स्थान कायम ठेवले. भारताने या स्पर्धेत ६ सुवर्णासह ८ रौप्य आणि ५ कांस्य जिंकले.

पुरुषांच्या २५ मीटर पिस्तूल स्पर्धेत भारताचा ज्युनियर विश्वविजेता मुकेश नेलावल्लीने सुवर्णपदक जिंकले, तर याच प्रकारात महिला गटात तेजस्विनी सिंह हिने रौप्यपदकाची कमाई केली.



अखेरच्या दिवशी भारताच्या नेमबाजांनी दमदार कामगिरी करत पदकतालिकेत १९ पदकांसह अव्वल स्थान कायम ठेवले. भारताने या स्पर्धेत ६ सुवर्णासह ८ रौप्य आणि ५ कांस्य जिंकले. पुरुषांच्या २५ मीटर पिस्तूल स्पर्धेत भारताचा ज्युनियर विश्वविजेता मुकेशने सुवर्णपदक जिंकले.

## खो-खो संघटनेच्या अध्यक्षपदी पवार

पुणे : महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांची महाराष्ट्र खो-खो संघटनेच्या अध्यक्षपदी पुन्हा एकदा निवड करण्यात आली आहे. पवार यांनी याआधी २००६ ते २०१८ या कालखंडात अध्यक्षपद भूषवून खो-खोच्या प्रगतीसाठी उल्लेखनीय कार्य केले होते. पुण्यात २१ सप्टेंबर रोजी झालेल्या शासकीय परिषद बैठकीत, शिवाय २८ सप्टेंबर रोजी शिवछत्रपती क्रीडा संकुल, बालेवाडी येथे पार पडलेल्या वार्षिक सर्वसाधारण सभेत ही निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी अध्यक्षस्थानी अश्विनी पाटील उपस्थित होत्या. यांच्या पुनरागमनामुळे खो-खो खेळाडू आणि क्रीडा क्षेत्रात नवचैतन्य निर्माण झाले आहे.

## चानूने रौप्यपदक जिंकून रचला इतिहास

**। नवी दिल्ली । वृत्तसंस्था ।**

भारताची वेटलिफ्टिंग क्वीन मीराबाई चानू यांनी पुन्हा एकदा देशाला अभिमानाने गौरवले आहे. नॉर्वेच्या फोर्डे येथे झालेल्या जागतिक वेटलिफ्टिंग चॅम्पियनशिप २०२५ मध्ये तिने ४८ किलो वजनी गटात चमकदार कामगिरी करत रौप्यपदक जिंकले. मीराबाईंनी एकूण १९९ किलो उचलून केवळ पोडियमवर स्थान मिळवले नाही तर तीन वर्षांनंतर या प्रतिष्ठित स्पर्धेत भारतासाठी पदक जिंकणारी खेळाडू देखील बनली आहे.

सुवर्णपदक तिच्यापासून फक्त १२ किलो अंतरावर होते. चानूने ४८ किलो वजनी गटात भाग घेतला. या गटात तिने एकूण १९९ किलो वजन उचलले, ज्यामध्ये स्नॅचमध्ये ८४




किलो आणि क्लीन अँड जर्कमध्ये ११५ किलो वजन उचलले. यावेळी रौप्यपदक जिंकणाऱ्या चानूने जागतिक अजिंक्यपद स्पर्धेत इतिहास रचला आहे. स्पर्धेच्या इतिहासात ती भारतासाठी सर्वाधिक पदक जिंकणारी तिसरी वेटलिफ्टर बनली आहे.




## शीतलची वर्ल्ड कॉम्बॅट गेम्ससाठी निवड | आशियाई सुमो कुस्ती स्पर्धेत पटकावलं कास्य पदक

# महिला पोलिसांची चमकदार कामगिरी

**। ठाणे । प्रतिनिधी ।**

ठाणे ग्रामीण पोलिसांत सेवेत असलेल्या शीतल मल्लिकार्जुन खरटमल यांनी नुकत्याच बँकॉक येथे झालेल्या आशियाई सुमो कुस्ती स्पर्धेत कास्यपदक पटकावून ठाण्यासह भारताचा झेंडा सातासमुद्रापार फडकावला आहे. शीतलची पुढील वर्षी किरगीस्थान येथे होणाऱ्या वर्ल्ड कॉम्बॅट गेम्ससाठी निवड झाली आहे. शीतलच्या ऐतिहासिक कामगिरीबद्दल भारतीय सुमो रेसलिंग फेडरेशनतर्फे तिचे अभिनंदन करुन पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

शीतलचं मूळगाव सोलापूर असून शालेय शिक्षण श्री सिद्धेश्वर कन्या प्रशाला सोलापूर येथे झाले आहे. तसेच वालचंद आर्ट अँड कॉमर्स कॉलेज सोलापूर येथे महाविद्यालयीन शिक्षण झाले आहे. ज्युडो या खेळाचे कोच म्हणून २०१२ मध्ये पटियाला येथून पदवी घेतली आहे. शीतलनी २००३ पासून मार्शल आर्टची सुरुवात केली.



कराटे, ज्युडो, कुस्ती, बॉक्सिंग, तायकंडो, किंग बॉक्सिंग, बेल्ट रेसलिंग, मास्क रेसलिंग स्पर्धेमध्ये त्या सहभागी झाल्या आहेत. शीतलनी ज्युडो मार्शल गेम्समध्ये ११ पेक्षा अधिक वेळा देशाचे प्रतिनिधित्व केलं आहे. तसेच त्यांनी मार्शल आर्ट प्रकारात ब्लॅक बेल्ट ३ डिग्री घेतलेले आहे. त्या अनेक शासकीय व निमशासकीय ४६ पुरस्कार प्राप्त आहेत.

आंतरराष्ट्रीय स्तरावर विविध क्रीडा स्पर्धांमध्ये यश मिळवलेल्या शितल खरटमल या ठाणे ग्रामीण पोलीस दलात २०१० पासून कार्यरत असून सध्या त्या पोलीस जिम इन्चार्ज म्हणून कार्यरत आहेत.

> आशियाई सुमो कुस्ती स्पर्धेत भारताचे प्रतिनिधीत्व करण्याची संधी मिळाली. भारताचा झेंडा सातासमुद्रापार फडकविण्यात यश आले. त्याचा आनंद प्रचंड झाला असून देशासाठी अधिक चांगल्या पद्धतीने कामगिरी करण्याची इच्छा आहे.
>
> – शीतल खरटमल

डहाणू, घोलवड, पोलीस वेल्फेअर, स्पेशल ब्रांचमध्ये त्यांनी काम केले आहे. यापूर्वी त्यांनी साधारण २९ वेळा भारताचे प्रतिनिधित्व करून वेगवेगळ्या स्पर्धेत ७६ सुवर्णपदक, ४६ रौप्यपदक, १६ कास्यपदक प्राप्त केले आहे. मागील वर्षी त्यांनी जपान येथील टोकियोमध्ये झालेल्या आशियाई क्रीडा स्पर्धेत कास्यपदक प्राप्त केले होते. त्यांनी विविध राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये भारताचे प्रतिनिधित्व केले आहे. तसंच त्यांनी अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांमध्ये पदकं जिंकली आहेत.

### खेळाला कमी प्रतिसाद

**सुमो कुस्ती हा जपानचा राष्ट्रीय खेळ आहे, जो १५०० वर्षांपासून खेळला जातो. या खेळात दोन पैलवान कुस्तीच्या रिंगमधून प्रतिस्पर्ध्याला रिंगबाहेर ढकलण्याचा प्रयत्न करतात. भारतात या खेळाला कमी प्रतिसाद मिळतो, कारण भारतीय कुस्तीकडे खेळाडूंचा ओढा जास्त आहे. भारतीय कुस्तीपटूंना देखील या अनोख्या सुमो कुस्तीमध्ये चांगले यश मिळू शकते. त्यासाठी प्रयत्न केले जावेत, असे मत शितल खरटमलने व्यक्त केले आहे.**

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ.सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, संपादकीय विभाग-email : krushivalnews@gmail.com / जाहिरात विभाग- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयओनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील ■ व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर ■ कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत* ■ सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)